सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | गुरूवार, दि. ०५ मार्च २०२६ | वर्ष - ३ रे | अंक ३२५ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### ॲपलचा भारतात महाधमाका!

**मुंबई :** टेक विश्र्वातील दिग्गज कंपनी ॲपलने भारतीय बाजारपेठेत आपले सर्वात शक्तिशाली लॅपटॉप चरलइेज्ञ झी (२०२६) अधिकृतपणे लाँच केले आहेत. कंपनीच्या या फ्लॅगशिप लाइनअपमधील हे लेटेस्ट मॉडेल असून, ते आतापर्यंतचे सर्वात 'पॉवरफुल' मॅकबुक असल्याचा दावा केला जात आहे. हे नवीन लॅपटॉप दोन आकर्षक रंगांमध्ये उपलब्ध असून, या आठवड्याच्या शेवटी ग्राहकांसाठी त्याची 'प्री-ऑर्डर' प्रक्रिया सुरू होणार आहे. या लॅपटॉपचे मुख्य आकर्षण म्हणजे यामध्ये ॲपलचे अत्यंत प्रगत M5 प्रो (M5 Pro) आणि M5 मॅक्स (M5 Max) हे नवीन प्रोसेसर देण्यात आले आहेत. वेगवान कामगिरी आणि जड सॉफ्टवेअर सहज चालवण्यासाठी यामध्ये 64GB पर्यंत रॅमची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. ग्राफिक्स डिझाइनिंग, व्हिडिओ एडिटिंग आणि कोडिंग करणाऱ्या प्रोफेशनल्ससाठी हे नवे मॅकबुक प्रो एक गेम-चेंजर ठरणार आहे.

### वलसाडमध्ये लिफ्टचा अपघात

**वलसाड :** गुजरातच्या वलसाड येथील 'सरदार हाईट्स' या गुजरात हाऊसिंग बोर्ड संकुलात आज सकाळी काळजाचा ठोका चुकवणारी एक घटना घडली. संकुलातील साबरमती बिल्डिंगमध्ये लिफ्टचा भीषण अपघात झाला, ज्यामध्ये एक रहिवासी मृत्यूच्या दारातून सुखरूप परतला आहे. या संपूर्ण घटनेचे थरारक सीसीटीव्ही फुटेज समोर आले असून, ते पाहून पाहणाऱ्यांच्या अंगावर काटा येत आहे.मिळालेल्या माहितीनुसार, साबरमती बिल्डिंगमध्ये राहणारे वत्सलभाई पंचाल हे सकाळी आपल्या कामासाठी लिफ्टने जात होते. ते लिफ्टमध्ये प्रवेश करत असतानाच अचानक लिफ्टमध्ये तांत्रिक बिघाड झाला आणि लिफ्ट कोसळली.

### हवामानाचा लपंडाव

**मुंबई :** महाराष्ट्रातील हवामानात सध्या कमालीची अनिश्र्चितता पाहायला मिळत आहे. अवघ्या आठवड्याभरापूर्वी ज्या राज्यात अवकाळी पाऊस आणि गारठा होता, तिथे आता उन्हाच्या झळा तीव्र झाल्या आहेत. विदर्भातील अकोला शहरात देशातील सर्वाधिक ३८.५ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली असून, राज्याचा पारा वेगाने वर सरकत आहे. दुपारी उन्हाचा कडाका इतका वाढला आहे की, नागरिकांना उन्हाळ्याच्या तीव्रतेची जाणीव मार्चच्या सुरुवातीलाच होऊ लागली आहे. मुंबईसह संपूर्ण कोकण किनारपट्टीवर उष्णतेसोबतच आर्द्रता (र्की-ळवळीूं) वाढल्याने दमट वातावरण निर्माण झाले आहे. यामुळे नागरिक उकाड्याने हैराण झाले आहेत. भारतीय हवामान विभागाने (खचऊ) खबरदारीचा उपाय म्हणून राज्यातील काही भागांत उष्ण आणि दमट हवेचा 'येलो अलर्ट' जारी केला आहे. विशेषतः दुपारच्या वेळी घराबाहेर पडताना काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### २३ कोल्हापूरकर मायदेशी

**कोल्हापूर :** मेरिका-इस्रायल आणि इराण यांच्यातील तणावामुळे सुरू झालेल्या युद्धजन्य परिस्थितीमुळे दुबईत पर्यटनासाठी गेलेल्या कोल्हापुरातील हुपरीमधील २३ पर्यटक अडकले होते. मात्र, आता हा प्रवासी ग्रुप सुरक्षितपणे मायदेशी परतला आहे.

करवीर निवासिनी आई अंबाबाईची कृपा

युद्धजन्य परिस्थितीमुळे दुबईसह आखाती देशांतील विमानसेवा पूर्णपणे विस्कळीत झाली होती. कोल्हापूरकरांनी करवीर निवासिनी आई अंबाबाईच्या आशीर्वादामुळेच आम्ही सुरक्षित परतलो. भारत सरकारने दुबईसह अडकलेल्या सर्वांना परत आणावे, असे मत त्यांनी व्यक्त केले आहे.यूएई प्रशासनाने परतीच्या मार्गावर अडकलेल्या पर्यटकांसाठी दिलगिरी व्यक्त करत ग्रुपमधील प्रत्येकाला २६ हजार रुपयांचे 'सॉरी गिफ्ट' दिले आहे.

### भारत आणि फिनलँडमधील द्विपक्षीय संबंध मजबूत होणार

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारताच्या दौऱ्यावर असलेल्या फिनलँडचे राष्ट्राध्यक्ष अलेक्झांडर स्टब यांचे स्वागत केले. स्टब यांच्या भेटीमुळे भारत आणि फिनलँडमधील द्विपक्षीय संबंध आणखी मजबूत होतील असा विश्वास पंतप्रधान मोदींनी यावेळी व्यक्त केला. पंतप्रधान कार्यालयाने एका निवेदनात म्हटले आहे की, फिनलँडचे राष्ट्राध्यक्ष अलेक्झांडर स्टब आज सकाळी (बुधवार, ४ मार्च) नवी दिल्लीत पोहोचले. परराष्ट्र राज्यमंत्री के. व्ही. सिंह यांनी राष्ट्रपती स्टब यांचे विमानतळावर औपचारिक स्वागत केले आणि त्यांना गार्ड ऑफ ऑनर देण्यात आला. यावेळी पंतप्रधान मोदी म्हणाले की भारत आणि फिनलँडमधील संबंध नवीन उंचीवर पोहोचतील.पंतप्रधान मोदींनी सोशल मीडिया पोस्टमध्ये लिहिले की, भारतात आपले स्वागत आहे, राष्ट्रपती अलेक्झांडर स्टब. मी तुमच्याशी पूर्णपणे सहमत आहे की तुमची भेट भारत-फिनलँड संबंधांना नवीन उंचीवर घेऊन जाईल.

# अमेरिका इस्रायलला इराण देतोय चोख प्रत्युत्तर

## रशियाच्या पॅटर्ननं ट्रम्प यांचं युद्ध गणित बिघडवलं

**तेहरान:** अमेरिकेचा इस्रायल यांच्या संयुक्त हल्ल्यात सर्वोच्च नेते खामेनी आणि बड्या नेत्यांचा मृत्यू झाल्यानंतर इराण नरमाईची भूमिका घेईल असे वाटत होते. मात्र इराणने अधिक आक्रमक होत इस्रायल, अमेरिकेच्या तळांवर हल्ले केले आहेत. बुधवारी इराणने अमेरिकेच्या सौदी अरेबियातील दूतावासावर आणि सीआयएच्या ( अमेरिकेची गुप्तचर संस्था) स्टेशनवर हल्ला केला. इराणने अमेरिका इस्रायल यांच्याविरोधात लढताना रशियाच्या रणनितीचा वापर केला आहे.

**अमेरिकेचे नुकसान**

जिथे अमेरिका कोट्यवधि डॉलरच्या शस्त्रांवर अवलंबून आहे. तर इराण स्वस्त ड्रोनचा वापर करत अमेरिकेच्या सिस्टमला चकवा देत आहे. इराण शाहेद-१३६ ड्रोन ज्याची किंमत २० हजार डॉलर आहे. जी अमेरिकेच्या ४० लाख डॉलरच्या पॅट्रियट मिसाईल सिस्टिम या संरक्षण प्रणालीला दणका देत आहे. याआधीही इराणने आपल्या ड्रोनची क्षमता दाखवली आहे. यामध्ये स्वस्त शस्त्रे महागड्या संरक्षण प्रणालीवर मात करत आहे. अशा कमी खर्चिक ड्रोनला पाडण्यासाठी महागड्या मिसाईलचा वापर केला जात आहे. ज्यामुळे अमेरिकेचे युद्धाचं गणित बिघडलं आहे.

**रशियाचा पॅटर्न अन् युक्रेन...**

रशियाने युक्रेनविरोधात युद्ध लढताना इराणच्या शाहेद ड्रोनच्या रेप्लिकाचा सर्वाधिक वापर केला होता. याचे वैशिष्ट्य असे की हे फार कमी खर्चात बनतात. आणि



या ड्रोन्सना पाडण्यासाठी महागड्या सुरक्षा यंत्रणांसाठी त्रासदायक ठरतात. रशियाने मोठ्या संख्येने या ड्रोनचा वापर करत युक्रेनकडील अमेरिकेच्या एअर डिफेन्स सिस्टिमला सळो की पळो करुन सोडेल. प्रत्येक ड्रोन नष्ट करण्यासाठी युक्रेनला महागड्या मिसाईलचा वापर करावा लागत होता. त्यांच्याकडील सामग्री लवकर संपत होती. रिपोर्टनुसार २०२३ मध्ये युक्रेनचे एअर डिफेन्स सिस्टिम एक्जॉस्ट झाले होते की सर्व हल्ल्यांना थांबवू शकले नाही. रशियाने या रणनितीने युक्रेनची संरक्षण क्षमता कमकुवत केली ज्यामुळे युद्ध लांबले.

जून २०२५ मध्ये इराण इस्रायल यांच्यात १२ दिवसांचे युद्ध झाले होते. त्यावेळी शाहेद आणि इराणच्या दुसर्या ड्रोन्सनी आयरन डोम आणि इतर एअर डिफेन्स सिस्टम्सना एक्जॉस्ट केले होते. आखाती देशातील अमेरिकेच्या तळांवरही इराणने हल्ले चढवले आहेत.

## युद्धाच्या सावटाखालील मराठी नागरिकांसाठी मुख्यमंत्री मदतीला धावले; विशेष व्हॉट्सअॅप हेल्पलाइन जारी

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. ०५ मार्च :** पश्चिम आशियातील वाढत्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर, संयुक्त अरब अमिराती मध्ये वास्तव्यास असलेल्या भारतीय आणि विशेषतः महाराष्ट्रातील नागरिकांच्या सुरक्षेसाठी शासन यंत्रणा सज्ज झाली आहे. अबू धाबीतील भारतीय दूतावास आणि दुबईतील 'काउन्स्युलेट जनरल ऑफ इंडिया'चे प्रतिनिधी सातत्याने तिथल्या नागरिकांच्या संपर्कात आहेत. परराष्ट्र व्यवहार मंत्रालय आणि केंद्र सरकार परिस्थितीवर बारीक लक्ष ठेवून असून, कोणत्याही आपत्कालीन स्थितीला सामोरे जाण्यासाठी तयारी पूर्ण करण्यात आली आहे. भारतीय नागरिकांनी अजिबात घाबरून जाऊ नये, केंद्र सरकार आणि राज्य सरकार तुमच्या पाठीशी ठामपणे उभे आहे, असा विश्वास दूतावासाने दिला आहे.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे स्वतः या प्रकरणावर लक्ष ठेवून असून, ते दुबईतील 'इंडियन पीपल्स फोरम' या संस्थेच्या सतत संपर्कात आहेत. तेथील मराठी बांधवांना कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी विशेष समन्वय साधला जात आहे. महाराष्ट्रातील जे नागरिक सध्या दुबई किंवा अबू धाबीत अडकले आहेत किंवा तिथे वास्तव्यास आहेत, त्यांच्या मदतीसाठी राज्य शासनाने एक अधिकृत व्हॉट्सअॅप क्रमांक देखील जारी केला आहे. या सुविधेमुळे नागरिकांना तातडीची माहिती आणि साहाय्य मिळणे सोपे होणार आहे.

यूएईमधील मराठी नागरिकांनी अफवांवर विश्र्वास न ठेवता अधिकृत माहितीसाठी अबू धाबीतील भारतीय दूतावास (Indemb-buDhabi) आणि दुबईतील काउन्स्युलेट जनरल ऑफ इंडिया (cgidubai) यांच्या 'द' (ट्विटर) खात्यांना फॉलो करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच मदतीसाठी खालील क्रमांकाचा वापर करावा. अधिकृत व्हॉट्सप क्रमांक : +९७१ ५० ३६५ ४३५७

### बीड जिल्ह्यात पेट्रोल डिझेलचा साठा भरपूर

**तभा वृत्तसेवा**

**बीड, दि. ०५ मार्च :** बीड जिल्ह्यामध्ये पेट्रोल व डिझेलचा साठा सद्यस्थितीमध्ये पर्याप्त प्रमाणामध्ये उपलब्ध असून इंधन पुरवठा सुरळीत सुरू आहे. सर्वच पेट्रोल पंप कंपनीच्या विक्री अधिकारी, प्रतिनीधी यांना प्रशासनाच्या मार्फत इंधन पुरवठा सुरळीत ठेवणेकामी आवश्यक त्या सुचना देण्यात आलेल्या आहेत. बीड जिल्ह्यात कोणत्याही प्रकारचा इंधन तुटवडा नाही. सर्व पेट्रोल पंपांवर नियमितपणे इंधनाचा पुरवठा सुरु आहे तसेच परदेशात अडकलेले बीडचे लोक सुखरूप आहेत लवकरच वापस बीडमध्ये येण्याची सोय केली आहे.


## 'अर्थसंकल्प सोप्या भाषेत' हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे पुस्तक संकेतस्थळावर उपलब्ध

**तभा वृत्तसेवा**

**नागपूर, दि. ०५ मार्च :** येत्या ६ मार्च रोजी मुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री देवेंद्र फडणवीस हे वर्ष २०२६-२०२७ या आर्थिक वर्षासाठी विधानसभेत अर्थसंकल्प सादर करणार आहेत. हा अर्थसंकल्प सर्व सामान्यांना समजावा, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लिहिलेले 'अर्थसंकल्प सोप्या भाषेत' हे पुस्तक उपयुक्त ठरणार असून सर्वांसाठी संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

राज्याच्या आर्थिक प्रगतीचे धोरण असणारा अर्थसंकल्प सर्व सामान्यांना समजावा यासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांनी 'अर्थसंकल्प सोप्या भाषेत' हे पुस्तक लिहिले. आजच्याच दिवशी (४ मार्च) २०२० मध्ये हे नागपूर येथील लाखे प्रकाशनाने हे पुस्तक प्रकाशित केले आहे.

या पुस्तकात 'बजेट' शब्दाच्या उत्पत्तीपासून अर्थसंकल्प समजून घेण्यापूर्वी कोणत्या बाजू समजून घ्याव्यात हे सांगितले आहे. अर्थसंकल्प विषयक संज्ञा व त्यासाठी होणारे मराठी व इंग्रजी शब्द प्रयोग, काही महत्वाच्या संकल्पनांचे स्पष्टीकरण, अर्थसंकल्पाविषयी भारतीय संविधानातील तरतुदी, अर्थसंकल्पाची रचना, अर्थसंकल्प तयार होण्याची प्रक्रिया, अर्थसंकल्पीय प्रकाशने, अर्थसंकल्पास मिळणारी मंजुरी या विषयांसह अर्थसंकल्प कसा वाचावा आणि समजून घ्यावा याविषयी सविस्तर विवेचन करण्यात आले आहे. अर्थसंकल्पातील पांढऱ्या रंगाचे मुख पृष्ठ असलेले अर्थसंकल्पीय अंदाज (व्हाईट बुक) हे प्रकाशन आणि यात सापडणारे ग्रीन बुक मधील अर्थसंकल्पीय तरतुदींचे विस्तृत विवरण सोप्या




भाषेत समजावून सांगण्यात आले आहे. शासनाच्या विविध विभागनिहाय व विकास मंडळनिहाय अनिवार्य विकास खर्चाची माहिती तसेच राज्यघटनेच्या अनुच्छेद ३७१ (२) (ब) नुसार प्रादेशिक अनुशेष निर्मुलनासाठी राज्यपालांच्या निर्देशानुसार शासनाने सादर करायचा अनुपालन आदेश यासह अर्थसंकल्प सादर करणे, मंजूर करणे त्याचे कायद्यात रुपांतर होणे आणि शासनास राज्याच्या एकत्रित निधीतून खर्च करण्यास परवानगी मिळणे आदी टप्पे या पुस्तकात सोप्या भाषेत समजावून सांगितले आहेत.

येथे वाचता येणार पुस्तक

अर्थसंकल्प समजून घेण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लिहिलेले 'अर्थसंकल्प सोप्या भाषेत' हे पुस्तक https://www.devendrafadnavis.in/budgetš2020 या संकेतस्थळावर सर्वांसाठी उपलब्ध असून त्यातून अर्थसंकल्प समजून घेण्यास मोठी मदत होणार आहे, असे माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या नागपूर संचालक कार्यालयाने प्रसिद्धीस दिले आहे.

### हरवलेल्या महिला शोधण्यासाठी राज्यात स्पेशल सेल

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. ०५ मार्च :** हरवलेल्या महिलांना शोधण्यासाठी राज्य शासनाने स्पेशल सेल तयार केला आहे. या सेलमध्ये अतिरिक्त महासंचालक (एडीजी) स्तराच्या महिला अधिकाऱ्यांना नेमण्यात आले आहे. या शोध मोहिमांचे नियोजन आणि अंमलबजावणी ते पाहतात. या विशेष सेलने केलेल्या कामामुळे गेल्या वर्षभरात सापडलेल्या महिलांची संख्या १० टक्क्यांनी वाढली असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेत प्रश्न्नोत्तराच्या तासात दिली. याबाबत सदस्य निरंजन डावखरे यांनी प्रश्न्न उपस्थित केला. तर सदस्य भाई जगताप यांनी उपप्रश्न्न उपस्थित केला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, स्पेशल सेलच्या माध्यमातून महिला अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली नियमित बैठकांचे आयोजन करून प्रगतीचे परीक्षण केले जाते, तसेच हरवलेल्या महिलांच्या शोधासाठी राज्यभरात मोहिम हाती घेतल्या जात आहेत. पहिल्या वर्षभरात साधारण ५५ ते ६० टक्के महिलांचा शोध लागतो, तर अडीच ते तीन वर्षांच्या कालावधीत हा आकडा ९० टक्क्यांपर्यंत पोहोचतो. राज्य शासनाचे उद्दिष्ट ९५-९६ टक्क्यांपर्यंत पोहोचणे आहे आणि तोपर्यंत काम थांबवले जाणार नाही. दरवर्षी नवीन ऑपरेशन्स राबवून हरवलेल्या महिलांच्या शोधात सुधारणा करण्यावर शासन भर देत असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

## राज्यसभेसाठी भाजपची यादी जाहीर : महाराष्ट्रातून विनोद तावडे, रामदास आठवले, रामराव वडकुते, माया इवनाते यांना उमेदवारी

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. ०५ मार्च :** राज्यसभेसाठी भाजपने आज उमेदवार यादी जाहीर केली. महाराष्ट्रातून विनोद तावडे, रामदास आठवले, रामराव वडकुते आणि माया इवनाते यांना उमेदवारी देण्यात आली आहे. महाराष्ट्रातील राज्यसभेच्या ७ जागांसाठी १६ मार्च रोजी मतदान होणार आहे.

भाजपचे राष्ट्रीय महासचिव अरुण सिंह यांनी ही यादी जाहीर केली. राज्यसभेसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख ५ मार्च असून, ६ मार्च रोजी अर्जांची छाननी होईल. उमेदवारांना माघार घेण्यासाठी ९ मार्चपर्यंतची मुदत आहे.

विनोद तावडे महाराष्ट्र विधान परिषदेत विरोधी पक्षनेतेपद भूषविले आहे. त्यांनी शालेय शिक्षण, उच्च आणि तांत्रिक शिक्षण, क्रीडा आणि युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास तसेच मराठी भाषा (भाषा) आणि संस्कृती खात्याचे मंत्रिपदही भूषविले आहे. मात्र, त्यानंतर पुन्हा त्यांना पक्षसंघटनेत काम करण्याची संधी देण्यात आली. सध्या ते भाजपच्या महाराष्ट्र युनिटचे सरचिटणीस आहेत. अखिल भारतीय राष्ट्रीय कार्यकारी परिषदेचे सदस्य आणि १२ व्या आणि १३ व्या लोकसभा निवडणुकीसाठी भाजपच्या



समन्वय समितीचेही ते प्रमुख सदस्य होते. आता राज्यसभेची उमेदवारी मिळाल्यामुळे ते पुन्हा एकदा संघटनात्मक कामातून मुख्य प्रवाहात आलेत.

रिपाइंचे रामदास आठवले यांना यंदा राज्यसभेची उमेदवारी मिळणार की नाही, याबाबत साशंकता होती. त्यांची पत्ता कट होणार, अशी शक्यताही वर्तवली जात होती. मात्र, भाजपने आपल्या कोट्यातून सलग तिसऱ्यावेळेस आठवलेंना राज्यसभेची संधी दिलीय. विशेष म्हणजे रामदास आठवले यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मंगळवार ३ मार्च रोजी भेट घेतली होती. त्यांनी स्वतः एक्सवर पोस्ट करून याबाबत माहिती दिली होती. ते म्हणाले होते की, 'मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी भेट घेऊन येऊ घातलेल्या राज्यसभा निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर सविस्तर चर्चा झाली. सध्याच्या राजकीय परिस्थितीचा आढावा घेत पुढील रणनीती, समन्वय आणि व्यापक राजकीय घडामोडींवर विचारविनिमय करण्यात आला.'

हिंगोली जिल्ह्यातले भाजप नेते व माजी आमदार रामराव वडकुते यांना यंदा भाजपने राज्यसभेची उमेदवारी जाहीर केलीय. धनगर समाजाचे नेते ही वडकुते यांची ओळख. ते २००४ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये होते. त्यांना पक्षाने विधानसभेची उमेदवारीही दिली होती. मात्र, त्यांचा पराभव झाला. पुढे २००९ मध्ये ही जागा काँग्रेसच्या वाट्याला गेली. येथून युवक काँग्रेसचे तत्कालीन अध्यक्ष राजीव सातव यांची वर्णी लागली. त्यानंतर वडकुते यांना राष्ट्रवादी काँग्रेसने विधान परिषदेवर पाठवले. मात्र, २०१९ विधानसभा निवडणुकीपूर्वी ते भाजपमध्ये आले. आता त्यांना पक्षाने राज्यसभेची उमेदवारी दिलीय.

आदिवासी नेत्या असणारे माया इवनाते या सध्याच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या निकटवर्तीय म्हणून गणल्या जातात. अनुसूचित जमातीच्या राष्ट्रीय आयोगावर त्यांनी सदस्य म्हणून काम केलेय. त्या नागपूरच्या माजी महापौर राहिल्या आहेत. नुकत्याच झालेल्या महापालिका निवडणुकीतही त्या नगरसेवक म्हणून निवडून आल्या होत्या. सध्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसही नागपूरचे आहेत. त्यामुळे नागपूरच्या लेकीला भाजपने राज्यसभेची संधी दिलीय.

**कोणाची मुदत संपतेय?**

महाराष्ट्रातून सात राज्यसभा खासदारांची मुदत संपत आहे. त्यात शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमधून स्वतः शरद पवार आणि फौजिया खान, काँग्रेसमधून रजनी पाटील, उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेतून प्रियांका चतुर्वेदी, भाजपकडून धैर्यशील पाटील आणि भागवत कराड, तर रिपाइंचे रामदास आठवले यांची राज्यसभेच्या खासदारकीची मुदत संपतेय. त्यामुळे या रिक्त जागांवर ही निवडणूक होतेय. यात रामदास आठवले यांना पुन्हा एकदा भाजपच्या कोट्यातून उमेदवारी देण्यात आलीय.

**कोणाला किती जागा मिळतील?**

महाराष्ट्रातील विधानसभेतले सध्याचे संख्याबळ पाहता, भाजपचे सर्वाधिक ४ उमेदवार निवडून येण्याची शक्यताय. एकनाथ शिंदेंची शिवसेना १, अजित पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस १ आणि महाविकास आघाडीची १ जागा या ठिकाणी निवडून येऊ शकते. संख्याबळानुसार चौथी जागा निवडून आणण्यासाठी भाजपला कसरत करावी लागेल. राज्यातील ७ जागांसाठी प्रत्येकी ३७ मतांचा कोटा निश्र्चित केला आहे.

**विरोधकांना पुन्हा धक्का?**

भाजपला चौथ्या जागेसाठी ३७ मते पूर्ण करताना काही अपक्ष आणि मित्रपक्षांच्या अतिरिक्त मतांची गरज भासेल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे राज्यसभा आणि विधान परिषद निवडणुकीच्या गणितात माहीर मानले जातात. यापूर्वीही त्यांनी कमी संख्याबळ असताना उमेदवार निवडून आणून विरोधकांना धक्का दिलाय. त्यामुळे यावेळीही अपक्ष आमदारांची मदत घेऊन भाजप आपली चौथी जागा सुरक्षित करतील, असे जाणकार सांगतायत.

## थोडक्यात...

### एण्ड टीव्ही कलाकारांची रंगतदार होळी

**छत्रपती संभाजीनगर** : एण्ड टीव्हीवरील कलाकारांनी होळीचे नियोजन, परंपरा आणि आठवणी शेअर केल्या. 'हे भगवान - कितना बदल गया इन्सान'मधील जयशंकर त्रिपाठी यांनी मूळगावातील होळी, गुजिया-थंडाई आणि सेटवरील सेलिब्रेशनची उत्सुकता व्यक्त केली. 'घरवाली पेडवाली'तील सीरत कपूरसाठी होळी म्हणजे मैत्री, संगीत आणि गोड पदार्थांचा आनंद. 'हप्पू की उलटन पलटन'चे योगेश त्रिपाठी यांनी होलिका दहन व कुटुंबीयांसोबतचा पारंपारिक उत्सव सांगितला. 'भाबीजी घर पर है २.०'मधील शिल्पा शिंदे यांनी पुरणपोळी-श्रीखंड आणि नैसर्गिक रंगांवर भर दिला. प्रेक्षकांनी या विशेष भागांचा आनंद घ्यावा, असे आवाहन करण्यात आले.

### अमेझॉन ची झिरो रेफरल फी घोषणा

**छत्रपती संभाजीनगर** : अमेझॉन इंडियाने १२.५ कोटी उत्पादनांवर झिरो रेफरल फी जाहीर केली. १००० रुपयांखालील १८००+ विभागांतील वस्तूंना सवलत लागू होणार असून १६ मार्च २०२६पासून अंमलबजावणी होईल. ३०० रुपयांखालील उत्पादनांच्या इझीशिप शुल्कात २०% कपात; मल्टी-युनिट शिपमेंटवर दुसऱ्या युनिटसाठी ९०%पर्यंत फी बचत शक्य. कंपनीनुसार, विक्रेत्यांना एकूण फीमध्ये ७०%पर्यंत बचत होईल आणि नव्या विक्रेत्यांची संख्या वार्षिक तुलनेत ५०% वाढली आहे. टिअर-२ व टिअर-३ शहरांतील लघु-मध्यम व्यवसायांना यामुळे चालना मिळण्याची अपेक्षा.

### ॲथलीजर खरेदी अनुभव आणखी सोपा

**अहिल्यानगर** : फिनिक्स मार्केटसिटी पुणे आता शहरातील स्पोर्ट्स आणि ॲथलीजर खरेदी अनुभव आणखी सोपा आणि आनंददायी बनवत आहे, कारण अनेक प्रसिद्ध ब्रँड्सचे स्टोअर्स आता एका ठिकाणी उपलब्ध आहेत. यामध्ये नाइकी, ॲडिडास, असिक्स, स्केचर्स यांचे प्रमुख फ्लॅगशिप स्टोअर्स आहेत, तसेच न्यू बॅलन्स, रिबॉक, प्यूमा, एक्सस्टेपसारखे ब्रँड्स देखील येथे आहेत. या नवीन झोनमुळे पुण्यातील खरेदीदारांना स्पोर्ट्स आणि ॲथलीजर उत्पादनांचे अनेक पर्याय एकाच ठिकाणी मिळतात. फिनिक्स मार्केटसिटीने या झोनच्या माध्यमातून पुण्यातील वाढती फिटनेस संस्कृती आणि बदलत्या ग्राहकांच्या गरजा लक्षात घेऊन एक खास स्पोर्ट्स आणि ॲथलीजर झोन तयार केला आहे.

### 'द वन अँड ओन्ली' केले प्रस्तुत

**छत्रपती संभाजीनगर** : ब्लेंडर्स प्राईड पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर, पिढ्यान् पिढ्या यशाची वेगळीच लेव्हल सेट करणारा कल्चरल आयकॉन, आता त्याची नवीन मोहिम 'द वन अँड ओन्ली' घेऊन आलाय - जी आहे यशाची एकदम दमदार आणि फ्रेश स्टोरी. आजच्या जगात यशाची चिन्हं सगळीकडेच दिसतात, आणि स्पर्धाही जबरदस्त वाढलीये. पण ब्रँड पुन्हा एकदा तेच सांगतो - खरं यश वेगळेपणात आहे - जे लोकांना आपोआप प्रभावी करते आणि माणसाला सगळ्यांपेक्षा खूप पुढे नेऊन उभं करतो.

### गुरचरण दास यांना जागतिक परिषदेत 'लाईफटाईम लिबर्टेरियन' पुरस्कार जाहीर

**मुंबई :** प्रसिद्ध भारतीय लेखक आणि प्रख्यात विचारवंत गुरचरण दास यांना प्रतिष्ठेचा 'लाईफटाईम लिबर्टेरियन पुरस्कार' जाहीर झाला आहे. नेपाळमधील काठमांडू येथे ७ ते ९ ऑगस्ट २०२६ या कालावधीत आयोजित केल्या जाणाऱ्या ४० व्या 'लिबर्टी इंटरनॅशनल वर्ल्ड कॉन्फरन्स'मध्ये त्यांना हा सन्मान प्रदान करण्यात येईल.२०२४ मध्ये या पुरस्काराची जागतिक स्तरावर सुरुवात करण्यात आली. तेव्हापासून हा पुरस्कार मिळवणारे गुरचरण दास हे पहिलेच भारतीय ठरले आहेत. जगभरात स्वातंत्र्याच्या प्रसारासाठी ज्या व्यक्तींच्या विचारांनी आणि नेतृत्वाने चिरकाल टिकणारे योगदान दिले आहे, अशा व्यक्तींचा या पुरस्काराने गौरव केला जातो. गेल्या तीन दशकांतील भारताच्या आर्थिक वाटचालीवरील सार्वजनिक चर्चा आणि देशाच्या विकासाला आकार देणाऱ्या विचारांमधील गुरचरण दास यांच्या महत्त्वपूर्ण योगदानाची या सन्मानामुळे दखल घेण्यात आली आहे.

### एआय प्लस स्मार्टफोनने प्लस २ लॉन्च केला

**पुणे :** एआय प्लस स्मार्टफोन ने आज प्लस २ सादर केला, जो भारतात तंत्रज्ञान अधिक सर्वसामान्य करण्याच्या ब्रँडच्या ध्येयातील पुढचा टप्पा आहे. साधेपणा, स्मूथ अनुभव आणि आत्मविश्र्वास वाढवणारी कामगिरी देण्यावर प्लस २ ची रचना करण्यात आली आहे. विश्र्वासार्ह परफॉर्मन्स, दिवसभर साथ देणारी बॅटरी आणि सहज फोटोग्राफी या दैनंदिन गरजांवर तो आधारित आहे. प्लस २ ची विक्री ११ मार्च रोजी दुपारी १२ वाजल्यापासून फ्लिपकार्ट वर सुरू होईल.

# नंदिश्वर दिगंबर जैन अतिशय क्षेत्र पंचाळेश्वर येथे वार्षिक यात्रा संपन्न; भगवंतांच्या अभिषेकाने यात्रेची उत्साहात सांगता

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर , दि. ०५ मार्च :** पंचाळेश्वर येथील दिगंबर जैन समाजाचे श्री १००८ नंदिश्वर दिगंबर जैन अतिशय क्षेत्र हे भारत भर अद्वितीय द्वीप असे प्रसिध्द आहे. गोदावरी नदीकाठेवर असलेले हे क्षेत्र अत्यंत दिव्य असून येणार्या भाविकांचे आकर्षण ठरत आहे. वार्षिक यात्रा महोत्सव २०२६ व पंचामृत अभिषेक सोहळा हा उत्साहात संपन्न झाला. सर्वप्रथम सालाबादा प्रमाणे भव्य शोभा यात्रा काढण्यात आली होती. तदनंतर अनिता राजेश नयन अनुराग गितांश बडजाते परिवार पाचोडवाला यांच्या हस्ते ध्वजारोहन करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. भगवंतांचा भव्यदिव्य असा पंचामृत अभिषेक करण्यात आला ज्यामध्ये इंद्र-इंद्राणी होण्याचा मान सौ. स्वाती दिपक खोबरे यांना मिळाला तर शांती मंत्राचा मान तुषार विजय जैन यांना मिळाला. तसेच जल अभिषेक श्रेयांस सचिन काला, दुग्ध अभिषेक संगीता गिरीश,साहील जैन परिवार,





इक्शुरस अभिषेक पदमकुमार अजमेरा, सर्व औषधी सरलाबाई माणिकचंद पहाडे यांना मिळाला. यावेळी नंदीश्र्वर विधान-पुजन ही करण्यात आले.

उपस्थित भाविकांना महाप्रसाद-ाचे आयोजन स्व.हरकचंदजी काला, स्व.पुनमचंद काला, स्व.मदनलालजी काला, स्व. बबनलालजी काला, स्व.माणिकचंद काला, स्व.फुलचंदजी काला, स्व.हुकुमचंद काला यांच्या स्मरणार्थ गुलाबचंदजी काला परिवार उमापुरवाला छत्रपती संभाजीनगर, कोपरगांव, कन्नड, पुणे यांच्या वतीने करण्यात आला.

विशेषतः यावेळी भाविकांनी पांढरे वस्त्र परिधान केले होते. तर महिलांनी केशरी व पिवळ्या रंगाच्या साड्या परिधान केल्या होत्या. वार्षिक यात्रे-चे औचित्य साधुन मंदिर परिसरावर आकर्षक रोषणाई करण्यात आली. त्यामुळे मंदिर परिसर उजळुन निघाला होता. यावेळी श्रीपद्मप्रभु भगवंतांच्या विशालमुर्तीवर दुध, दही, केशर आदि रसांनी अभिषेक करण्यात आला. यावेळी भाविकांनी शुध्द सोहळ्याचे वस्त्र परिधान केले होते. यात्रेसाठी छ. सभांजीनगर, बीड, गेवराई, पा-चोड, ऊमापुर,राक्षसभुवन, धोंडराई, आडुळ, लासुर, जालना, देऊळगांव राजा,विहामांडवा, पैठण, अंबड, वैजापूर, मालेगांव, कोपरगाव आदि ठिकाणाहून शेकडो भाविक उपस्थित होते. एम.आर.बडजाते, प्रमोद कासलीवाल, प्रकाश कासलीवाल, डॉ. अशोक ठोले, संजय रणदिवे, नगर अध्यक्ष गिताबाई पवार, नरेंद्र पहाडे जालना, सचिन पाटणी, प्रमोद गोधा, जालना, जयकुमार बाकलीवाल पा-चोड, श्रीमती मगंला सुगनचंदजी कासलीवाल आदी भक्तगण उपस्थित होते. मंचसचांलन प्रवीणजी लोहाडे यानीं केले. या महोत्सव साठी छत्रपती संभाजीनगर शहराच्या विविध भागा-तुन भाविकांसाठी निशुल्क बसेसची व्यवस्था करण्यात आली होती.

संपुर्ण कार्यक्रम हा क्रार्तिकारी जैनाचार्य श्री गुप्तीनंदींजी गुरुदेव , आचार्य मयंकसागरजी गुरुदेव यांच्या आशीर्वादाने घेण्यात आला होता. यात्रा यशस्वी करण्यासाठी क्षेत्राचे अध्यक्ष गौतमचंद काला, सचिव भाउसाहेब बाकलीवाल, उपाध्यक्ष वृषभकुमार गंगवाल, उपाध्यक्ष सुहास चुडीवाल, कोषाध्यक्ष संजय सेठी, सहसचिव विजय पापडीवाल, कैलास खोबरे, विश्वस्थ प्रकाश सेठी,विलास पहाडे, भगव-ानदास काला,अशोक कासलीवाल,डॉ. राजेद्र काला, संदिप कासलीवाल,संतोष अजमेरा, हिरालाल घोदलकर, सुनिल पाटणी यांच्यासह विश्वस्थ कार्यकारणी मंडळाने केले असल्याची माहिती प्रचार प्रसार संयोजक नरेंद्र अजमेरा व पियुष कासलीवाल यांनी दिली.

## नवीन भव्य प्राथमिक आरोग्य केंद्राला लोकप्रतिनिधींची अचानक भेट; स्वच्छता व वेळेवर सेवेसाठी कडक सूचना

**तभा वृत्तसेवा**

**लासूर स्टेशन, दि. ०५ मार्च :** नव्याने उभारण्यात आलेल्या भव्य प्राथमिक आरोग्य केंद्राला पंचायत समिती सदस्य सुनील पाखरे तसेच नव-निर्वाचित जिल्हा परिषद सदस्य संगीता आमराव व संदीप आमराव यांनी संयुक्तपणे अचानक भेट देत आरोग्य सेवेची पाहणी केली. यावेळी इमारतीची स्वच्छता, औषध साठा, रुग्ण नोंदवही, तपासणी कक्ष तसेच डॉक्टर व कर्मचाऱ्यांची उपस्थिती याबाबत सविस्तर माहिती घेण्यात आली. रुग्णालय परिसर, औषध वितरण कक्ष व शौचालये नियमित स्वच्छ ठेवावीत, याबाबत स्पष्ट सूचना देण्यात आल्या. लोकप्रतिनिधींनी सर्व वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना वेळेवर दैनंदिन हजर राहून रुग्णांना तत्पर सेवा देण्याचे निर्देश दिले. रुग्णांची अनावश्यक प्रतीक्षा होऊ नये, प्रत्येक रुग्णाला वेळेवर तपासणी व उपचार मिळावेत, यावर त्यांनी भर दिला.आरोग्य केंद्रात येणाऱ्या नागरिकांना कोणतीही गैरसोय होणार नाही याची दक्षता घ्यावी तसेच तक्रारींचे तात्काळ निराकरण करावे, असेही त्यांनी सांगितले. उपस्थित अधिकाऱ्यांनी दिलेल्या सूचनांचे पालन करून अधिक दर्जेदार व प्रभावी आरोग्य सेवा देण्याची ग्वाही दिली.



## एअरबीएनबी कडून १०० दशलक्ष डॉलर्सचा कम्युनिटी फंड; भारतातील आठ संस्थांना लाभ

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर , दि. ०५ मार्च :** एअरबीएनबी आपल्या १०० दशलक्ष डॉलर्सच्या 'कम्युनिटी फंड' उपक्रमांतर्गत भारतातील आठ ना-नफा संस्थांना देणग्यांची घो-षणा केली आहे. २०२० मध्ये स्थापन करण्यात आलेल्या या फंडचा उद्देश स्थानिक समुदायांचे आर्थिक सक्षमीकरण, शाश्र्वत पर्यटन, पर्यावरणीय शाश्र्वतता आणि असुरक्षित घटकांचे संरक्षण या क्षेत्रांत दीर्घकालीन परिणाम साधणे हा आहे.

यंदा जागतिक पातळीवर सुमारे १० दशलक्ष डॉलर्सच्या देणग्या विविध संस्थांना वितरित करण्यात आल्या. भारता-तील लाभार्थी संस्थांमध्ये गुंज, एकात्मिक विकास आणि



संशोधन मंच, प्रवेश विकास सेवा, कीस्टोन फाउंडेशन, स्त्री मुक्ती संघटना, आसमान फाउंडेशन, प्रोत्साहन इंडिया फाऊंडेशन आणि समाज कल्याणासाठी नवगुरुकुल फाउंडेशन यांचा समावेश आहे. या संस्था ग्रामीण उपजीविका, महिला उद्योजकता, शिक्षण, कौशल्यविकास आणि सामाजिक संरक्षण या क्षेत्रांत कार्यरत आहेत.

एअरबीएनबी भारत व आग्नेय आशियाचे कंट्री हेड अमनप्रीत बजाज यांनी सांगितले की, स्थानिक समाज हा कंपनीच्या कार्याचा केंद्रबिंदू असून तळा-गाळातील शाश्र्वत संधी निर्माण करणाऱ्या संस्थांना पाठिंबा देणे ही दीर्घकालीन सामाजिक बांधिलकीचा भाग आहे.

## ब्लू माऊंटेन प्री स्कूल मध्ये होळीसणाचा जल्लोष; लहानग्यांनी नृत्य-नाटकातून जिंकली मने

**तभा वृत्तसेवा**

**बिडकीन, दि. ०५ मार्च :** पैठण तालुक्यातील बिडकीन येथील ब्लू माऊंटेन प्री स्कूल येथे दि. ०२ फेब्रुवारी २०२६ रोजी होळी सण अत्यंत उत्साहात आणि आनंदमय वातावरणात साजरा करण्यात आला.

शाळेचा परिसर रंगांनी, हास्याने आणि लहानग्यांच्या उत्साहाने फुलून गेला होता. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद झळकत होता आणि संपूर्ण वातावरणात सणाचा उत्साह जाणवत होता. कार्यक्रमाची सुरुवात शाळेच्या शिक्षिका सौ. रेखा चव्हान यांच्या मार्गदर्शनपर भाषणाने झाली. त्यांनी विद्यार्थ्यांना होळी सणाचे धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक महत्त्व अतिशय सोप्या आणि समजण्यासारख्या शब्दांत सांगितले. होळी हा सण वाईटावर चांगल्याचा विजय दर्शवणारा सण असून, प्रेम, एकोपा आणि बंधुभाव वाढवणारा सण आहे, असे त्यांनी सांगितले. तसेच सुरक्षित आणि पर्यावरणपूरक पद्धतीने




होळी साजरी करण्याचा संदेशही विद्यार्थ्यांना देण्यात आला. यानंतर विद्यार्थ्यांनी होळी निमित्त आकर्षक सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. लहानग्यांनी रंगीबेरंगी वेशभूषेत सुंदर नृत्य सादर करत उपस्थितांची मने जिंकली. काही विद्यार्थ्यांनी होळीच्या पार्श्र्वभूमीवर छोटेखानी नाटक सादर करून सणाचा संदेश प्रभावीपणे मांडला. त्यांच्या निरागस अभिनयाने आणि आत्मविश्र्वासपूर्ण सादरीकरणाने सर्व उपस्थित मंत्रमुग्ध झाले. कार्यक्रमानंतर शाळेच्या परिसरात विद्यार्थ्यांनी सुका व सुरक्षित रंग खेळत आनंदाने होळी साजरी केली. एकमेकांना रंग लावत हॅपी होळीच्या शुभेच्छा देताना विद्यार्थ्यांमध्ये आनंद आणि उत्साह ओसंडून वाहत होता. शिक्षकांनीही विद्यार्थ्यांसोबत सहभाग घेत सणाची शोभा वाढवली. या कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन सौ. ज्योती राठोड यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मनाप-ासून परिश्रम घेतले. त्यांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे हा सोहळा अत्यंत यशस्वी आणि संस्मरणीय ठरला.

### लाइटस्टाईल पहिल्या स्वतंत्र दालनाचे उद्घाटन

**छत्रपती संभाजीनगर:** पीएनजी ज्वेलर्सच्या लाइटस्टाईल बाय पीएनजी या लाईट वेट दागिन्याच्या ब्रांडने छत्रपती संभाजीनगर येथे आपले आपले ७ वे दालन सुरू करत ब्रँडच्या रिटेल विस्ताराला गती दिली आहे.एमआयडीसी चिखलठाणा येथील प्रोझोन मॉल, ग्राउंड फ्लोअर, शॉप क्र. ३१ येथे सुमारे १२०० चौ. फूट क्षेत्रफळात उभारण्यात आलेले हे स्टोअर ब्रँडसाठी एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरेल.

**श्री. सिध्देश्वर कृषि उत्पन्न बाजार समिती, सोलापूर**

श्री. सिध्देश्वर बाजारपेठ, हैदराबाद रोड, सोलापूर-४१३००५ फोन नं. २३७४६७८

**जाहीर ई-टेंडर नोटीस**

जा.नं.ई-टेंडर/३१७० दिनांकः- २८/०२/२०२६

कृषि उत्पन्न बाजार समिती, सोलापूर येथील कामांकरीता योग्य वर्गात नोंदणीकृत कंत्राटदारांकडून बी-१ नमुन्यातील टेंडर https://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर श्री. सिध्देश्वर बाजार पेठेतील मुख्य कार्यालयातील पहिल्या मजल्यावरील मिटींग हॉलमधील फर्निचरची दुरुस्ती करणे व नुतनीकरण करणेचे रु.१६७७८९९/- या कामाकरीता दि. ०४/०३/२०२६ ते दि. १८/०३/२०२६ पर्यंत ई-टेंडरने मागवीत आहे. सदर ई-टेंडरची सविस्तर माहिती वरील वेबसाईटवर उपलब्ध आहे.

आर्किटेक्ट, शरदचंद्र एच. भोसले ॲन्ड असोसिएट्स कुर्डूवाडी, ता. माढा, जि. सोलापूर

सही/- सचिव

सही/- सभापती

श्री सिध्देश्वर कृषि उत्पन्न बाजार समिती, सोलापूर

जा.क्र./जे-३/1074/२०२६
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
छत्रपती संभाजीनगर. दि. 04 MAR 2026

**चौकशीची जाहीर नोटीस**

सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नोंदणी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर.

चौकशी अर्ज क्रमांक जे-३/६०९/२०२५ - कलम :- १९

न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक: श्री. मारुती महाराज देवस्थान म्हसला खु. ता. सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर बाबत...

अर्जदार :- श्री. सुखदेव रामराव सपकाळ

सर्व संबंधित लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते कि, सहाय्यक धर्मादाय आयुक्त छत्रपती संभाजीनगर विभाग छत्रपती संभाजीनगर हे वर नमुद केलेल्या अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वत व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुददयावर चौकशी करणार आहेत.

१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय आणी सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय?

२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत न्यासाच्या मालकीची आहे काय?

अ) जंगम मालमत्ता (वर्णन) काही नाही

ब) स्थावर मिळकत (वर्णन)

मिळकत क्र. १५१ मधील श्री मारोती महाराज देवस्थान म्हसला खु. २९ = ८९९ चौरस फुट विट सिमेंट बांधकाम सदरील मिळकतीच्या ३१ × २० = ६२० चौरस फुट सहन जागा व ३१ चतु: सिमा खालीलप्रमाणे : पूर्वस: रस्ता. पश्चिमेस गाव वेस. उत्तरेस सहाण जागा. दक्षिणेस: सहाण जागा.

अंदाजे किंमत :- (१०००००/-) अक्षरी एक लाख रुपये.

सदर चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असल्यास अगर पुरावा देणेचा असल्यास त्यांनी लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन तीस दिवसांचे आत या कार्यालयात वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजुन चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील ही नोटीस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांचे शिक्यानिशी आज दिनांक ०४/०३/२०२६ रोजी दिली असे.

न्यायशाखा (अधिक्षक)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय छत्रपती संभाजीनगर

# एआययु अन्वेषण आंतरराष्ट्रीय स्पर्धेत एमजीएमने जिंकले द्वितीय पारितोषिक

## 'टीम रिकी'ला मिळाले ५० हजार रुपयांचे रोख पारितोषिक आणि प्रमाणपत्र

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर , दि. ०५ मार्च :** असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीज (एआययू) यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'अन्वेषण' आंतरराष्ट्रीय संशोधन स्पर्धेत महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या जवा-हरलाल नेहरू अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या 'टीम रिकी' संघाने आंतरविद्याशाखीय विज्ञान शाखा या गटात द्वितीय पारितोषिक मिळविले आहे. हिमाचल प्रदेशातील सोलन येथे संपन्न झालेल्या या स्पर्धेत स्टीव्हन डिसिल्वा, महीमा थरेवाल आणि जसज्योत सिंग यांनी प्राध्यापिका डॉ.आरती साळुंके यांच्या मार्गदर्शनाखाली 'प्रोजेक्ट रिकी' सादर केला.

या यशाबद्दल कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू प्रा.डॉ.विलास सपकाळ,




कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर, अधिष्ठाता डॉ. एच.एच.शिंदे, प्राचार्या डॉ. विजया मुसांडे यांनी विजेत्या संघाचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

टीम रिकी या संघाने सादर केलेल्या प्रकल्पात शहरी वाहतुकीतील सुरक्षितता, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढविण्यासाठी विकसित करण्यात आलेल्या या इंटेलिजंट ऑटोरिक्षा मीटरिंग प्रणालीमध्ये डिजिटल भाडे गणना, जीपीएस ट्रॅकिंग, एसओएस आपत्कालीन सुविधा आणि डेटा-आधारित मॉनिटरिंगचा समावेश आहे. विजेत्या संघाला रु. ५० हजारांची रोख रक्कम व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

या स्पर्धेत एमजीएम विद्यापीठाच्या आणखी दोन संघांनीही सहभाग नोंदविला होता. स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीच्या दिया चुफाल आणि उत्कर्ष शिंदे यांनी 'सुर-क्षा' हा एसओएस बटणाद्वारे तत्काळ आपत्कालीन संदेश पाठविणारा कॉम्पॅक्ट सुर-क्षा उपकरण प्रकल्प सादर केला. तसेच इन्स्टिट्यूट ऑफ बायोटेक्नॉलॉजीच्या हिदायत शेख, ध्रुव रवींद्र कल्याणकर आणि श्रेयश होळंबे यांनी केळीच्या तंतूपासून जैव-पॉलिमरच्या साहाय्याने पर्यावरणपूरक लेदरनिर्मितीचा अभिनव 'सिंथेसिस ऑफ बायो-हायब्रिड फ्रॉम बनाना फायबर' हा प्रकल्प सादर केला.

**जाहीर प्रगटन**

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

सिव्हिल एम.ए. क्र. १२४/२०२६

अर्जदार :-१) नलिनी भ्र. चंद्रकांत कुलकर्णी, वय. ७८ वर्षे, धंदा निरंक,रा. दक्षिणमुखी हनुमान मंदिराज-वळ, ब्राम्हण गल्ली, गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर २) राधेशाम चंद्रकांत कुलकर्णी वय. ३७ वर्षे, धंदा नौकरी रा. ब्राम्हण गल्ली, गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ३) सौ. शिल्पा अभय भालेराव, वय ४८ वर्षे धंदा गृहिणी रा. तळगल्ली देगलुर ता. देगलुर जि. नांदेड

विरुध्द

गैरअर्जदार:- निरंक

प्रकरण :-बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ प्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ ड. श्री. रविराज बी. दारुंटे यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र.१ ही अर्जदार क्र.२ व ३ यांची आई असुन अर्जदार क्र.१ चे पति व अर्जदार क्र.२ व ३ यांचे वडील नामे चंद्रकांत पांडुरंग कुलकर्णी हे गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथील कायमस्वरुपीचे रहिवाशी होते, ते वैद्यकीय उपचारादरम्यान धुत हॉस्पीटल, छत्रपती संभाजीनगर येथे दिनांक १०/१०/२०२२ रोजी मयत झाले आहे. तसेच चंद्रकांत पांडुरंग कुलकर्णी यांचे आई व वडील हे यापुर्वीच मयत झालेले आहे. मयत चंद्रकांत पांडुरंग कुलकर्णी यांना अर्जदार क्र.१ ते ३ हेच कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतिरीक्त मयत चंद्रकांत पांडुरंग कुलकर्णी यांना इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाही. करीता मयताचे मृत्युपश्र्चात शासकीय-निमशासकीय व इतर कार्यालयीन कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने या मा. न्यायालयात सदरचा अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तूत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्याचा अस-लेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुदतीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक २५/०२/२०२६ रोजी दिले. प्रकरणात पुढील तारीख दिनांक ०१/०४/२०२६ रोजीची आहे.

वरीष्ठ / कनिष्ठ लिपीक.

आदेशावरून
सहाय्यक अधिक्षक,
दिवाणी न्यायालय गंगापुर

**औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., छ.संभाजीनगर**

मुख्य कार्यालय : डॉ.राजेंद्र प्रसाद मार्ग, अदालत रोड, छ.संभाजीनगर, पिन क्र. ४३१००५. पोस्ट बॉक्स क्र. ५२३
Email ID : chairman@aurangabaddccb.bank.in
दूरध्वनी क्रमांक : 0240-2334491/92, 2334983 (रजि.AGD/BNK/29/01 July 1983)

**नियुक्ती "कार्यकारी संचालक"**

दि औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, छत्रपती संभाजीनगर या बँकेला 'कार्यकारी संचालक' या पदावर नाबार्डच्या फिट अँड प्रॉपर क्रायटेरिया निकषांतर्गत नियुक्ती करावयाची असुन खालील 'अ' ते 'क' पैकी किमान एक शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारांनी खालील माहितीसह मुदतीत अर्ज सादर करावेत.

| अ. क्र. | पद | संख्या | शैक्षणिक अर्हता | अनुभव |
|---|---|---|---|---|
| १. | कार्यकारी संचालक (मुख्य कार्यकारी अधिकारी ) | 0१ | अ) पदवीधर, यासोबत एच.डी.सी.एम/ सी.ए.आय.आय.बी/ डी.सी.बी.एम. किंवा समकक्ष ब) चार्टर्ड अकौंटंट / कॉस्ट अकौंटंट क) पदव्युत्तर पदवी | मध्यम/उच्च व्यवस्थापन स्तरावरील बँकींग क्षेत्राचा किमान आठ वर्षाचा अनुभव असावा. (सहकारी बँकेला प्राधान्य) |

१. वयोमर्यादा : नेमणुकीच्या वेळी उमेदवाराचे वय ६२ वर्षापेक्षा जास्त नसावे.
२. वेतन : अर्हता/अनुभव विचारात घेवून वेतन निश्चित करण्यात येईल.
३. या जाहिरातीमधील वर नमुद पात्रता निकष पुर्ण करणाऱ्या उमेदवारांनी आपला अर्ज संपूर्ण तपशिलासह (बायोडाटा) टाईप करुन दिनांक ११.0३.२०२६ पुर्वी बँकेच्या मुख्य कार्यालयातील प्रशासन विभागात, दि औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, मर्यादित, डॉ.राजेंद्र प्रसाद मार्ग, छत्रपती संभाजीनगर, ४३१ 00५ या पत्त्यावर व वरील ई-मेल आयडीवर पाठवावा.
४. अर्जासोबत लिफाफ्यावर 'कार्यकारी संचालक' या पदासाठी अर्ज असा ठळक उल्लेख असावा.
५. अर्जासोबत शैक्षणिक पात्रता, जन्मतारीख व अनुभव इत्यादींचे प्रमाणपत्रांच्या स्वप्रमाणित सत्यप्रती व स्वतःचे पासपोर्ट आकाराचे अद्यावत फोटो सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा संबंधीताचा अर्ज नाकारण्यात येईल व यासंदर्भात कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.
६. निवडी संदर्भातील अटी शिथिल करण्याचा अधिकार निवड समितीला राहील. प्राप्त अर्जानुसार मुलाखत घेणे / नाकारणे / प्रक्रिया रद्द करणे इत्यादी संदर्भात अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार बँकेने राखुन ठेवलेले आहेत.

किरण पाटील डोणगावकर, उपाध्यक्ष
अर्जुन पाटील गाढे, अध्यक्ष
दि औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक म., छत्रपती संभाजीनगर

दिनांक : 0२.0३.२०२६

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## डॉ. जे. एम. वाघमारे यांना राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलातर्फे श्रध्दांजली

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०४ मार्च :** 'लातूर पॅटर्न'चे जनक, माजी कुलगुरू, माजी खासदार डॉ. जनार्दन वाघमारे यांना राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाच्यावतीने संस्थेचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांच्या हस्ते डॉ. वाघमारे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

थोर विचारवंत, लातूरचे माजी नगराध्यक्ष डॉ. जे. एम. वाघमारे यांचे ह्दयविकाराच्या झटक्याने सोमवारी सकाळी निधन झाले. मंगळवारी त्यांच्या पार्थिवावर कवठा येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. दरम्यान, राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलातील राजमाता जिजामाता प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, राजमाता जिजामाता बी. एड. कॉलेज, संगमेश्वर अध्यापक विद्यालय, तुळजाभवानी इंग्लिश स्कूल, तुळजाभवानी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, संगमेश्वर प्राथमिक विद्यामंदिर येथे डॉ. जे. एम. वाघमारे यांना श्रध्दांजली अपर्ण करण्यात आली. यावेळी संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, उपप्राचार्या कविता केंद्रे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, समन्वयक अश्विनी केंद्रे, प्रा. वैशाली केंद्रे, प्राचार्य जी. आर. मुंडे, समन्वयक राजीव मुंढे, राजेंद्र जायेभाये, प्राचार्य डॉ. आर. एम. चव्हाण, डॉ. नाजनीन सय्यद, प्राचार्य अरुण करदुरे, मुख्याध्यापक अविनाश पवार, पर्यवेक्षक संजय गुरमे, विष्णू कराड, परमेश्वर गित्ते, शिवकांत वाडीकर यांच्यासह शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.



# लातूर जिल्हा परिषद अध्यक्षपदाच्या निवडीत आ. अभिमन्यू पवार समर्थकांचे पारडे जड

## जिल्ह्यातील सुजाण मतदारांतून व्यक्त होत असलेला 'कल'

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०५ मार्च :** प्रत्यक्षात त्रिशंकू अवस्थेत असलेल्या लातूर जिल्हा परिषदेत भाजप - राष्ट्रवादी ( अप गट ) महायुती सत्तेत येणार हे स्पष्ट झाले आहे. या निवडणुकीत भाजपने १८ तर राष्ट्रवादीने १२ जागा जिंकून एकत्रित सत्तेसाठी आवश्यक असणारे संख्याबळ गाठले आहे. जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद सर्वसाधारण गटातील महिलेसाठी आरक्षित असल्याने या पदावर आ. संभाजी पाटील निलंगेकर आणि आ. अभिमन्यू पवार या दोन नेत्यांपैकी कोणाच्या समर्थक उमेदवाराच्या गळ्यात अध्यक्षपदाची माळ पडणार ? याकडे सगळ्यांचे लक्ष आहे. या दोन्ही आमदारांपैकी आ. पवार समर्थक असणाऱ्या लोदगा गटाच्या सदस्या सौ. पूनम मुक्ता यांचे पारडे सद्यः स्थितीत जड असल्याचे निदर्शनास येत आहे. मतदारांतूनही भाजपचे वरिष्ठ नेते निलंगेकर समर्थकाऐवजी पवार समर्थक उमेदवाराची वर्णी या पदावर लावण्यास प्राधान्य देतील असा मतप्रवाह व्यक्त होताना ऐकायला मिळत आहे.



स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत लातूर जिल्ह्यात मागच्या निवडणुकांच्या तुलनेत जिल्हा परिषद आणि लातूर शहर महानगरपालिकेच्या निवडणुकीत भाजपचा टक्का बऱ्यापैकी घसरल्याचे दृष्टीपथास येते. स्थानिक नेतृत्वाकडून हेतूतः झालेल्या चुका या बाबीला कारणीभूत असल्याचे सर्वज्ञात आहे. अगदी शंभर टक्के सत्तेच्या चाव्या हातात येण्याची खात्री असलेली लातूर शहर मनपा अंतर्गत मतभेदातून भाजपच्या नेत्यांनी काँग्रेसकडे सुपूर्द करता येईल अशी परिस्थिती निर्माण केली. परिणामतः लातुरात कधी नव्हे ते भाजप मधील काही निष्ठावंतांनी वेगळी चूल मांडून आपली नाराजी पक्षाच्या शिर्ष नेतृत्वापर्यंत पोहचविण्याचे कामही केले. भाजपच्या प्रदेश उपाध्यक्षपदी नुकतीच वर्णी लागलेल्या डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांना निवडणूक प्रमुख पदावरून बाजूला सारण्याची आ. निलंगेकरांची खेळी अपेक्षेप्रमाणे त्यांच्यावरच उलटली. विधानसभा निवडणुकीत निसटत्या पराभवाचा

**श्रीधर स्वामी**



सामना करावा लागलेल्या डॉ. अर्चनाताईंनी अल्पावधीत भाजपमध्ये आपले वेगळे स्थान निर्माण करण्यात यश संपादन केले आहे. त्यांच्यामुळे आपली कारस्थाने नेत्यांच्या लक्षात येतील, या अनाहूत भीतीपोटीही काही मंडळींकडून चुका घडल्याच्या बाबी आता समोर येत आहेत. शेवटी कोंबडा कितीही झाकून ठेवला तरी सूर्य उगवायचा थांबत नसतो या उक्तीप्रमाणे सारेकाही घडताना दिसतेय.

लातूर जिल्हा परिषदेचे यावेळचे अध्यक्षपद सर्वसाधारण गटातील महिलांसाठी आरक्षित आहे. या साठी भाजपाकडे औसा तालुक्यातील लोदगा गटाच्या सौ. पूनम मुक्ता,



देवणी तालुक्यातील वलांडी गटाच्या उषा पाटील, निलंगा तालुक्यातील सरवडी गटाच्या कविता गोरे आणि रेणापूर तालुक्यातील खरोळा गटाच्या शिवकन्या गोडभरले अशा चार महिला सदस्या चर्चेत आहेत. यामध्ये पूनम मुक्ता आणि उषा पाटील यांच्यापैकी एकाला संधी मिळेल,असा अंदाज लावला जात आहे. मुक्ता आ. पवार समर्थक तर पाटील ह्या आ. निलंगेकर समर्थक आहेत. लातूरच्या राजकारणात आ. पवार आणि आ. निलंगेकर हे दोन्ही नेते एकाच पक्षातील असले तरी त्यांच्यात फारसे सख्य नसल्याचे सर्वांना माहिती आहे. यामध्ये सुरुवातीपासूनच आ. निलंगेकर हे आ. पवारांना दुय्यम स्थान देण्याची एकही संधी सोडत नसल्याचेही निदर्शनास आले आहे. त्यातच आ. पवार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अत्यंत विश्र्वासू मंडळींपैकी एक असल्याने निलंगेकरांच्या तुलनेत पवारांचे पारडे कायम जड राहत असल्याचे वेळोवेळी दृष्टीपथास आले आहे. निलंगेकरांकडून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीदरम्यान जाणते - जाणतेपणे झालेल्या चुकाही एका अर्थाने जिल्हा परिषद अध्यक्षपदाच्या निवडणुकीत त्यांच्या पथ्यावर पडू शकतात. हे दोन्ही आमदार आपल्याच समर्थकाची वर्णी अध्यक्षपदावर लागावी यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत आहेत. आता भाजपचे वरिष्ठ नेते आ. पवारांच्या समर्थकाची या पदासाठी निवड करतात की आ. निलंगेकर समर्थकाची ? याकडे सगळ्यांचे लक्ष लागून राहिले आहे.

## चन्नबसवेश्वर फार्मसी कॉलेजची पोस्टर सादरीकरण स्पर्धेत चमकदार यश

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०५ मार्च :** चन्नबसवेश्वर फार्मसी कॉलेज (डिग्री), लातूर येथील डी. फार्मसी द्वितीय वर्षातील विद्यार्थी अभय हिप्पळणरे आणि दत्तप्रसाद पुरी यांनी औषधनिर्माणशास्त्र संकुल, एम.आय.टी. विश्वप्रयाग युनिव्हर्सिटी, सोलापूर आयोजित राज्यस्तरीय पोस्टर सादरीकरण स्पर्धेत द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक पटकावत महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल केले आहे. सदर स्पर्धेत राज्यभरातील विविध फार्मसी महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला होता. स्पर्धेत विद्यार्थ्यांनी संशोधनाधारित आणि नाविन्यपूर्ण विषयांवर पोस्टर सादर करत आपले कौशल्य प्रदर्शित केले. या यशामुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेला आणि संशोधनपर उपक्रमांना नवे बळ मिळाले असून विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.



या यशाबद्दल संस्थेचे सचिव श्री. भीमाशंकर देवणीकर, विश्वस्त श्री. विजयकुमार मठपती, श्री. अरुण हालकुडे, प्राचार्य डॉ. विजयेंद्र स्वामी, डॉ. ओमप्रकाश भुसनुरे, डॉ. अनंत देशपांडे, डॉ. शिवराज नागोबा, डॉ. विवेक पंचभाई, डॉ. पद्मजा गिराम, डॉ. राम साखरे, डॉ. सुनील हिंडोळे, डॉ. शिवकुमार लद्दे, डॉ. नसीर शेख, प्रा. महेश मानके, प्रा. स्वस्तिका चामे, प्रा. प्रशांत बनसोडे, प्रा. रोहित कोंबडे, प्रा. स्नेहल जोगदंड, प्रा. वैष्णवी मुगळे, प्रा. श्रद्धा सुरवसे आणि प्रा. स्वाती बिद्री, शिवहार विभुते, सिद्धेश्वर स्वामी, प्रमोद स्वामी आणि विशाल निलंगेकर यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## थकीत मालमत्ता कर वसुलीसाठी महानगरपालिकेची जप्ती मोहीम तिव्र

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०५ मार्च :** आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये मालमत्ता कर वसुलीसाठी लातूर महानगरपालिकेने अनेक कर सवलतीची योजना राबवली मात्र बर्याच मालमत्ताधारकांनी याकडे कानाडोळाच केला.त्यामुळे महानगरपालिकेमार्फत जप्ती मोहिम राबविण्यात येत आहे.त्याकरिता चार मुख्य कार्यालयातील पथक व चार क्षेत्रीय कार्यालय पथक असे एकूण आठ पथके नेमण्यात आले आहेत.



महानगरपालिकेमार्फत शहरातील प्रलंबित मालमत्ता कर वसुलीसाठी विशेष मोहीम सुरू करण्यात आली आहे. या मोहिमेअंतर्गत मालमत्ताकराची थकबाकी ठेवणाऱ्या करदात्यांविरुद्ध कठोर पावले उचलून त्यांच्या मालमत्तांवर जप्ती व नळ खंडन कारवाई करण्यात येत आहे.

मंगळवार दिनांक ०३ मार्च रोजी क्षेत्रीय कार्यालय सी अंतर्गत रु. ८,४५,०००/-थकित मालमत्ता करापोटी २ दुकाने सील करण्यात आली तसेच गंजगोलाई परिसरात रु.२,३३,१२०/- थकबाकी पोटी दोन दुकाने जप्त करण्यात आले. क्षेत्रीय कार्यालय अ अंतर्गत २,००,९६२/- थकित मालमत्ता करापोटी २ दुकाने सील करण्यात आली तसेच चार निवासी मालमत्तांवर अटकावणी व नळखंडनाची कार्यवाही करण्यात आली. क्षेत्रीय कार्यालय ड अंतर्गत एकूण सहा मालमत्तांचे अटकावणी व नळखंडन करण्यात आले. क्षेत्रीय कार्यालय ब अंतर्गत २ मालमत्तांची अटकावणी व २ मालमत्तांचे नळ खंडन करण्यात आले.

या व्यतिरिक्त शहरातील सर्व नागरिकांपर्यंत पोहोचून मालमत्ता व पाणी कर भरण्याबाबत प्रोत्साहित करण्यासाठी महानगरपालिकेने १२ स्वतंत्र पथके नेमलेले आहेत. या १२ पथकातील जवळपास १०० कर्मचारी घरोघरी जाऊन मालमत्ता कराचा व पाणी कराचा भरणा करून घेत आहेत.

थकीत कराच्या वसुलीसाठी मनपाकडून मोहीम राबविण्यात येत आहे. ही मोहीम अधिक तीव्र केली जाणार आहे. त्यामुळे जप्तीसारखी कटू कारवाई टाळण्यासाठी थकबाकीदारांनी कर भरून मनपाला सहकार्य करावे असे आवाहन आयुक्त श्रीमती मानसी व उपायुक्त (कर संकलन) डॉ पंजाब खानसोळे यांनी केले आहे.

## श्री सिध्देश्वर यात्रा महोत्सवाचा शोभेची दारू आतिषबाजीने सांगता

### उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे यांच्या हस्ते महाआरती

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०५ मार्च :** लातूरचे ग्रामदैवत असलेल्या श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर देवस्थानच्या वतीने महाशिवरात्रीचे औचित्य साधून दि. १५ फेब्रुवारीपासून यात्रा महोत्सव सुरु झाला होता. या महोत्सवाची सांगता दि. २ मार्च रोजी रात्री ८ वाजता शोभेची दारू आतिषबाजीने करण्यात आली. यावेळी उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. याप्रसंगी देवस्थानचे प्रशासन सचिन जांबुतकर यांची उपस्थिती होती.



प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी लातूरचे ग्रामदैवत श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर देवस्थानच्या वतीने ७३ वा यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. तब्बल १५ दिवस विविध धार्मिक, सामाजिक उपक्रम, वेगवेगळ्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आलेले होते. त्याच बरोबर शेतकऱ्यांसाठीही विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सदर यात्रा महोत्सवात सहभागी होण्यासाठी लातूर जिल्ह्यासह परजिल्हा व राज्यातील अनेक भाविक व नागरिक दररोज मोठ्या संख्येने येत होते. सदर यात्रा महोत्सव यशस्वी पार पाडण्यासाठी देवस्थानचे प्रशासक सचिन जांबुतकर यांच्यासह विश्वस्त विक्रम गोजमगुंडे, श्रीनिवास लाहोटी, प्रदीप राठी, मन्मथप्पा लोखंडे, अशोक भोसले, बाबासाहेब कोरे, नरेश पंड्या, सुरेश गोजमगुंडे, रमेशसिंह बिसेन, चंद्रकांत परदेशी, व्यंकटेश हालिंगे, विशाल झांबरे, ओम गोपे आदींनी पुढाकार घेतला होता.

या यात्रा महोत्सवाची सांगता सोमवार दि. २ मार्च रोजी करण्यात आली. यावेळी उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे यांच्या हस्ते श्रीची महाआरती करण्यात आली. यानंतर मंदीर प्रांगणात शोभेच्या दारूची मनमोहक आतिषबाजी करण्यात आली. यानंतर श्रीची मिरवणूक काढून दहीहंडी व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी देवस्थानचे प्रशासक सचिन जांबुतकर यांच्यासह नायब तहसीलदार सुधीर देशमुख विश्वस्त अशोक भोसले, सुरेश गोजमगुंडे, नरेशकुमार पंड्या,रमेशसिंह बिसेन, व्यंकटेश हालिंगे,विशाल झांबरे आंदीची उपस्थिती होती. सदर यात्रा महोत्सव यशस्वी पार पाडल्याबद्दल प्रशासक सचिन जांबुतकर यांनी विश्वस्तांसह शिवभक्त व लातूरकरांचे आभार व्यक्त केले.

**जाहीर प्रगटन**

माझे पक्षकार प्रभाकर विठ्ठलराव घोगरे रा. मुखेड ता. मुखेड जि.नांदेड हा.मु. शिवाजी चौक लातूर यांनी दिलेली माहिती, दर्शविलेले कागदपत्रे व अधिकृत केल्यावरुन तमाम जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे सुचित करण्यात येते की, माझे पक्षकाराची वडिलोपार्जित शेतजमीन मौजे मुखेड ता. मुखेड येथे जमीन गट क्र. ९११ क्षेत्र २ एकर १० गुंठे शेतजमीन आहे व राहती घरजागा मिळकत क्र. ८, वार्ड क्र. ४ मध्ये आहे. माझे पक्षकार व त्यांची पत्नी नामे गंगाबाई प्रभाकर घोगरे यांच्यामध्ये रितसर सन २००५ मध्ये घटस्फोट झालेला आहे व तेंव्हापासून गंगाबाई ही मुलाबाळासह माझे पक्षकारापासून विभक्त तिचे माहेरी राहत आहे. माझे पक्षकार व गंगाबाई हिचा घटस्फोट झाल्यामुळे त्यांचे एकमेकासोबत कसल्याही प्रकारचे संबंध राहिलेले नाही. असे असताना गंगाबाई ही बेकायदेशीर रित्या माझे पक्षकाराच्या वर नमुद मिळकतीमध्ये हस्तक्षेप व अडथळा करत आहेत.

तरी वर नमुद मिळकतीचे माझे पक्षकार हे एकमेव मालक व कब्जेदार आहेत. तरी कोणीही व्यक्ती, बँक, कार्यालय, संस्था वर नमुद मिळकती बाबत माझे पक्षकाराचे परस्पर इतर कोणासोबतही खरेदी विक्री, गहाण, बक्षीस, दान, साठेखत इ. व्यवहार करु नये, याउपरही जर कोणी कांही व्यवहार केल्यास तो व्यवहार बेकायदेशीर असेल व सदर व्यवहार माझे पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही. तसेच माझे पक्षकार संबंधीतांविरुध्द योग्य ती कायदेशीर कार्यवाही करतील, याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

सबब हे जाहिर प्रगटन
दिनांक ०२/०३/२०२६

तर्फे
**ॲड. एस.एस. श्रृंगारे,**
**ॲड. कल्पना एम. भुरे,**
ऑफिस जिल्हा व सत्र न्यायालय,
लातूर, मो.क्र. ९८६०७८५७९०.

जाहीर प्रगटन देणार
**प्रभाकर विठ्ठलराव घोगरे**

**जाहीर प्रगटन**

लातूर जिल्हा परिसरातील तमाम जनतेस या जाहिर प्रगटना द्वारे सुचीत करण्यात येते की, माझे पक्षकार महेश बालासाहेब चव्हाण, रा.चनई, ता. अंबाजोगाई जि. बीड यांनी मला दिलेल्या माहिती व कागदपत्रावरून व वकिल म्हणून अधिकृत केले वरुन सर्व जनतेस खालील प्रमाणे जाहीर प्रगटन देत आहे.

माझे पक्षकार यांना ज्ञानदेव सुर्यकांत धायगुडे, रा. रामलिंगेश्वर मंदिरजवळ, काळे गल्ली, लातूर यांनी मालकी व कब्जेवहिवाटीचा प्लॉट मौजे. लातूर ग्रामीण, ता. जि. लातूर येथील जमीन गट नंबर २५२/२ पैकीचा याची गुंठेवारी झालेला प्लॉट नंबर ३ याचा गुंठेवारी नियमाधीन प्रमाणपत्र क्रं.जा.क्र. लामनपा/न.र.वि/८/३२५/२०२१-२०२२, मे. नगर रचनाकार, लातूर यांनी मंजूर केलेला असून याची लांबी दक्षिण -उत्तर ५० फुट व रुंदी पुर्व पश्चिम ४० फुट असून याचे एकूण क्षेत्रफळ २००० चौ. फुट आणि त्यालगतचे असलेला प्लॉट नंबर ४ चा भाग याचा गुंठेवारी नियमाधीन प्रमाणपत्र क्रं. जा.क्रं/लामनपा/न.र.वि/८/३५४/२०२१-२०२२, मे. नगर रचनाकार, लातूर यांनी मंजूर केलेला प्लॉट याची लांबी पुर्व पश्चिम ४० फुट व रूंदी दक्षिण - उत्तर २५ फुट याचे एकूण क्षेत्रफळ १००० चौ. फुट असून या दोन्ही प्लॉटचे एकूण क्षेत्रफळ ३००० चौ. फुट आहेत. याची एकत्रित चतुःसीमा खालीलप्रमाणे :-

पुर्वेस :- महेश पंडीत धायगुडे यांची जमीन, पश्चिमेस २५ फुट रुंदीचा रस्ता, दक्षिणेस :-ज्ञानदेव सुर्यकांत धायगुडे यांचा प्लॉट, उत्तरेस उमा विलास सोम यांचा प्लॉट

येणे प्रमाणे वरील चतुःसीमेच्या आतील मिळकत विद्यमान मालकाकडुन लेखी करार करुन घेऊण, इस्सारापोटी काही रक्कम माझे पक्षकाराकडुन स्विकारुन सदरची मिळकत ही निर्विवाद व निर्जोखीम असल्याची हमी माझे पक्षकारास दिली आहे. तरी सदर मिळकती बाबत जर कोणाचा उजर, आक्षेप, हितसंबंध, हक्क संबंध, कर्ज बोजा, गहाणखत, बक्षीसपत्र, कोर्ट डिग्री, मृत्युपत्र, तारण, लीज, शेजाऱ्याचा वाद, शासकिय अथवा निमशासकिय कर्ज, न्यायालयीन वाद असतील तर त्यांनी सदरचे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून सात (०७) दिवसाच्या आत माझे खालील कार्यालयीन पत्यावर योग्य त्या कागदपत्रांसह लेखी उजर / आक्षेप नोंदवावा मुदतीत जर कोणाचा उजर/आक्षेप नाही आल्यास सदरची मिळकत ही निर्विवाद व निर्जोखीम आहे असे गृहीत धरुन माझे पक्षकार सदर मिळकतीचे नोंदणीकृत खरेदीखत मूळ मालकाकडून आपल्या हक्कात करुन घेतील व त्यानंतर येणारे आक्षेप माझे पक्षकारावर बंधणकारक राहणार नाहीत याची सर्व जनतेने नोंद घ्यावी.

दिनांक ०३/०३/२०२६

तर्फे
**ॲड. अशोक ज्ञा. लोखंडे**
नोटरी भारत सरकार. शाहू चौक,
लातूर, मो नं.९४२१९ ८६४९५

जाहीर प्रगटन देणार
**महेश बालासाहेब चव्हाण**
रा.चनई, ता.अंबाजोगाई जि.बीड
मो नं.९७६३७१२४२५

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# आव्हानांच्या उंबरठ्यावर...

कोणत्याही दोन देशांमधील संघर्ष, युद्ध किंवा शीतयुद्ध यांचे जागतिक परिणाम भयावह असतात. अशा संघर्षांमध्ये जीवितहानी तर होतेच; त्यामुळे निर्माण होणाऱ्या सामाजिक व भौगोलिक अस्थिरतेचे परिणाम जगाला दीर्घकाळ भोगावे लागतात. आजवर जगात जेवढी युद्धे, संघर्ष किंवा शीतयुद्धे भडकली, त्यामध्ये अमेरिकेची भूमिका अनेकदा केंद्रस्थानी राहिली शिरावर आहे. अमेरिकेने बजावलेल्या भूमिकांची परिणतीही अनेकदा युद्धस्थिती निर्माण होण्यात झाली आहे. आता इराणविरुद्धच्या अमेरिका आणि इस्रायलच्या कारवाईने या इतिहासाची पुनरावृत्ती झाली आहे. 'योगक्षेमं वहाम्यहम' ही अमेरिकेची स्वयंघोषित भूमिका म्हणजे त्या देशाच्या महासत्तेचा दबाव असल्याने अनेक राष्ट्रांमध्ये परस्परांविरोधातील युद्धाचे प्रसंग ओढवले. लोकशाही किंवा शांतता प्रस्थापित करण्याच्या अमेरिकेच्या उद्देशास फारच मर्यादित यश मिळालेले दिसते. इराणविरुद्धच्या कारवाईनंतर त्या देशात अमेरिकेच्या इच्छेप्रमाणे कदाचित सत्तांतर होईलही, पण शांतता प्रस्थापित करण्याचा अमेरिकेचा जगाला दाखविण्याचा उद्देश सफल होईलच, याची मात्र खात्री नाही. काही राष्ट्रांकडे असलेली विनाशकारी शस्त्रे जागतिक शांततेसाठी धोकादायक असल्याचे किंवा काही राष्ट्रांतील दहशतवादी कारवायांमुळे जागतिक सुरक्षितता संकटात असल्याच्या जाणिवेमुळे अमेरिकेने यापूर्वी केलेल्या लष्करी कारवायांचे मर्यादित यश पाहता, इराणविरुद्धच्या कारवाईत पूर्ण यश मिळेल आणि जागतिक शांततेचे नवे पर्व सुरू होईल, अशी अपेक्षा करणे काहीसे घाईचेच ठरेल. सुमारे अडीच दशकांपूर्वी सन २००३ मध्ये अमेरिकेने इराकवरील सद्दाम हुसेन यांना सत्ताभ्रष्ट करून इराकच्या ताफ्यातील विनाशकारी अस्त्रे नष्ट करण्याच्या उद्देशाने केलेल्या कारवाईमागे, इराकमध्ये लोकशाही प्रस्थापित करण्याचा उद्देश असल्याचे सांगितले जात होते. त्या कारवाईनुसार सद्दाम हुसेन यांना सत्ताभ्रष्ट करून फासावर चढविण्यात आले; त्या कारवाईत व त्यानंतर माजलेल्या यादवीमध्ये लाखो इराकी नागरिक व हजारो अमेरिकी सैनिकांना आपले प्राण गमवावे लागले. इराकमध्ये भीषण गृहयुद्ध पेटून आयसिससारख्या कट्टरवादी संघटनांचा उदय झाला व इराणचा इराकवरील प्रभाव वाढला. त्यामुळे अमेरिकेने ज्या उद्देशाने ते युद्ध पुकारले तो उद्देश तर सफल झाला नाहीच; उलट संपूर्ण इराकमध्ये शोध घेऊनही एकही विनाशकारी अस्त्र न सापडल्याने अमेरिकेच्या नैतिकतेवरच प्रश्नचिन्ह उमटवले गेले. गेल्या शतकातील १९५५ मधील व्हिएतनामविरुद्धच्या लष्करी कारवाईपासून सुरू झालेला अमेरिकी हस्तक्षेपाचा हा इतिहास आज इराणविरुद्धच्या ताज्या कारवाईपर्यंत येऊन ठेपला आहे. अशा प्रत्येक लष्करी कारवाईमुळे जगावर संमिश्र परिणाम झाले आहेत. अनेक देशांतील सत्तांतरे अमेरिकेच्या इच्छेनुसार घडली. तेथे स्थिर सरकारे स्थापन करण्यात अमेरिका अपयशी ठरली. इराक, सीरिया आणि अफगाणिस्तानातील युद्धांमुळे लाखो लोकांना देश सोडून स्थलांतर करावे लागले. जगाचा पोलिस म्हणून पुढाकार घेण्याच्या अमेरिकेच्या धोरणामुळे अनेक देशांत अमेरिकेविरुद्ध तीव्र नाराजी निर्माण झालेली पाहावयास मिळते. १९४७ ते १९९१ या साडेचार दशकांच्या काळातील अमेरिका व सोव्हिएत युनियन यांच्यातील शीतयुद्धाचा इतिहास फारसा कल्याणकारी नाहीच; यातून काही दहशतवादी संघटनांचा जन्म होऊन त्या संघटना जगासाठी डोकेदुखी ठरल्याचे स्पष्ट झाले आहे.

अमेरिकेच्या लष्करी कारवायांचा हा इतिहास पाहता इराणविरुद्धच्या कारवाईचे दीर्घकालीन परिणाम जगाला भोगावे लागणार, हे स्पष्ट आहे. इराण युद्धामुळे होणारे आर्थिक-सामाजिक परिणाम केवळ मध्यपूर्वेपुरते मर्यादित राहणार नाहीत. ऊर्जा, समुद्री मार्ग, महासत्तांचे हितसंबंध, पश्चिम आशियातील भारताचे स्थान यामुळे त्याचे राजकीय, आर्थिक आणि सामाजिक पडसाद जगभर उमटत राहणार आहेत. कारण इराण हा पश्चिम आशियातील एक महत्त्वाचा घटक आहे. अमेरिका, इस्रायल, रशिया, चीन यांचे हितसंबंध या देशाशी जोडले गेलेले असल्याने हा संघर्ष प्रादेशिक न राहत महाशक्तींच्या युद्धापर्यंत जाऊ शकतो आणि मध्यपूर्व हा सातत्याने अशांत टापू राहू शकतो. इराण-सौदी, इराण-इस्रायल यांच्यातील तणाव वाढल्यास संपूर्ण आखाती क्षेत्र अस्थिर होईल व त्याचा परिणाम या देशांच्या अंतर्गत राजकारणावरही पाहावयास मिळेल. इराण हा जगातील एक मोठा तेल उत्पादक असल्याने जागतिक तेलपुरवठ्यावर त्याचे परिणाम होऊन तेलाच्या किमती भडकतील, असा अंदाज वर्तविला जात आहे. जेव्हा इंधन किंवा ऊर्जेच्या किमती वाढतात, तेव्हा जागतिक मंदीचा धोका तीव्र होतो. साहजिकच महागाई भडकते आणि कर्जे महागल्याने उत्पादन खर्च वाढून उत्पादनात घट होते. त्यामुळे बेरोजगारीची समस्या तीव्र होते आणि जागतिक मंदी भडकून आर्थिक अस्थिरतेचा मोठा फटका विशेषतः अविकसित किंवा विकसनशील देशांना सोसावा लागतो. असे संघर्ष भडकतात तेव्हा स्थलांतराची समस्या उग्र होते. शरणार्थी म्हणून अन्य देशांच्या दिशेने वाढणाऱ्या लोंढ्यांचा ताण वाढतो. सध्याचा काळ समाजमाध्यमांच्या प्रभावाखाली वाटचाल करतो आहे. अशा अस्थिर परिस्थितीचा फायदा घेऊन समाजमाध्यमांवरील माहितीयुद्धे भडकल्यास त्याला वार घालण्याचे मोठे आव्हान यापुढच्या काळात जगासमोर उभे ठाकणार आहे.

अमेरिका-इस्रायलचे इराणविरुद्धचे युद्ध हा केवळ एका देशावरील कारवाईपुरता मर्यादित मुद्दा नाही. तो केवळ एका देशाचा संघर्ष ठरणार नाही. हे युद्ध म्हणजे ऊर्जा-इंधनाचे राजकारण, धार्मिक ध्रुवीकरण आणि महासत्तांच्या सत्तास्पर्धेचे केंद्रबिंदू ठरू शकेल. तसे झाल्यास भारताच्या दृष्टीने तो काहीसा आव्हानात्मक काळ ठरू शकतो. कारण इंधन सुरक्षितता, परराष्ट्र धोरणाचे संतुलन आणि देशांतर्गत आर्थिक स्थैर्य यांच्या कसोटीच्या काळात भारतास केवळ प्रतिक्रियात्मक नव्हे, तर बहुपदरी धोरण स्वीकारावे लागेल. कोणत्याही गटात उघडपणे न झुकता संवादाच्या आग्रहावर भर देत इराण, इस्रायल, अमेरिका आणि रशियासारख्या देशांसोबतचे आंतरराष्ट्रीय संबंध जपण्याच्या धोरणाची कसोटी भारतास पार पाडावी लागणार आहे. या सर्व देशांसोबतची संवादरेषा टिकविणे ही भारताची गरज आहे. यापैकी अनेक देशांमध्ये भारतीय समाजाचे मोठ्या प्रमाणावर वास्तव्य आहे. त्यामुळे त्यांची सुरक्षितता लक्षात घेऊन सुरक्षा सहकार्य वाढविण्याच्या दृष्टीने आखाती देशांसोबतचा समन्वय राखण्यास प्राधान्य द्यावे लागेल आणि ऊर्जा सुरक्षेचा नवा आराखडा आखावा लागेल. येत्या काळात भारतामध्ये तेलसाठ्याच्या स्थितीचा संतुलन राखण्याकरिता दीर्घकालीन धोरण आखण्यावर व सौर, हरित, हायड्रोजन, जैवइंधन आदी पर्यायी ऊर्जास्रोतांच्या निर्मितीस प्राधान्य देण्यावर भारताचा भर राहील. कोणत्याही युद्धस्थितीचे काही सामाजिक परिणाम साहजिकच आर्थिक स्थैर्यावरही होत असतात. युद्धस्थितीत महागाई भडकते, मंदीच्या सावटामुळे उत्पादन घटते, बेरोजगारी वाढते आणि टंचाईसारख्या समस्या निर्माण होऊ शकतात. याला तोंड देण्यासाठी आवश्यक वस्तूंच्या वितरणाचे योग्य समायोजन करणे, सार्वजनिक वितरण प्रणाली मजबूत करणे हीदेखील गरज ठरू शकते. परकीय चलनसाठा मजबूत ठेवण्यासाठी उपाययोजना आखणे, महागाई नियंत्रणात ठेवण्यासाठी तात्पुरत्या उपाययोजना, बचतीची साधने वाढविणे आणि उद्योगांना प्रोत्साहन देऊन परिस्थितीस सामोरे जाण्याचे धैर्य रुजविणे ही कोणत्याही देशाची जागतिक स्तरावरील अशांतता काळातील जबाबदारी ठरते. आखाती देशांत ८० लाखांहून अधिक भारतीयांचे वास्तव्य आहे. त्यांचे संरक्षण, सुरक्षितता आणि गरज भासल्यास सुरक्षित स्थलांतराचा आराखडा ही भारताची नीती असेल. अशा काळात सामाजिक सौहार्द टिकविण्याचे आव्हानही भारतासमोर राहील, अशी चिन्हे दिसू लागली आहेत. सामाजिक ध्रुवीकरण टाळण्यासाठी संयम आणि संवाद ही साधने महत्त्वाची असतात. त्याची पुरेशी दक्षता घेतली जाईल, यात शंका नाही. कारण, इराण युद्धस्थिती हा भारतासाठी केवळ परराष्ट्र धोरणापुरता प्रश्न नाही तर अर्थ, ऊर्जा, प्रवासी भारतीय आणि अंतर्गत सामाजिक संतुलनाचा मुद्दा आहे. ▮

## आंतरराष्ट्रीय

प्रा. जयसिंग यादव

# धोरणात्मक परिपक्वतेची परीक्षा

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या इस्रायल दौऱ्याकडे दोन्ही देशांमधील परस्पर संबंधांच्या दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे. गेल्या तीन वर्षांमध्ये गाझापट्टीत झालेल्या ७२ हजारांहून अधिक मृत्यूंमध्ये सामान्य नागरिकांची संख्या मोठी आहे. मुले, महिला काही बंडखोर नाहीत. त्यांना हमासचे लढवय्ये मानले जाऊ शकत नाही. या उद्ध्वस्त प्रदेशातील लोक अजूनही अन्न, पाणी आणि औषध मिळविण्यासाठी संघर्ष करीत आहेत. बाहेरून कोणतीही मदत त्यांच्यापर्यंत पोहोचू दिली जात नाही. गाझाच्या राजकीय भविष्यावर कोणतीही चर्चा होत नाही. उलटपक्षी, पॅलेस्टाईनचा दुसरा सर्वात मोठा प्रदेश असलेल्या वेस्ट बँकमधील लोक सध्या तेथे जबरदस्तीने स्थायिक झालेल्या इस्रायली लोकांकडून हल्ल्यांना तोंड देत आहेत. इस्रायली सरकार त्यांना थांबविण्याऐवजी पाठीशी उभे राहात आहे. इस्रायली वसाहतींच्या काळापासून भारत सरकार पॅलेस्टिनींच्या बाजूने उभे आहे आणि ही भूमिका कायम आहे. पश्चिम आशियातील या सर्वात तीव्र संघर्षात भारत पूर्वीप्रमाणेच 'द्वि-राज्य उपाया'ला पाठिंबा देतो. या दृष्टिकोनातूनच भारत संयुक्त राष्ट्रांच्या थेट पुढाकाराच्या बाजूने उभा आहे. २०१७ मध्ये मोदी यांनी इस्रायलला भेट दिली, तेव्हा परिस्थिती वेगळी होती. गेल्या पाच वर्षांमध्ये भारताने या लहान देशासोबत २० अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त व्यापार केला आहे. एकट्या भारताने जगभरातील इस्रायली शस्त्रविक्रीपैकी ३४ टक्के खरेदी केली आहे. आता या व्यापारसंबंधांची व्याप्ती वाढण्यास सुरुवात झाली आहे.

मोदी इस्रायली संसदेच्या विशेष अधिवेशनाला संबोधित करीत होते, तेव्हा तेथील विरोधी पक्षाच्या खासदारांनी सभागृहाबाहेर राहण्याचा निर्णय घेतला. त्यांनी न्यायव्यवस्थेच्या प्रमुखांना या कार्यक्रमासाठी आमंत्रित न केल्याचे कारण दिले. नेतान्याहू सध्या इस्रायली राष्ट्रीय भावना किती प्रमाणात प्रतिनिधित्व करतात, हे त्यांच्या सार्वजनिक प्रतिमेवरून मोजता येत नाही. इस्रायलच्या रस्त्यांवर त्यांच्याविरुद्ध सतत निदर्शने होत आहेत. अमेरिका आणि विविध युरोपीय देशांमधील ज्यू समुदायाने त्यांच्या कट्टरपंथी धोरणांवर जाहीरपणे नाराजी व्यक्त केली आहे. मोदी यांनी नेतान्याहू यांच्यासोबत घेतलेली भूमिका आखाती प्रदेशात भारताला एकाकी पाडणार नाही. संयुक्त अरब अमिराती आणि सौदी अरेबियासोबतचे भारताचे संबंध सध्या इतिहासातील सर्वोत्तम टप्प्यातून जात आहेत आणि दोन्ही देश कोणत्याही किमतीत इस्रायलला हानी पोहोचवू इच्छित नाहीत. जगातील कोणत्याही देशासाठी आखाती प्रदेशात आपली राजनैतिकता सुरळीतपणे चालविणे कधीही सोपे नव्हते. भारतासाठी हे आणखी गुंतागुंतीचे राहिले आहे. कारण कोणत्याही गटाचा भाग बनण्याचे त्याचे धोरण कधीही नव्हते. मोदी यांच्या सक्रिय राजनैतिकतेमुळे व्यापार, गुंतवणूक आणि रोजगाराच्या क्षेत्रात आपल्याला फायदा झाला आहे; परंतु पॅलेस्टिनी नागरिकांच्या दुर्दशेचा प्रश्न कायम असून भारताची त्याबाबतची भूमिका काही प्रश्न निर्माण करते. याच सुमारास भारताने इराणशी समान पातळीचे संबंध राखल्याने भविष्यात काही आव्हाने निर्माण होऊ शकतात. मोदी यांच्या दोन दिवसांच्या इस्रायल दौऱ्याने जगाचे लक्ष वेधले. त्यांच्या भेटीत इस्रायल आणि भारत यांच्यातील धोरणात्मक संबंध मजबूत करण्यावर भर देण्यात आला. दोन्ही देशांमध्ये संरक्षण, सायबर सुरक्षा आणि शस्त्रास्त्रांशी संबंधित अनेक महत्त्वाचे करार झाले. यामुळे पाकिस्तानसाठी चिंता वाढू शकते. तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, भारताचे इस्रायलशी असलेले संबंध पाकिस्तानी लष्कराच्या सुरक्षा चिंता वाढवतील. नेतान्याहू यांनी अलिकडेच भारत आणि इतर देशांसह षटकोनी आघाडीची स्थापना करण्याची घोषणा केली. त्यानंतर मोदी यांच्या उपस्थितीत नेतान्याहू यांनी इस्लामिक अतिरेकी तत्त्वांशी लढण्यासाठी पोलादी आघाडी तयार करण्याची भाषा केली. तुर्कस्तान आणि पाकिस्तानसारखे देश अशा आघाडीकडे संशयाने पाहतात. विश्लेषकांचे म्हणणे आहे की, भारताचे इस्रायलशी असलेले सहकार्य आधीच अस्थिर असलेल्या प्रदेशात पाकिस्तानचे धोरणात्मक गणित बदलू शकते. मोदी सत्तेत आल्यापासून भारत-इस्रायल संबंधांना वेग आला आहे. भारत आज इस्रायलचा सर्वात मोठा शस्त्रास्त्र ग्राहक आहे. दोन्ही देश कृत्रिम बुद्धिमत्ता, क्वांटम संगणन आणि सायबर सुरक्षा क्षेत्रात संरक्षणाच्या पलीकडेही काम करीत आहेत. सप्टेंबर २०२५ मध्ये भारत आणि इस्रायलमधील व्यापाराचा भारताला फायदा झाला. सप्टेंबर २०२४ च्या तुलनेत सप्टेंबर २०२५ मध्ये भारताची इस्रायलला होणारी निर्यात अंदाजे ५.१९ टक्क्यांनी कमी झाली. ती १८८ दशलक्ष डॉलर्सवरून १७८ दशलक्ष डॉलर्सवर आली. म्हणजे अंदाजे ९.७४ दशलक्ष डॉलर्सची घट झाली. इस्रायलमधून भारताची आयात जवळपास २० टक्क्यांनी घसरली. १५२ दशलक्ष डॉलर्सवरून १२१ दशलक्ष डॉलर्स झाली. हे अंदाजे ३१.१ दशलक्ष डॉलर्सची घट दर्शविते. २०२४ मध्ये इस्रायल आणि भारत यांच्यातील व्यापारात थोडीशी घट झाली; परंतु प्रस्तावित मुक्त व्यापार करारामुळे दोन्ही देशांमधील व्यापार वाढण्याची अपेक्षा आहे. सध्या भारत प्रामुख्याने इस्रायलला अर्ध-मौल्यवान दगड (४८.७ दशलक्ष डॉलर), ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स (१०.४ दशलक्ष डॉलर) आणि अभियांत्रिकी वस्तू (८.०६ दशलक्ष डॉलर) निर्यात करतो. मोती, मौल्यवान दगड, ऑटोमोटिव्ह डिझेल, यंत्रसामग्री, कापड, तयार कपडे आणि कृषी उत्पादने मोठ्या प्रमाणात निर्यात केली जातात. भारत प्रामुख्याने



इस्रायलमधून उत्पादित खते (१६.७ दशलक्ष डॉलर) आणि इलेक्ट्रॉनिक घटक (९.६५ दशलक्ष डॉलर) आयात करतो. मुक्त व्यापार करार लागू झाल्यास भारतीय उत्पादनांना इस्रायली बाजारपेठेत सहज प्रवेश मिळेल. त्याचा थेट फायदा भारतीय उद्योग आणि शेतकऱ्यांना होऊ शकतो. मोदी यांच्या इस्रायल भेटीदरम्यान दोन्ही देशांमधील संरक्षण क्षेत्रातील महत्त्वाच्या करारांवर चर्चा झाली. या करारांमुळे दोन्ही देशांमधील धोरणात्मक भागीदारी आणखी मजबूत होईल. मुख्य लक्ष संरक्षण सहकार्यावर होते. त्यात तंत्रज्ञान हस्तांतरण, संयुक्त उत्पादन आणि प्रगत शस्त्र प्रणालींचा समावेश होता.

२०२६ मध्ये दोन्ही देशांमध्ये ८ ते १० अब्ज डॉलर्सपर्यंतचे संरक्षण करार झाले. इस्रायलने आयर्न डोम हवाई संरक्षण प्रणालीसाठी भारताला तंत्रज्ञान हस्तांतरित करण्याची ऑफर दिली आहे. 'मेक इन इंडिया' उपक्रमांतर्गत ते भारतातील स्थानिक उत्पादनासाठी आहे. ते कमी अंतराच्या रॉकेट, मोर्टार आणि ड्रोनपासून संरक्षण प्रदान करते. 'आयर्न बीम' (लेसर-आधारित), 'डेव्हिड स्लिंग' आणि 'ॲरो'सारख्या प्रगत क्षेपणास्त्र संरक्षण प्रणालींवर सामंजस्य करार शक्य आहेत. 'हर्मीस ड्रोन', 'हेरॉन एमके-२ मेल ड्रोन' (संयुक्त उत्पादन), 'स्पाईस १००० प्रिसिजन गाईडेड बॉम्ब', 'रॅम्पेज एअर-टू-ग्राउंड' क्षेपणास्त्रे, 'आइसब्रेकर नेव्हल क्रूझ' क्षेपणास्त्रे आणि सुपरसॉनिक 'एअर-टू-एअर लोरा' क्षेपणास्त्रे यासारख्या प्रणालींवर करार झाले आहेत. सूत्रांनुसार ८-१० अब्ज डॉलर्सपर्यंतचे हे संरक्षण करार आहेत. हे थेट खरेदीपेक्षा तंत्रज्ञान हस्तांतरण आणि संयुक्त उत्पादनावर अधिक केंद्रित आहेत. 'काऊंटर-ड्रोन' तंत्रज्ञान, लेसर सिस्टिम, 'एआय', 'क्वांटम कॉम्प्युटिंग', सायबर सुरक्षा आणि संरक्षण खरेदीवर १७ सामंजस्य करार झाले आहेत. भारत आणि इस्रायलमधील धोरणात्मक करार विशेष आहे. गेल्या वर्षी पाकिस्तान आणि सौदी अरेबियामध्ये झालेल्या कराराच्या बरोबरीचा हा करार म्हणून पाहिले जाऊ शकते. इस्रायलचे अमेरिका आणि जर्मनीसारख्या देशांसोबत आधीच असेच करार आहेत. पाकिस्तान हा एकमेव मुस्लिम देश आहे, ज्याच्याकडे अण्वस्त्रे आहेत, ही वस्तुस्थिती इस्रायलला दीर्घकाळ त्रास देत आहे. शिवाय पाकिस्तान तुर्की आणि सौदी अरेबियासह कट्टरपंथी सुन्नी अक्षाचा भाग आहे. पाकिस्तानचा प्रतिकार करण्यासाठी इस्रायल भारताशी संरक्षण सहकार्य आणि गुप्तचर माहिती सामायिकरण वाढवत आहे. ताज्या करारामुळे इस्रायलचे भारताशी सहकार्य वाढेलच; पण पाकिस्तानच्या सुरक्षा अडचणीही वाढतील. ▮

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

नितीन शिरसाट

# होळीची अनोखी परंपरा

परंपरा, पर्यावरण आणि सामाजिक एकात्मतेचा, रंगोत्सवाचा होळी हा सण. प्रत्येक सणामागे धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक पर्यावरणीय असा बहुआयामी अर्थ दडलेला असतो. फाल्गुन पौर्णिमेला साजरी होणारी होळी हा केवळ रंगांचा उत्सव नसून तो अन्यायावर सत्याचा विजय, वाईटावर चांगल्याचे अधिराज्य, समाजातील विविध घटकांमधील ऐक्यांचे प्रतीक आहे. आजच्या आधुनिक काळात होळीचे रूप काही प्रमाणात बदलले असले, तरी ग्रामीण भागात, तांड्यांत, यात्रांमध्ये आणि परंपरागत समाजरचनेत तिचे मूळ स्वरूप जपलेले दिसते. पर्यावरणपूरक होळी, बंजारा समाजाची पारंपरिक होळी, महिलांची लाठीमार परंपरा, वर्धा जिल्ह्यातील रंगाविना धार्मिक स्पर्धा, स्वच्छतेचा संदेश देणारे सूरगाव आणि बुलढाणा जिल्ह्यातील प्रसिद्ध सैलानी बाबा यात्रेतील सामूहिक होळी या सर्व उदाहरणांतून होळीचे विविध रंग आपल्याला पाहायला मिळतात. बुलढाणा जिल्ह्यातील प्रसिद्ध असलेल्या सैलानी बाबाच्या यात्रेत दरवर्षी होळीला लाखो भक्त येतात. या दिवशी नारळाची होळी पेटवली जाते. हे नारळ ओवाळून होळीत टाकल्याने अंगातील व्याधी दूर होते, अशी भावना आहे. त्यामुळे प्रत्येक वर्षी तब्बल १५ ते २० ट्रक भरतील एवढ्या नारळांची होळी येथे केली जाते. काही वर्षांत रासायनिक रंग, पाण्याची उधळपट्टी आणि प्लॅस्टिक कचऱ्यामुळे होळीचा सण पर्यावरणासाठी चिंतेचा विषय बनला होता. मात्र, आता जनजागृतीमुळे परिस्थिती बदलत आहे. नैसर्गिक रंगांचा वापर, सुया फुलांपासून तयार केलेले गुलाल, पाण्याचा संयमित वापर तसेच होळीच्या दहनासाठी कचरा किंवा प्लॅस्टिकऐवजी सेंद्रिय साहित्य वापरण्याकडे कल वाढतो आहे. पर्यावरणपूरक होळी म्हणजे केवळ पर्यावरणाचे रक्षण नव्हे तर पुढील पिढ्यांसाठी सुरक्षित भविष्य घडविण्याची



जबाबदारी स्वीकारणे होय. अनेक स्वयंसेवी संस्था आणि शाळा मुलांना 'एक झाड लावा, होळी साजरी करा' असा संदेश देत आहेत. काही ठिकाणी होळीच्या निमित्ताने वृक्षारोपणाचे कार्यक्रम घेतले जातात. परंपरेतील होळी ही समाजशुद्धीचे प्रतीक होती. गावातील कचरा गोळा करून तो होळीत टाकण्याची पद्धत स्वच्छतेचा संदेश देणारी होती. आज त्याच परंपरेला आधुनिक पर्यावरण-जागरूकतेची जोड देण्याची आवश्यकता आहे. भारतातील प्रसिद्ध 'लाठीमार होळी' ही परंपरा विशेष प्रसिद्ध आहे. विशेषतः बरसाना आणि नंदगाव येथे महिलांची लाठीमार होळी मोठ्या उत्साहात साजरी होते. या परंपरेनुसार महिलांकडून पुरुषांना प्रतीकात्मक लाठीने मारले जाते आणि पुरुष ढालीने त्याचा बचाव करतात. ही परंपरा स्त्रीशक्तीचे प्रतीक मानली जाते. समाजातील स्त्री-पुरुष समानतेचा संदेश या खेळकर विधीतून दिला जातो. महिलांना अभिव्यक्तीची आणि नेतृत्वाची संधी देणारा हा सांस्कृतिक उपक्रम आहे. वर्धा जिल्ह्यातील सूरगाव येथे २८ वर्षांपासून रंगांविना होळी साजरी केली जाते. तीन दिवस धार्मिक कीर्तन, भजन, प्रवचन आणि सांस्कृतिक स्पर्धा आयोजित केल्या जातात. रंगांची उधळण न करता आध्यात्मिक वातावरणात सण साजरा करण्याचा हा प्रयत्न आहे. युवक-युवतींसाठी वक्तृत्व स्पर्धा, भजन स्पर्धा आणि सामाजिक विषयांवर चर्चा आयोजित केल्या जातात. या उपक्रमांमुळे सणाला बौद्धिक आणि सांस्कृतिक दिशा मिळते. धार्मिक भावनेसोबत समाजप्रबोधनाची जोड दिली जाते. स्वच्छतेचा संदेश देणारे सूरगाव येथे होळीच्या निमित्ताने स्वच्छता अभियान राबविण्याची परंपरा आहे. गावकरी होळीपूर्वी संपूर्ण गावाची साफसफाई करतात. रस्ते, सार्वजनिक ठिकाणे, मंदिरे आणि शाळा स्वच्छ केली जातात. 'स्वच्छ गाव, सुंदर गाव' हा संदेश देत होळी साजरी केली जाते. मध्यप्रदेशातील पांढुर्णा येथे जाम नदीच्या काठावर पोळ्याच्या दुसऱ्या दिवशी भाद्रपद अमावास्येला पारंपरिक गोटमार होळी साजरी केली जाते. यात पांढुर्णा आणि सावरगावचे लोक एकमेकांवर दगडांचा गोट वर्षाव करतात. हा एक अतिशय धाडसी आणि ऐतिहासिक वारसा आहे. या परंपरेत दगडांचा वापर केला जात असल्याने प्रशासनाकडून सुरक्षेची खबरदारी घेण्याचे प्रयत्न केले जातात. बंजारा समाजाची पारंपरिक होळी ही जितकी अग्निपूजेसाठी ओळखली जाते, तितकीच ती होळी गीतांच्या समृद्ध परंपरेसाठीही प्रसिद्ध आहे. जिल्ह्यातील विविध तांड्यांमध्ये होळीच्या रात्री गायली जाणारी ही पारंपरिक गीतं आजही बंजारा समाजाच्या सांस्कृतिक अस्मितेचे जिवंत प्रतीक मानली जातात. होळी पेटवण्याच्या वेळी आणि त्यानंतर तांड्यातील स्त्री-पुरुष एकत्र येऊन फेरा धरतात. ढोल, तिमकी आणि टाळांच्या ठेक्यावर गायली जाणारी ही गीते पिढ्यान्‌पिढ्या तोंडी परंपरेने पुढे आली आहेत. होळीची अनोखी परंपरा आजही कायम आहे. ▮

९८८१७१७८२८

## इतस्ततः

दत्तात्रेय आंबुलकर

# कामाच्या तासांचे संमिश्र-संकरित स्वरूप

'कोरोना'दरम्यानचा कठीण कालावधी संपून आता पाच वर्षांवर अवधी लोटला. विभिन्न कंपन्यांच्या कार्यालयांमधील कामाचे तास आणि बदलत्या आणि लवचीक कामाचे स्वरूप ही नवी कार्यपद्धती सर्वांच्या अंगवळणी पडली असून अद्याप या नव्या कामकाज पद्धतीचा अनेक ठिकाणी स्वीकार-अंगीकार होत असलेला दिसून येतो. एवढेच नव्हे, तर काही ठिकाणी दरम्यानच्या काळात आधीच्या वा जुन्या हजेरी पद्धतीची केलेली सुरुवात पण नव्याने मोडीत काढून नव्या व लवचीक म्हणजेच कर्मचारी-कंपन्यांच्या कामाशी निगडित व आवश्यक सुधारित कामाच्या तासांचा व त्यानुसार काम करण्याच्या पद्धतीचा स्वीकार केल्याचे दिसून येते. यातूनच नव्याने कामाच्या संमिश्र वा संकरित स्वरूप व कार्यपद्धती विकसित झाली आहे.

'कोरोना'नंतरच्या सुमारे पाच वर्षांत कंपन्यांतर्गत कंपनी आणि कर्मचाऱ्यांचे कामकाज आणि कामांच्या तासांसह कार्यपद्धती इत्यादींवर बरेच चर्वितचर्वण झाले. त्यातून एक बाब प्रामुख्याने स्पष्ट झाली की, कोरोनादरम्यान व त्यानंतरच्या बदलत्या व बदललेल्या व्यावसायिक कार्यालयीन कार्यपद्धती व कामकाजामध्ये बदलती परिस्थिती व गरजांनुसार बदल करणे व करीत राहणे, त्याचा अवलंब करणे ही काळाची गरज ठरणार असून त्याचा उपयोग महत्त्वाचा ठरणार आहे. हेच विचार-विचारसरणी व नव्या अनुभवांमधून पुढे आली, ती नव्या स्वरूपातील व लवचीक अशी संयुक्त स्वरूपातील संकरित कार्यपद्धती. या नव्या कार्यपद्धतीचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे, त्याच्या लवचीकतेला बदलत्या व्यावसायिक कार्यपद्धतीची व परंपरागत आणि संकरित स्वरूपाची नवी व विकसित कार्यपद्धती. या नव्या संकरित पद्धतीमध्ये परंपरागत व कोरोनापूर्व काळातील कंपनी-कार्यालयीन कार्यपद्धती व त्यानंतर कोरोना काळात उपयुक्त ठरून विकसित झालेली संयुक्त स्वरूपातील विकसित अशी संकरित स्वरूपातील कार्यपद्धती. या नव्या कामकाज पद्धतीचे सर्वात प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे, त्याचे नवे व विकसित स्वरूप हे प्रामुख्याने आव्हानात्मक स्वरूपातील निर्माण व विकसित झालेली अशी ही कामकाज पद्धती ठरली. त्याच्याच जोडीला या नव्या व कधी अकल्पित वाटणारी व्यावसायिक कार्यपद्धती विकसित झाली.

प्रचलित परिस्थितीत व विशेषतः कोरोनानंतरच्या बदलत्या व्यावसायिक परिस्थितीच्या अभ्यासावरील आपला अनुभव नमूद करताना 'अर्नस्ट अ‍ॅण्ड यंग' या विख्यात व्यवसाय व्यवस्थापन-मार्गदर्शन कंपनीच्या तंत्रज्ञान विकास क्षेत्राचे प्रमुख नितीन भट यांनी नमूद केल्यानुसार, त्यादरम्यान कंपनी अंतर्गत कर्मचाऱ्यांची कामाच्या ठिकाणची प्रत्यक्ष वा शारीरिक उपस्थिती, ते करीत असणारे कामकाज, या कामाचे स्वरूप, त्यांची उत्पादकता, कामाचा प्रत्यक्ष दर्जा व त्याचे व्यावसायिक परिणाम इ.वर व्यवस्थापन क्षेत्रातील उच्चपदस्थांनी अधिक गांभीर्याचे विचार करण्यास सुरुवात केली. त्यांच्या मते, याच विचार-प्रक्रियेमध्ये नवी कामकाज व व्यवस्थापन पद्धतीतील बदलांचे मूळ दिसून येते. याच विषयाचा अधिक पाठपुरावा करण्यासाठी २०२५ मध्ये 'अर्नस्ट अ‍ॅण्ड यंग' कंपनीतर्फे व्यापक स्वरूपाचे सर्वेक्षण करण्यात आले. या सर्वेक्षणामध्ये सुमारे १ हजार ५०० कंपन्या व १५ हजारांपेक्षा अधिक कर्मचारी सहभागी झाले होते. यावरून सर्वेक्षणाच्या प्रतिसादाची कल्पना येऊ शकते. सर्वेक्षणात विविध स्वरूपात काम करणाऱ्या २९ उद्योग-व्यवसायांचा समावेश होता.

वरील सर्वेक्षणात प्रामुख्याचे दिसून आलेली बाब म्हणजे, ज्या उद्योग-कंपन्यांमध्ये लवचीक कार्यपद्धती आणि कामाचे तास म्हणजेच संमिश्र वा संकरित कार्यपद्धती आहे, अशा ठिकाणच्या कर्मचाऱ्यांचे कामकाज तुलनेने अधिक उत्पादक आहे. याउलट परिस्थिती परंपरागत पद्धती वा पठडीसह काम करणाऱ्या कंपन्यांमध्ये दिसून आली. सर्वेक्षणातून दिसून आलेले कंपनी व कर्मचारी या उभय घटकांच्या संदर्भातील महत्त्वाचे मुद्दे म्हणजे, ज्या उद्योग-व्यवसायात व्यवस्थापन, व्यवस्थापक आणि तिथे काम करणारे कर्मचारी यांच्यादरम्यान संवाद आणि परस्पर विश्वास आहे, अशा ठिकाणी संकरित म्हणजेच कर्मचाऱ्यांनी कंपनीची व्यावसायिक गरज व कर्मचाऱ्यांची सोय-सुलभता यावर आधारित कामकाज ही नवी कार्यपद्धती अधिक परिणामकारकपणे काम करणारी ठरते व त्याचा लाभ उद्योगाच्या या उभय घटकांना होतो. यानिमित्ताने कर्मचाऱ्यांचा कंपनीचे कामकाज, कामाची पद्धत व कामाचे तास या दृष्टीने पाहता २२ टक्के कर्मचाऱ्यांनी कुठूनही काम करण्यास तर त्याहून अधिक म्हणजेच ३० टक्के कर्मचारी कंपनी व्यवस्थापनाच्या नियोजन वा प्राधान्यक्रमानुसार निर्धारित पद्धतीने व कामाच्या तासांसह काम करण्यास पसंती दिली. यावरून कामकाज, कामाची पद्धत व मुख्य म्हणजे कामाचे तास यासंदर्भातील कर्मचाऱ्यांची मानसिकता स्पष्ट होते. यासंदर्भात 'चीफ पीपल अ‍ॅण्ड कल्चर सर्व्हिसेस ऑफिसर' म्हणून मानव-संसाधन क्षेत्रात काम करणाऱ्या प्रशांत मेहरा यांच्या मते, या सर्वेक्षणातून स्पष्ट झालेली महत्त्वाची बाब म्हणजे, कर्मचारी कंपनीचा व्यवसाय-कामकाज आणि कामाची पद्धत याबरोबर कर्मचाऱ्यांचे काम व कामाचे तास या उभयपक्षी महत्त्वाच्या व जिव्हाळ्याच्या मुद्यांवर आपले मत आणि अपेक्षा इ. मुद्दे अधिक मोकळेपणाने मांडू लागले आहेत. त्यांच्यानुसार, सर्वेक्षणात सहभागी झालेल्या कर्मचाऱ्यांमध्ये नव्यानेच रुजू झालेले व युवा-वयोगटातील कर्मचार्यांच्या दृष्टीने कंपनीचे कामकाज लवचीक वा संमिश्र तासांसह करण्याच्या सोयीला या तरुण वयातील कर्मचाऱ्यांची पहिली पसंती व प्राधान्य आहे. त्यांच्या मते, या आणि अशा कार्यपद्धतीमुळे कंपनीचे कामकाज आणि कर्मचाऱ्यांचे काम या उभयतांना त्याचा फायदा होऊ शकतो. व्यवस्थापनाचा कर्मचाऱ्यांचे काम आणि त्यांचे कामाचे तास यावर आग्रही भर देण्यावरचा कलही आता कमी होत असल्याचे या सर्वेक्षणातून स्पष्ट झाले आहे. सर्वेक्षणातील सहभागी प्रमुख व्यवस्थापन प्रतिनिधी वा व्यवस्थापकांनी यासंदर्भात व्यक्त केलेल्या मतांनुसार, बदललेली वा बदलती व्यावसायिक स्थिती, कार्यालयीन व्याप व त्यावर होणारा खर्च, मर्यादित साधनांसह व्यावसायिक स्पर्धेवर मात करून व्यवसाय वाढीच्या दृष्टीने कंपनी-कर्मचाऱ्यांमध्ये परस्पर विश्वास आणि जबाबदारीची जाणीव असेल, तर कंपनीच्या व्यावसायिक प्राधान्यावर आधारित लवचीक कामांच्या तासासह संमिश्र वा संकरित कार्यपद्धती हा सद्यस्थितीत उत्तम पर्याय ठरू शकतो. ▮

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

### धूलिवंदन उत्साहात साजरे व्हावे

भारतातील वेगवेगळ्या भागात फाल्गुन पौर्णिमेला हा सण होळी, होलिकादहन, शिमगा, हुताशनी महोत्सव, दोलायात्रा, कामदहन अशा विविध नावांनी साजरा केला जातो. होळीच्या दिवशी आपण आपल्या मनातील वाईट विचारांना होळीप्रमाणे आगीत जाळून राख करावे, अशी कल्पना आहे. महाराष्ट्रासह कोकणात हा सण मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. दुसऱ्या दिवशी धूलिवंदनाचा सण साजरा केला जातो. याला धुळवड असेही म्हणतात. अग्नीत गव्हाच्या ओंब्या भाजण्याची प्रथा आहे. या दिवसात गव्हाचे पीक तयार होते, हे त्यामागील एक कारण असू शकते. नवीन पीक अग्निदेवतेला समर्पित करण्याची प्रथा आहे. या दिवशी एकमेकांना गुलाल लावून रंगाची उधळण करणे. सर्वांनी एकत्र येणे, बंधुभाव आणि एकता जपणे हा याचा उद्देश. लोक आपसातील भेदभाव भांडण विसरून एकत्र येतात; मात्र गेल्या काही वर्षांत या सणामध्ये शिरलेल्या अपप्रवृत्तीमुळे सणाचे पावित्र्य लोप पावले आहे. यावेळी धांगडधिंगा घातला जातो. धूलिवंदनाच्या दिवशी गुलालाऐवजी रसायनमिश्रित रंग लावले जातात. पाण्याचा अपव्यय केला जातो. पाण्याने, रंगाने भरलेले फुगे, पिशव्या रेल्वे गाड्या, बसगाड्यावर तसेच रस्त्यावर फेकून मारतात. त्यात अनेक जखमीही होतात. या दिवशी लाऊडस्पिकरवर मोठ्या आवाजात गाणी लावून हिडीस नृत्य करतात. या दिवशी मद्यपान करण्याची नवीनच फॅशन निर्माण झाली आहे. यातून बऱ्याचदा वाद होतो. हा वाद विकोपाला गेला तर कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो. वास्तविक होळी आणि धूलिवंदन हे अतिशय पवित्र सण आहेत. त्यामुळे धूलिवंदन उत्साहातच साजरे व्हावे.

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

●● ●●

## वाचक पत्रे

### वन्यजीव व्यवस्थापन गरजेचे

वन्यजीवांच्या नैसर्गिक व अनैसर्गिक मृत्यूंचे प्रमाण वाढते आहे. मानव-वन्यजीव संघर्ष टोकाला पोहोचला आहे. वन्यजीव व वनस्पती त्यांच्या प्रजातीचे तस्करी व व्यापार यामुळे अस्तित्वाला धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे वन्यजीव व वनस्पती यांचे संवर्धन करण्यासाठी त्यांचे व्यवस्थापन करणे अवश्य आहे. ३ मार्चला जागतिक वन्यजीव दिन साजरा केला जातो. 'औषधी आणि सुगंधी वनस्पती : आरोग्यवारसा आणि उपजीविका जतन करणे' हे घोषवाक्य घेऊन हा दिन संकल्प पद्धतीने साजरा होत आहे. यातून मानवी आरोग्य, सांस्कृतिक परंपरा, अर्थव्यवस्थांना आधार देणाऱ्या वनस्पतींचे संवर्धन करण्याच्या महत्त्वावर भर दिला आहे. ज्याचा उद्देश वन्यजीव आणि वनस्पतींच्या विविध प्रजातींबद्दल जागरूकता निर्माण करणे आणि त्यांच्या संरक्षणासाठी प्रोत्साहन देणे हा आहे. खऱ्या अर्थाने वन्यजीव पृथ्वीच्या जैवविविधतेचा आधार आहेत. भारतात प्राण्यांविषयी जितका आदर आहे, तितकीच अंधश्रद्धा व तस्करी पसरली आहे. वन्यजीव, वन्य वनस्पती, टिकविण्यासाठी कायमस्वरूपी पाणवठे, अन्न साखळी करणे आवश्यक आहे. अनेक वन्यजीव व पक्ष्यांचा मृत्यू हा पाण्याची उपलब्धता नसल्याने होतो. वेळोवेळी शासन याबाबत पुढाकार घेत असते. हा निर्णय गावपातळीवर घेणे गरजेचे आहे. लोकसहभाग महत्त्वाचा आहे. वनविभागाकडून प्रत्येक प्राण्यावर नजर असणार आहे. त्यामुळे प्राण्याची शिकार, तस्करी व अपघाती मृत्यू टाळता येतील. विकासाच्या नावाखाली जंगल व वने नष्ट झाल्याने उपासमारी टाळण्यासाठी वन्यजीव बाहेर पडत आहेत. जैवविविधता व वन्यजीव यांचे संवर्धन करत असताना जनजागृती करावी लागणार आहे.

**विठ्ठल वळसेपाटील** /८४८४०६६०४२

●● ●●

### स्वच्छता : संकल्पाचा मूलमंत्र

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा २०४७ पर्यंत विकसित भारताचा संकल्प आहे आणि हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवत सरकारची वाटचाल सुरू आहे. २०४७ मध्ये आपण १०० वा स्वातंत्र्य दिन साजरा करू. तो केवळ स्वातंत्र्य दिन नसावा तर तो विकसित भारताचा स्वातंत्र्य दिन असावा, प्रत्येक भारतीयांचा ऊर अभिमानाने भरून यावा असा तो क्षण असेल. जगभरातील विकसित देश पाहिले की, तेथील स्वच्छता प्रकर्षाने जाणवते. स्वच्छतेचे सौंदर्याशी जवळचे नाते आहे. परिसर स्वच्छ असला की त्याचं सौंदर्य पण वाढतं; अस्वच्छतेमुळे रोगराई वाढते. प्रत्येकाचे तन-मन निरोगी असेल राष्ट्र बलशाली असेल. खरं तर स्वच्छतेचे हे संस्कार आपल्याला कुणाकडून घेण्याची गरज नाही. ज्या देशात दिवसाची सुरुवातच केरकचरा स्वच्छ करून सडासंमार्जनाने होते त्या देशाने स्वच्छतेसाठी दुसऱ्या देशाचा आदर्श का घ्यावा? मुळात आपण आपलं स्वत्वच त्यांच्याकडे गहाण ठेवलंय; तेच परत आणण्याची गरज आहे. आज आपण विविध क्षेत्रात भरारी घेतोय. जगभरात चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था आपली आहे आणि लवकरच तिसऱ्या स्थानी येऊन भारताला डेड इकॉनॉमी म्हणणाऱ्या ट्रम्पला सांगू. हा आहे नवा भारत. खरं तर स्वच्छता हा विकसित भारताच्या संकल्पाचा मूलमंत्र आहे.आपला देश स्वच्छ ठेवण्यासाठी आपणही हातभार लावू आणि विकसित भारताचे स्वप्न साकार करू. ▮

**अखिल देशपांडे**/अकोला

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# एपीएल केशरी कार्डधारक शेतकऱ्यांना तात्काळ डीबीटी द्या

**तभा. वृत्तसेवा**

**बीड** | विधिमंडळ अर्थसंकल्पीय अधिवेशन २०२६ मध्ये केजच्या आ. नमिता मुंदडा यांनी एपीएल केशरी शेतकरी शिधापत्रिकाधारकांच्या हक्काच्या निधीसाठी राज्य सरकारकडे आग्रही मागणी केली आहे. केज, अंबाजोगाई आणि बीड तालुक्यातील हजारो पात्र लाभार्थी सध्या अन्नधान्याऐवजी मिळणाऱ्या प्रति महिना १७० रुपये डीबीटी म्हणजेच थेट लाभ हस्तांतरणापासून वंचित आहेत. शासनाने निधीअभावी ही मदत रोखून धरल्याने ग्रामीण भागातील हतबल शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत असल्याचे मुंदडा यांनी सभागृहात निदर्शनास आणून दिले.

अन्न सुरक्षा योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना रोख स्वरूपात मदत देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय झाला असला तरी, प्रत्यक्षात तांत्रिक आणि आर्थिक तरतुदींअभावी अनेक महिन्यांपासून लाभार्थ्यांच्या बँक खात्यात पैसे जमा झालेले नाहीत. हा शेतकऱ्यांचा हक्क असून निधीची कमतरता सांगून त्यांना वाऱ्यावर सोडता येणार नाही, असे खडे बोल आमदार मुंदडा यांनी सरकारला सुनावले. केज मतदारसंघातील दुष्काळी परिस्थिती आणि आर्थिक टंचाई पाहता, हा थकीत निधी युद्धपातळीवर उपलब्ध करून देण्याचे आवाहन त्यांनी केले आहे. या मागणीमुळे बीड जिल्ह्यातील शेतकरी वर्गामध्ये न्यायाची अपेक्षा निर्माण झाली असून, आता सरकार यावर नेमकी काय भूमिका घेणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**आग्रही मागणी**
आ. नमिता मुंदडा यांनी एपीएल केशरी शेतकरी शिधापत्रिकाधारकांच्या हक्काच्या निधीसाठी राज्य सरकारकडे आग्रही मागणी केली आहे.

# केज शहरात स्वच्छता अभियानात १५०० श्री सदस्यांचा सहभाग

## डॉ. श्री.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानचा उपक्रम




**तभा. वृत्तसेवा**

**केज, प्रतिनिधी** | स्वच्छता अभियानावर शासनस्तरावर कोट्यवधी रुपयांचा खर्च केला जातो; परंतु रेवदंडा (जि. रायगड) येथील डॉ.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने रविवारी दि. १ मार्च २०२६ रोजी केज शहरात सुमारे १५०० श्रीसदस्यांनी स्वच्छतेसाठी रस्त्यावर उतरून अवघ्या चार तासांत संपूर्ण शहर चकाचक केले. डॉ. श्री.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने पद्मश्री डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. केज नगरपंचायतीच्या सहकार्याने सकाळी सात ते अकरा वाजेपर्यंत केज शहरात स्वच्छता मोहिम राबविण्यात आली.

अभियानास छत्रपती शिवाजी महाराज चौकातून सुरुवात झाली. चौकाची योग्य आकर्षक रांगोळी काढून स्वच्छतेला प्रारंभ करण्यात आला. पद्मश्री डॉ.आप्पासाहेब धर्माधिकारी तसेच डॉ. श्री. सचिनदादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली धाराशिव, तुळजापूर, लातूर, बीड,वाशी परिसरातून दीड हजार श्रीसदस्य झाडू घेऊन रस्त्यावर स्वच्छतेसाठी उतरले. प्रतिष्ठानतर्फे सदस्यांना हातमोजे, मास्क आदी साहित्य पुरविण्यात आले होते. या अभियानासाठी केज नगरपंचायतीतर्फे १० घंटागाड्या, ३०ट्रॅक्टर तसेच ३ जेसीबी उपलब्ध करून देण्यातआल्या होत्या. या महाअभियानात सर्व सदस्यांनी चार तासांत सुमारे ८२ टन सुका कचरा व ४० टन ओला कचरा असा एकूण १२२टन कचरा संकलित केला. जमा झालेला Salt कचरा घंटागाड्यांमधून नियोजनबद्ध पद्धतीने उचलण्यात आला. सकाळी ठीक सात वाजता केजच्या श्री छत्रपती शिवाजी चौक येथून केजच्या नगराध्यक्षा, केज नगरपंच्यायत चे मुख्याधिकारी व शहरातील सर्व क्षेत्रातील अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत स्वच्छता अभियान राबविले.

# जिल्हा क्रीडा संकुलात कृषी स्पंदनचा उत्साहात समारोप

**तभा. वृत्तसेवा**

**बीड** | शेतकऱ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी रात्रंदिवस धावपळ करणाऱ्या कृषी विभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी दोन दिवस क्रीडा, कला आणि संस्कृतीच्या रंगात न्हाऊन निघत 'कृषी स्पंदन' महोत्सवात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयासह सर्व उपविभागीय व तालुका कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या या दोन दिवसीय महोत्सवाचा दिमाखदार समारोप झाला.

जिल्हा क्रीडा संकुल येथे स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाडयांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन झाले. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी आयोजित पथसंचलनातून महाविस्तार एआय ॲप, जागतिक महिला शेतकरी वर्ष, जल व मृदसंधारणाचे महत्त्व आणि ड्रोनद्वारे फवारणी यांसारख्या आधुनिक विषयांचे अत्यंत आकर्षक देखावे सादर करण्यात आले.

लेझीम पथक, वारकरी दिंडी आणि महिला शेतकरी वर्षाच्या निमित्ताने महिला कर्मचाऱ्यांच्या पथकाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. यशस्वी आयोजनासाठी उपविभागीय कृषी अधिकारी राहुल गायकवाड, श्रीमती भवारी (माजलगाव), उद्धव गर्जे आणि सूरज पाटील यांनी विशेष पुढाकार घेतला.

या महोत्सवात क्रिकेट, व्हॉलीबॉल, कबड्डी, खो-खो, बॅडमिंटन, कॅरम, बुद्धिबळ, गोळाफेक आणि धावण्याच्या स्पर्धा पार पडल्या. मैदानी खेळांनंतर रंगलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमात अधिकारी-कर्मचाऱ्यांनी गायन व नृत्याद्वारे आपल्या सुप्त कलागुणांचे दर्शन घडवत उपस्थितांची मने जिंकली. कृषी उपसंचालक जाधवर यांनी प्रास्ताविक केले, तर प्रमुख पाहुणे म्हणून कवी अनिलकुमार होळकर उपस्थित होते.

# विवेकानंद माध्यमिक विभाग शाळेमध्ये भव्यदिव्य विज्ञान प्रदर्शन संपन्न

## एकूण ४३ विद्यार्थ्यांनी याप्रसंगी विविध प्रयोग सादर केले



**तभा. वृत्तसेवा**

**केज प्रतिनिधी** | दि. ३ फेब्रुवारी- जीवन विकास शिक्षण मंडळ केज संचलित, स्वामी विवेकानंद विद्यामंदिर [ माध्यमिक विभाग ] या शाळेमध्ये राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त भव्यदिव्य असे विज्ञान प्रदर्शन भरवण्यात आले. यामध्ये ५ वी ते ६ वी ( लहान गट ) व ७ वी ते ८ वी ( मोठा गट ) या दोन गटामध्ये मिळून एकूण ४३ विध्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. या कार्यक्रमाचे उद्घाटन जीवन विकास शिक्षण मंडळ केज या संस्थेचे सचिव जी. बी. गदळे शाळेचे माजी मुख्याध्यापक व विज्ञान शिक्षक बी. पी. तिडके, ज्ञानसागर कोचिंग क्लाससेस चे संचालक प्रा. सिद्धेश्वर वायबसे शाळेच्या मु. अ. शिवनंदा मुळे यांनी केले. उद्घाटनानंतर या कार्यक्रमाचे परीक्षण शाळेतील विज्ञान शिक्षिका श्रीमती. गुंड मॅडम, विटेकर मॅडम तसेच तट सर व मैंद सर यांनी केले.

सर्व विध्यार्थ्यांनी अत्यंत उत्कृष्ट व विलोभनीय असे प्रयोग सादर केले. यामध्ये विध्यार्थ्यांनी लेझर तंत्रज्ञानाद्वारे पाण्यातील जिवाणू ओळखणे, भूअंतर्गत भूकंपाच्या हालचाली, स्वामी विवेकानंद स्मार्ट स्कूल, व इतर असे उल्लेखनीय प्रयोग सादर केले. राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त विज्ञान प्रदर्शनामध्ये लहान गटातून स्वरा राऊत हिने प्रथम पारितोषिक पटकावले. सोहम कापरे याने द्वितीय तर अनुज चाळक व विराज शिंदे यांनी तृतीय पारितोषिक मिळविले.

तर मोठ्या गटातून अजय आदमाने व अथर्व नेहरकर यांनी प्रथम क्रमांक पटकावला. तर शौर्य बारगजे व वेदांत राऊत यांनी द्वितीय तर सुदर्शन शिंदे याने तृतीय पारितोषिक मिळविले. या कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन शाळेतील विज्ञान शिक्षक तट सर तसेच त्यांचे सहकारी यांनी केले.

# केजची जिल्हा परिषद माध्यमिक शाळा पुन्हा नव्याने सुरु करा

## केज च्या आमदार सौ नमितताई मुंदडा यांनी शाळेचा मुद्दा मांडला विधानसभेत

**तभा. वृत्तसेवा**

**केज** | प्रतिनिधी

केजच्या गरीब व सामान्यांच्या मुलामुलींच्या उज्वल शैक्षणिक भविष्याचा सर्वोत्तम पर्याय असणारी व बंद पडण्याच्या मार्गांवर असणारी केजची जिल्हा परिषद माध्यमिक शाळा पुन्हा नव्याने सुरु करण्यासाठी केज च्या आमदार सौ नमितताई मुंदडा यांनी शाळेचा मुद्दा विधानसभेत मांडून केजवासियांना न्याय देण्याचा प्रयत्न केला त्याबद्दल केजवासिय व या शाळेच्या माजी विद्यार्थी संघ यांच्या वतीने अभिनंदन व आभार मानले आहेत.

केज शहरातील जिल्हा परिषद माध्यमिक शाळा ही एकेकाळी शहरातील एकमेव वैभवप्राप्त शाळा होती. मात्र अलीकडील काळात खाजगी शिक्षण संस्थांचे वाढते वर्चस्व व केजच्या नागरिकांचे शाळेकडे नकळत झालेले दुर्लक्ष यामुळे शाळा मोडकळीस आली होती. विद्यार्थी संख्या अभावी शाळा बंद करण्याचा निर्णय शासन स्तरावर चालू असतानाच सामाजिक कार्यकर्ते हनुमंत भोसले यांनी शाळेच्या गतवैभवाचा इतिहास व सद्यस्थिती याबद्दल सोसिअल मीडियावर जागृती केल्यानंतर शाळेचे माजी विद्यार्थी सुनिल हुलसूळकर, अभय कुलकर्णी, तय्यब शेख, गणेश सुरवसे व शेकडो माजी विद्यार्थी यांनी २६ जानेवारी २०२६ रोजी शाळेच्या प्रांगणात भव्य मेळावा व प्रभातफेरी काढून शाळा पुन्हा नव्याने सूरु करण्याचा निर्धार केला आहे. शाळा पुन्हा नव्याने सुरु करण्यासाठी जोरदार तयारी सूरू असून आता स्वतः आमदार नमितताई मुंदडा यांनी पुढाकार घेवून शाळेला भेडसावणाऱ्या समस्या विधानसभा सभागृहात मांडल्याने आता येथील सामान्य व गरीब विद्यार्थ्यांसाठी या शाळेचे दरवाजे येत्या जून २०२६ पासून उघडणार आहेत.

# धाराशिव-बीड-छत्रपती संभाजीनगर रेल्वे मार्गासाठी पाठपुरावा करणार

**तभा. वृत्तसेवा**

**बीड** | अहिल्यानगर-बीड-परळी वैद्यनाथ तसेच छत्रपती संभाजीनगर-बीड-धाराशिव रेल्वे मार्गासंदर्भात पाठपुरवा करण्याचा निर्धार स्वातंत्र्य सैनिक रेल्वे मागणी आंदोलन समितीच्या बैठकीत करण्यात आला. या प्रश्नावर तिन्ही जिल्ह्याचे खासदार बीडचे तसेच जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन त्यांची भेट घेण्याचे सर्वानुमते ठरले आहे. समितीचे ज्येष्ठ सदस्य अरुणराव डाके यांच्या निवासस्थानी झालेल्या बैठकीत समितीचे अध्यक्ष जवाहरलाल सारडा, सचिव सुनील क्षीरसागर, शांतीलाल पटेल, विष्णुदास बियाणी, रामचंद्र जोशी, आदी उपस्थित होते. या बैठकीमध्ये अहिल्यानगर-बीड-परळी वैद्यनाथ या लोहमार्गाच्या विकासकामांवर चर्चा करण्यात आली.तिन्ही जिल्ह्याचे खासदार तसेच जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्याचा निर्णय सर्वानुमते घेतला. सध्या असलेल्या चालू रेल्वे कामांमध्ये निर्माण झालेल्या अडथळ्यांवर चर्चा करण्यात आली. यासंदर्भात माहिती घेऊन जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्याचे ठरले. यासोबत धाराशिव-बीड-छत्रपती संभाजीनगर या नवीन रेल्वे मार्गासाठी कृती समितीने प्रयत्न करण्यासाठी नियोजन करण्यात आले. बीड, धाराशिव आणि छत्रपती संभाजीनगर येथील खासदारांना देण्याचे ठरले.

# चिमुकल्या कलाकारांनी जिंकली प्रेक्षकांची मने; स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

**तभा. वृत्तसेवा**

**केज** | प्रतिनिधी

केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील श्री संस्कार इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन येथील श्री संस्कार इंग्लिश स्कूल च्या प्रांगणात शनिवारी सायंकाळी मोठ्या उत्साहात संपन्न झाले.

याविषयी सविस्तर वृत्त असे की तालुक्यातील चिंचोली माळी येथील ग्रामीण भागातील अल्पावधीतच नावारूपाला आलेल्या श्री संस्कार इंग्लिश स्कूलच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी वार्षिक स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने आपल्या देखण्या शैलीत सुंदर नृत्य आविष्कार,



प्रबोधन पर गीते सादर केली.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवसंग्राम महिला आघाडी च्या जिल्हाध्यक्षा मा. सौ. ॲड मनीषाताई कुपकर या होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून केजचे गट शिक्षणाधिकारी मा. श्री. सुनील केंद्रे साहेब, मा. सौ. शीतलताई लांडगे, केज तालुका अध्यक्षा राष्ट्रवादी काँग्रेस महीला आघाडी (श.प) गट, चिंचोली माळीच्या सरपंच मा.सौ. रोहिणीताई सुनील देशमुख, मा. श्री राम मेजर, मा. अजय रमेश भिसे, अभियंता जलजीवन मिशन केज, मा. श्री दिलीप तात्या देशमुख, चेअरमन सेवा सहकारी सोसायटी वरपगाव, मा. श्री शरद गिराम सर, अध्यक्ष चाईल्ड इंग्लिश स्कूल केज, मा. श्री अरुण तात्या काळे, चेअरमन सेवासहकारी सोसायटी चिंचोली माळी, बंडु गव्हाणे, सरपंच बोरगाव बु, मा. श्री निखिल देशमुख, ह. भ. प. विष्णु महाराज शास्त्री, युवा उद्योजिका कु. दिपाली राजेंद्रार ऊत, माजी सुनील बापू देशमुख, ह .भ.प. आबा महाराज मेहकर हे होते.

# अंबाजोगाईत ५५ हजारांचा प्रतिबंधित गुटखा जप्त

**तभा. वृत्तसेवा**

**बीड** | अंबाजोगाई शहर पोलिसांनी शेपेवाडी परिसरात धाड टाकून ५५ हजार रुपये किमतीचा प्रतिबंधित गुटखा आणि सुगंधित तंबाखू जप्त केली आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक शरद जोगदंड यांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, आरोपी स्वतःच्या घरी बेकायदेशीररीत्या गुटख्याचा साठा करून त्याची विक्री करत होता. या माहितीची खातरजमा करून पोलीस पथकाने पंचांसमक्ष छापा टाकला असता, घरात मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित मुद्देमाल आढळून आला.

अन्न व औषध प्रशासनाच्या मान्यतेनंतर आरोपीवर भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम १२३, २७४, २७५ आणि २२३ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला. ही यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत आणि अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

अंबाजोगाई पोलिसांनी केलेल्या या धडक कारवाईमुळे अवैध गुटखा विक्रेत्यांचे धाबे दणाणले असून पोलीस उपनिरीक्षक शिंदे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# किल्ले धारूर युथ क्लबकडून प्रदूषणमुक्त होळी साजरी

**तभा. वृत्तसेवा**

**किल्ले धारूर (प्रतिनिधी)** | किल्ले धारूर युथ क्लब या सामाजिक संघटनेच्या वतीने दर वर्षाप्रमाणे प्रदूषणमुक्त होळी साजरी करण्यात आली. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत युथ क्लबच्या सदस्यांनी दुकानासमोरील परिसरातील कचरा,प्लास्टिक गोळा करून छ. शिवाजी महाराज चौक



जवळ साजरी केली.

होळीच्या निमित्ताने परिसर स्वच्छ ठेवण्याचा आणि प्लास्टिकमुक्त सण साजरा करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. “स्वच्छ शहर, सुंदर शहर” हा संदेश देत नागरिकांनाही पर्यावरणपूरक सण साजरा करण्याचे आवाहन करण्यात आले.

या उपक्रमावेळी किल्ले धारूर युथ क्लबचे फाऊंडर इंजि.संतोष दुबे, मा.अध्यक्ष दत्ता गोरे सचिव रवि गायसमुद्रे, सूर्यकांत जगताप, विशाल दीख्ख्त श्रीराम सिकची, पवन धोत्रे तेजस चव्हांण कोमटवार, विष्णू लांडगे इत्यादी उपस्थित होते. त्यांच्या या सामाजिक उपक्रमाचे नागरिकांकडून कौतुक करण्यात येत आहे.

# शेतकरी आणि वारकरी एकच; हक्कासाठी एकजुटीने लढण्याचे आवाहन

**तभा. वृत्तसेवा**

**बीड** | परळी येथे आयोजित शेतकरी कीर्तन महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी 'शेती, माती आणि माणूस' परिसंवादात बोलताना ज्येष्ठ पत्रकार विलास बडे यांनी शेतकरी आणि वारकरी संस्कृतीच्या संवर्धनावर विशेष भर दिला. संतांनी आपल्याला अन्यायाविरोधात आवाज उठवण्याची आणि हक्कासाठी लढण्याची शिकवण दिली असून, शेतकऱ्यांनी आता जाती-धर्माचे कृत्रिम भेद बाजूला सारून आपल्या हक्कासाठी एकजुटीने मैदानात उतरले पाहिजे, असे खणखणीत प्रतिपादन त्यांनी केले.

धोरणकर्ते मूळ प्रश्नांपासून लक्ष भरकटवण्यासाठी समाजात द्वेष निर्माण करत असल्याचा आरोप करत, बडे यांनी शेतकरी पुत्रांना संतांच्या विचारांतून संघर्षाची प्रेरणा घेण्याचे आवाहन केले. या प्रसंगी ६०० किलोमीटर खांद्यावर नांगर घेऊन आंदोलनात सहभागी झालेल्या ओमकार होनाळे यांचा विशेष सन्मान करण्यात आला. हभप अविनाश महाराज भारती, किशोर चाटे आणि ॲड. अजय बुरांडे यांच्या उपस्थितीत झालेल्या या सोहळ्यात मराठवाड्यातील शेतीचे प्रश्न, हमीभाव आणि तरुणांनी प्रक्रिया उद्योगाकडे वळण्याची गरज अधोरेखित करण्यात आली. संतांचे विचार केवळ भक्तीपुरते मर्यादित न ठेवता ते जगण्याच्या संघर्षात उतरवणे हीच काळाची खरी गरज असल्याचे मत यावेळी मान्यवरांनी व्यक्त केले.

# परळीत जगद्गुरू रेणुकाचार्य प्रकट दिनी ग्रंथाचे पारायण

**तभा. वृत्तसेवा**

**बीड** | परळी शहरातील आद्य जगद्गुरू रेणुकाचार्य महाराज मंदिरात प्रकट दिनी 'सिद्धांत शिखामणी' या वीरशैव धर्मग्रंथाच्या पारायणात महिला भाविक सहभागी झाल्या.

परळी येथील वैद्यनाथ मंदिर परिसरातील वीरशैव धर्माचे आद्य जगद्गुरू रेणुकाचार्य महाराज यांच्या मंदिरात प्रकट दिनानिमित्त पूजन, अभिषेक, आरती आदी कार्यक्रम पार पडले. पारायण सोहळ्यास महिलांचा मोठा प्रतिसाद मिळाला. वीरशैव लिंगायत समाजाच्या वतीने वक्रेश्वर मंदिरात 'सिद्धांत शिखामणी' या वीरशैव धर्मग्रंथाचे पारायण पार पडले. वीरशैव लिंगायत समाजाचे नेते डॉ. सुरेश चौधरी यांच्या पुढाकारातून पाच वर्षापासून प्रकट दिन आयोजित केला जातो. यावेळी सरोजनी चौधरी, गौरी चौधरी, अंबिका चौधरी, मंजूषा महाजन, गोदावरी चौधरी, शिवकन्या निर्मळे, ओपळे, व्ही. टी. साखरे आदी उपस्थित होते.

# गेवराई अत्याधुनिक फॉरेन्सीक व्हॅनचे लोकार्पण

**तभा. वृत्तसेवा**

**बीड** | बीड जिल्ह्यातील गेवराई उपविभागात गुन्हे तपासाला अधिक गती आणि वैज्ञानिक आधार देण्यासाठी एका विशेष फॉरेन्सीक व्हॅनचे उद्घाटन करण्यात आले. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ मधील तरतुदींनुसार सात वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त शिक्षा असलेल्या गुन्ह्यांच्या ठिकाणी तज्ञांची उपस्थिती अनिवार्य असल्याने गृह विभागाने हा निर्णय घेतला आहे.



पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांच्या मार्गदर्शनाखाली गेवराईला प्राप्त झालेल्या या व्हॅनचे (क्रमांक MH१२ZC९८५२) उद्घाटन उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके आणि पोलीस निरीक्षक किशोर पवार यांच्या हस्ते संपन्न झाले. या अत्याधुनिक वाहनात भौतिक, रासायनिक, जैविक आणि डिजिटल पुरावे गोळा करण्यासाठी आवश्यक सर्व साधने उपलब्ध आहेत. सहाय्यक रसायन विश्लेषक आणि प्रशिक्षित कर्मचाऱ्यांच्या पथकामुळे आता घटनास्थळावरूनच तांत्रिक पुरावे संकलित करणे सोपे होणार असून यामुळे गुन्हेगारांना शिक्षा मिळवून देण्यास मोठी मदत होणार असल्याचे मत वरिष्ठ अधिकाऱ्यांनी यावेळी व्यक्त केले.

# अंबाजोगाई जिल्हा कारागृहाच्या संरक्षक भिंतीसाठी 4 कोटींचा निधी

**बीड** | अंबाजोगाई येथील प्रस्तावित जिल्हा कारागृहाच्या ३० एकर शासकीय जमिनीला सुरक्षा प्रदान करण्यासाठी ४ कोटी ५ लक्ष ७९ हजार २५८ रुपयांच्या निधीला बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी प्रशासकीय मान्यता दिली आहे.

आमदार नमिता मुंदडा यांनी या कारागृहासाठी आणि जमिनीवर होणारी संभाव्य अतिक्रमणे रोखण्यासाठी शासनाकडे सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला या निर्णयामुळे मोठे यश मिळाले आहे.

# माजी आमदार रामराव वडकुते यांना भाजपकडून राज्यसभेवर संधी

## तातडीने रामराव वडकुते मुंबईला रवाना, हिंगोलीत भारतीय जनता पक्षाकडून जल्लोष





**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ मार्च**

माजी मंत्री तथा माजी विधान परिषद सदस्य रामराव वडकुते यांना भारतीय जनता पक्षाकडून राज्यसभेसाठी संधी देण्यात आली असून त्यांना बुधवार दि ४ ामार्च रोजी मुंबईला तातडीने पाचारण करण्यात आले आहे. माजी आमदार रामराव वडकुते यांच्या रूपाने हिंगोली जिल्ह्याला राज्यसभेवर स्थान मिळाल्यामुळे भाजपच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी येथील गांधी चौकात फटाक्यांची आतिषबाजी करीत जल्लोष साजरा केला आहे.

माजी आमदार रामराव वडकुते यांनी राष्ट्रवादीमधून भाजपमध्ये मागील दोन वर्षापूर्वी प्रवेश केला होता. धनगर-हटकर समाजाचे नेते म्हणून माजी आमदार रामराव वडकुते ओळखले जातात. राष्ट्रवादी कॉग्रेसमध्ये असतांना त्यांना २००२ मध्ये अहिल्यादेवी होळकर शेळीमेंढी विकास महामंडळावर वर्णी लागली होती. २००४ मध्ये हिंगोली विधानसभेतून उमेदवारी दिली होती. विधानसभेत पराभवानंतर त्यांना राष्ट्रवादीने विधान परिषदेवर घेतले होते. मात्र २०१९ मध्ये त्यांनी राष्ट्रवादीला सोडचिठ्ठी देत भारतीय जनता पक्षामध्ये प्रवेश केला. त्यांनी भाजपकडून कळमनुरी विधानसभा मतदार संघातून उमेदवारी मागितली होती. मात्र उमेदवारी देण्यात आली नाही. त्यानंतरही त्यांनी भाजपमध्ये राहणेच पसंत केले. भाजपच्या हिंगोली लोकसभा प्रभारी तर भाजपचे जिल्हाध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम केले आहे. भाजपच्या विधानसभा तसेच स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत पक्षाची जबाबदारी सांभाळात त्यांनी भाजपचा प्रचार केला. त्यांचे राजकीय पुर्नवसन होणार की नाही याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू असतांनाच आता राज्यसभेसाठी रामदाव वडकुते यांच्या नावावर पक्षाच्या वरिष्ठ पातळीवरून शिक्कामोर्तब करण्यात आले.

एक अभ्यासू नेतृत्व तसेच भाजपच्या प्रचारावेळी भाजपची कामे आणि योजनांचा त्यांनी मतदारसंघात जोरदार प्रचार केला. तसेच जिल्ह्यात ओबीसी समाजाला न्याय देण्यासाठी रामराव वडकुते यांची निवड करण्यात आल्याचे बोलले जात आहे. कळमनुरीसह जिल्ह्यात धनगर-हटकर समाज मोठ्या संख्येने असल्यामुळे त्यांना ही उमेदवारी दिल्याचे बोलले जात आहे. दि ४ मार्च रोजी रामराव वडकुते यांना तातडीने उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी मुंबईत पोहोचण्याचे आदेश पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी दिले आहेत. त्यानुसार ते मुंबईला रवाना झाले आहेत. हिंगोली जिल्ह्याला भाजपचा राज्यसभेवर खासदार जाणार असल्यामुळे भाजपमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

दरम्यान, माजी आमदार रामराव वडकुते यांची राज्यसभेवर भाजपकडून लॉटरी लागल्यामुळे येथील गांधी चौकात भाजपचे जिल्हाध्यक्ष गजानननराव घुगे यांच्या नेतृत्वात फटाक्यांची आतिषबाजी करीत जल्लोष साजरा करण्यात आला. यावेळी माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, माजी जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, सरचिटणीस उमेश नागरे, शशीकांत वडकुते, विलास गोरे, पुरोहीत, माजी नगरसेवक सदाशिव सूर्यतळ, राजू यादव, कैलास शहाणे, दिपक सेठी, पवन उपाध्याय, संदीप वाकडे, आनंद सातपुते आदींची उपस्थिती होती.

## ड्रंक ॲन्ड ड्राईव्ह अंतर्गत १०३ वाहन चालकांवर कारवाई



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ मार्च**

हिंगोली पोलिस विभागाच्यावतीने धुलीवंदन आणि होळीच्या कालावधीत ड्रंक ॲन्ड ड्राईव्ह अंतर्गत १०३ जणांवर गुन्हे दाखल करीत त्यांच्याकडून दंड आकारण्यात आला आहे.

धुलीवंदनाच्या निमित्ताने जिल्हाम ध्ये कायदा व सुव्यवस्था अबाधित राहून दारूचे सेवन करून वाहन चालवणाऱ्यावरप्रतिबंधक कार्यवाही करून अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांनी जिल्ह्यात सर्वत्र नाकाबंदीचे आयोजन करण्यात आले होते. वसमत, हिंगोली, कळमनुरी, आखाडा बाळा-पूर, सेनगाव, औंढा नागनाथ आदी ठिकाणी पोलिसांची पथके तैनात करण्यात आली होती. दारू पिऊन वाहन चालवणाऱ्या विरुद्ध तपासणी मोहीम चालू केली होती त्या अनुषंगाने जिल्ह्यात एकूण नऊ वाहन चालकाविरुद्ध दारू पिऊन वाहन चालवण्यासंदर्भात गुन्हे दाखल करण्यात आले असून एकूण १०३ वाहन चालकाविरुद्ध बेकायदेशीर वाहन चालवल्यासंदर्भाने एकूण ९६ हजार ९०० रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे त्यामुळे दारू पिऊन वाहन चालवणाऱ्यांची चांगलीच झिंग हिंगोली पोलिसांनी उतरवली आहे.

हिंगोली पोलीस दलातर्फे सर्व वाहन चालकांना व वाहनधारकांना आ-वाहन करण्यात येते की कोणीही अवैध प्रवासी वाहतूक करू नये तसेच दारू पिऊन वाहन चालू नये मोटार वाहन कायद्यानुसार ठरवून दिलेल्या नियमांचे सर्वांनी पालन करावे व अपघात टाळावे.

## दीड महिन्यांपासून फरार आरोपीला स्थागुशाने केले जेरबंद



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ मार्च**

कळमनुरी पोलिस ठाण्याच्या हद्दीत बाल लैंगिक अत्याचार प्रकरणी गुन्हा दाखल झाल्यानंतर फरार झालेल्या आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने दीड महिन्यानंतर सोमवारी रात्री जवळा पांचाळ शिवारात पाठलाग करून जेरबंद केले. त्याला कळमनुरी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार कळमनुरी पोलिस ठाणे अंतर्गत एका गावामध्ये शेख नोमान शेख वकील वय २१ याने एका अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याची घटना घडली होती. सदर प्रकार त्या मुलीने तिच्या कुटुंबियांना सांगितल्यानंतर तिच्या कुटुंबियांनी मुलीला सोबत घेत थेट कळमनुरी पोलिस ठाणे गाठून मुलीच्या तक्रारीवरून कळमनुरी पोलिसांनी शेख नोमान शेख वकील याच्याविरूध्द बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला होता. मात्र गुन्हा दाखल होताच आरोपी फरार झाला होता. कळमनुरी पोलिसांनी त्याच्या शोधासाठी पथके रवाना केली होती मात्र प्रत्येक वेळी तो पोलिसांना हुलकावणी देत होता. मागील दीड महिन्यांपासून त्याचा शोध सुरू होता. मुलीच्या कुटुंबियांनी अखेर हिंगोली येथे वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांची भेट घेत आरोपीला अटक करण्याची मागणी केली होती. त्यानुसार पोलिस अधीक्षक निलाभ रोहन, अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना, स्थागुशाचे पोनि मोहन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरीक्षक शिवसांब घेवारे, जमादार गजानन पोकळे, हरिभाऊ गुंजकर, आकाश टापरे, नरेंद्र साळवे, शिवाजी जालमिरे यांचय पथकाने त्याचा शोध सुरू केला होता. आरोपी जवळा पांचाळ येथील एका आखाड्यावर असल्याची माहीती पथकाला मिळाली. पथकाने रात्री जवळा पांचाळ शिवार गाठले. मात्र पोलिस येत असल्याचे लक्षात येताच आरोपीने पळ काढला. पोलिसांनी पाठलाग करीत त्यास जेरबंद केले.



**हिंगोली– इराण–अमेरीका–इस्त्रायल यांच्या युध्दामुळे पेट्रोल आणि डिझेलच्या किंमती वाढणार असल्याची अफवा पसरल्यामुळे मंगळवारी रात्री आणि बुधवारी सकाळी विविध पेट्रोल पंपावर वाहनांच्या रांगा लागल्याचे दिसत होते. छाया– सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### राजरत्न कुंटे यांची पोलिस पाटीलपदी नियुक्ती



वसमत– तालुक्यातील कोनाथा येथील राजरत्न सुभाषराव कुंटे यांची पोलीस पाटील म्हणून नियुक्ती झाली आहे. यावेळी ग्रामपंचायतच्या वतीने यांचा ग्रामपंचायतीमध्ये सत्कार करण्यात आला यावेळी या कार्यक्रमाला अशोकराव बेंडे, गजानन बेंडे, संजय कातोरे, बापूराव बेंडे, भुजंग बेंडे, मारोती बेंडे यांच्यासह गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते राजरत्न कुंटे यांनी मागील अडीच वर्षात ग्रामपंचायत सरपंच म्हणून काम पाहिले. त्यांच्या कार्यकाळामध्ये ग्रामपंचायत मध्ये विकास झाला. तरुण एक हुशार व्यक्तिमत्व पोलीस पाटील म्हणून नियुक्ती झाल्यामुळे गावकऱ्यांनी त्यांचा सत्कार केला.

### ग्रेन मर्चंट संघटनेच्यावतीने क्रिकेट सामने



हिंगोली– ग्रेन मर्चंट असोसिएशन यांच्यावतीने व नमो चषक मोंढा प्रीमियर क्रिकेटचे लिग सीज़न ४ सामने आयोजित करण्यात आले या क्रिकेट सामन्याचे उद्घाटन भाजपा जिल्हाध्यक्ष व माजी आमदार गजाननराव घुगे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ज्येष्ठ व्यापारी रमेशचंद्र चांडक, राधेश्याम अग्रवाल, प्रकाशचंद सोनी, नरेंद्र दोडल, बाबुशेठ बरडिया, अशोक मूंदड़ा, प्रकाश सोनी, ज्ञानेश्वरजी मामडे, रमेशचंद सोनी, मुरलीधर पांडे, सुरेशराव शिंदे, सत्यनारायण लोहिया, बालाप्रसाद तापडिया, सुभाष अप्पा येवते, देविदास घुगे, राजेश भंडारी, पवन व्यास, दिलीपराव देशमुख, सुरज बोडखे, शिवशंकर घुगे व इतर व्यापारी हजर होते. या सामन्यांचे आयोजन राहुल सोनी, सुमित चांडक, किसन सोमानी व ग्रेन मर्चंट असोसिएशन हिंगोली च्या वतीने करण्यात आले होते. या सामन्यांमध्ये १२ संघानी सहभाग घेतला होता.

### जुगार अड्ड्यावर छापा, मुद्देमाल जप्त

हिंगोली– पोलिस विभागाच्यावतीने अवैध धंदे करणाऱ्याविरूध्द जोरदार मोहीम उघडण्यात आली असून एका ठिकाणी जुगार अड्ड्यावर छापा मारून २ लाख १४ हजार ६७० रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

## दारूबंदी कायद्यांतर्गत २० ठिकाणी छापे



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ मार्च**

हिंगोली पोलिसांनी धुलीवंदनाच्या दिवशी दारूबंदी कायद्यांतर्गत २० ठिकाणी छापे मारून सुमारे २ लाख ५८ हजार ८७० रूपयांची दारू व मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी संबंधितांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलिस विभागाच्यावतीने अवैध दारू विक्री करणाऱ्याविरोधात जोरदार मोहीम राबविण्यात आली. यावेळी विविध २० ठिकाणी पोलिसांनी छापे मारीत २ लाख ५८ हजार ८७० रूपयांची दारूसह मुद्देमाल जप्त केला आहे. सदरची कार्यवाही पोलिस अधीक्षक निलाभ रोहन, अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना, स्थागुशाचे पोनि मोहन भोसले यांच्यासह पथकांनी केली

## हिंदू संमेलनाला मोठ्या संख्येने जनसमुदायाची उपस्थिती



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ मार्च**

येथील रामलीला मैदान हिंगोली विराट हिंदू संमेलनास हिंदू समाजातील पुरुष आणि तसेच तरुणही मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

उपस्थित सभेला सर्व हिंदू यांनी कशाप्रकारे आपल्या जन्मदात्री माता ज्या मातेच्या अंगावर आपण जन्म घेतला त्या भारत मातेची सेवा सदैव केली पाहिजे. भारत मातेच्या रक्षणासाठी आपली बलिदान ही द्यायची वेळ आली तर तेही दिले पाहिजे, असे आवाहन या संमेलनास आलेले वक्ते इंद्रेश कुमार यांनी केले. तर सर्व हिंदू बांधवांनी याकरिता आम्ही सदैव तत्पर राहू असे आश्वासन देत भारत माता की जय च्या घो-षणा दिल्या.

या कार्यक्रमास हिंगोली जिल्ह्यातील अनेक संत, महंत यांनी आपली उपस्थिती दर्शविली. सायंकाळी सहा वाजून ४५ वाजता या संमेलनात सुरुवात झाली. मंचावरील उपस्थित सर्व संत-महंत यांनी दीप प्रज्वलन आणि भारत मातेचे पूजन केले तदनंतर डॉक्टर झडपे यांनी हिंदू संमेलना-ची प्रस्तावना केली, या संमेलनाचा उद्देश सर्व हिंदू बांधवांना सांगितला तर मुख्य वक्ते इंद्रेश कुमार अखिल भारतीय कार्यकारिणी सदस्य राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांचा पूर्ण परिचय कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करणारे एकनाथ भारती यांनी करून दिला. इंद्रेश कुमार यांनी आपल्या भाषणात आपण कोण आहोत आणि या भारत भूमीवर का आलो समजून घेणे आपणा सर्वांसाठी अधिक महत्त्वाचे आहे हे आपणास समजल्यास आपण या देशाची सेवा करू पर्यायी देश संपन्न होईल. समाजातील अस्पृश्यता मुळातून नाहीशी झाली पाहिजे तसेच पर्यावरणाचा समतोल राखण्याकरिता आपण सर्वांनी प्रयत्न केला पाहिजे. आपण सर्वांनी आपल्या कुटुंबासह आपल्या भारतीय संस्कृतीची जपणूक केली पाहिजे. आपल्या देशाच्या विकासामध्ये आपण काय करू शकतो याचाही विचार केला पाहिजे असे अनेक देशभक्तीपर विचार त्यांनी आपल्या भाषणातून हिंदू समाजाला सांगितले. या संम ेलनातील समितीने हा कार्यक्रम यशस्वीतेसाठी हिंदू संमेलन समीने परिश्रम घेतले. समितीचे अध्यक्ष मुरली हेडा यांनी कार्यक्रमात शेवटी आभार प्रदर्शन केले. सामूहिक पसायदानाने कार्यक्रम संपन्न झाला. सर्वात शेवटी उपस्थित हिंदू समाजाने महाप्रसादाचा लाभ घेतला.

## सांदीपनी पब्लीक स्कूलमध्ये मराठी भाषा गौरव दिन, विज्ञान दिन साजरा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ मार्च**

सांदीपनी पब्लिक स्कूल, सुनील नगर, तरोडा (बु), नांदेड येथे मराठी भाषा गौरव दिन आणि राष्ट्रीय विज्ञान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात शाळेचे सहसंचालक मुकुल राठोड व मुख्याध्यापिका क्रांती कुलकर्णी यांच्या हस्ते कुसुमाग्रज आणि डॉ. सी. व्ही. रमण यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून झाली. त्यानंतर विज्ञान विषयाशी संबंधित प्रात्यक्षिक सादर करून विज्ञान दिनाची सुरुवात करण्यात आली. विद्यार्थिनी अपूर्वा पवार, आरोही पाटील, प्रशंसा राठोड, गुंजन जमदाडे, विधीता राठोड, स्वराली चिंचोळकर यांनी आ-पले मनोगत व्यक्त केले. तसेच प्रांजली चव्हाण हिने मराठी गाण्यावर नृत्य सादर करून प्रेक्षकांची मने जिंकली. विज्ञान विषयाचे सहशिक्षक काळेश्वर पावडे यांनी विज्ञानाचे महत्त्व पटवून दिले, तर मराठी विषयाचे सहशिक्षक अरविंद काळेवार यांनी विन-ोदी शैलीत मराठी भाषेचे महत्त्व अधोरेखित केले. शेवटी विद्यार्थ्यांनी विज्ञानावर आधारित प्रकल्पांचे सादरीकरण करून उपस्थितांना प्रभावित केले. या कार्यक्रमाला शाळेचे संचालक सुनील राठोड, सहसंचालक मुकुल राठोड, मुख्याध्यापिका क्रांती कुलकर्णी, उपमुख्याध्यापिका सौ. हरप्रित कौर, प्रशासक मारुती मेखाले व शैक्षणिक सल्लागार केदार शर्मा आणि शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अरविंद काळेवार यांनी केले.

## दराडे विद्यालयात विज्ञान दिन साजरा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ मार्च**

भारतीय विद्या मंदिर शिक्षण संस्था संचलित श्रीमती शांताबाई मुंजाजी दराडे माध्यमिक विद्यालय येथे राष्ट्रीय विज्ञान दिन मोठ्या उत्स-ाहात व प्रेरणादायी वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रम ाची सुरुवात भारतरत्न शास्त्रज्ञ सी. व्ही. रमण व माजी राष्ट्रपती, 'मिसाइल मॅन' म्हणून ओळखले जाणारे ए . पी.जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमांचे पूजन करून करण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुप्रिया यरमळ यांनी केले. त्यांनी राष्ट्रीय विज्ञान दिनाचे महत्त्व स्पष्ट करताना विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन केले.

हनुमान जाधव, अंबिका जाधव, श्रावणी कदम, प्रगती जावळे, श्रद्धा जगताप, अक्षरा बांगर, मोक्षदा माने व सृष्टी वायचाळ या विद्यार्थ्यांनी विज्ञानाचे दैनंदिन जी-वनातील स्थान, संशोधनाची गरज आणि नवोन्मेषाची प्रेरणा यांवर भाष्य केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा हिंगोली जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष डॉ. प्रकाश अंभोरे हे होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ. अंभोरे यांनी विज्ञान विषयाचे मानवी जीवनातील अनन्यसाधारण महत्त्व अधोरेखित करताना विद्यार्थ्यांनी जिज्ञासा, निरीक्षणशक्ती व प्रयोगशील वृत्ती जोपासावी, असे मार्गदर्शन केले. विज्ञान म्हणजे केवळ विषय नव्हे, तर विचार करण्याची पद्धत आहे, असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना संशोधनात्मक दृष्टीकोन अंगीकारण्याचे आवाहन केले.प्रमुख पाहुणे म्हणून उपमुख्याध्यापक अनिल लोळेवार, पर्यवेक्षक भारत शिंदे, संजयसिंह गहेरवार, किरण राजपूत व ए. बी. चोंढेकर यांची उप-स्थिती लाभली. गणित अध्यापक अमोल कान्हेड यांनी कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अर्पिता खिल्लारे व श्रद्धा शिंदे यांनी केले. श्रुतिका माने हिने आभार प्रदर्शन मानले. भारतीय विद्या मंदिर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा. मदन मार्डीकर, सचिव ॲड गयबाराव नाईक व सर्व संचालक यांनी सर्व विद्यार्थ्यांना व शिक्षकांना शुभेच्छा दिल्या.

# अनैतिक संबंधांच्या आरोपातून संतप्त टोळक्यांच्या मारहाणीत एका युवकाचा जागीच मृत्यू

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. ४ मार्च-**

बिलोली तालुक्यातील थडीसावळी परिसरात अनैतिक संबंधांच्या संशयातून २२ वर्षीय तरुणाची निर्घृणहत्या झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी पोलीस स्टेशन रामतीर्थ येथे खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

मृत तरुणाचे नाव दुर्गेश सिंग दारा सिंग ठाकूर (वय २२ वर्षे, व्यवसाय शेती) असे आहे. ३ मार्च २०२६ रोजी सकाळी साडेसात ते आठ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. गंगा सिंग ठाकूर यांच्या घरी आरोपींनी एकत्र जमून दुर्गेश सिंग याला घरातून शेजारील ठिकाणी आणले. तू ज्योती हिच्यासोबत अनैतिक संबंध का ठेवलेस? असा जाब विचारत शिवीगाळ आणि मारहाण करण्यात आल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

आरोपी क्रमांक १ ते ८ यांनी लाथाबुक्यांसह केबल वायरने तोंड, हात, पाठ व छातीवर बेदम मारहाण केली. आरोपी क्रमांक ९ यानेही केबल वायरने मारहाण करत गुप्तांगावर जोरदार लाथ मारल्याचे नमूद आहे. या अमानुष मारहाणीमुळे दुर्गेश सिंग याला उलटी होऊन तो जागीच कोसळला व त्याचा मृत्यू झाला.

या घटनेप्रकरणी फिर्यादी रविंद्रसिंह हनुमानसिंह ठाकूर (वय ४८ वर्षे, रा. थडीसावळी) यांच्या तक्रारीवरून गुन्हा क्रमांक ३४/२०२६ नोंदविण्यात आला आहे. भारतीय न्याय संहिता (इछड २०२३) अंतर्गत कलम १०३,१८९(२), १९१(२),१९०, ११८(१), ११५(२),३५२आदी कलमान्वये रामतीर्थ पोलीसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्याचा तपास सपोनि विक्रम. हराळे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असून आरोपींच्या अटके साठी पोलिसांची पथके रवाना करण्यात आली आहेत. या घटनेमुळे थडीसावळी व परिसरात हळहळ व्यक्त होत असून, अनैतिक संबंधांच्या संशयातून एका तरुणाचा बळी गेल्याने गावात तणावाचे वातावरण आहे. पुढील तपासात आणखी धक्कादायक बाबी समोर येण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

# एक पावती, अनेक फेऱ्या; देगलूरात रेती माफियांकडून कोट्यवधींची लूट!

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. ४ मार्च-**

नांदेड जिल्ह्यातील बिलोली तालुक्यातील सगरोळी येथील नव्याने सुरू झालेल्या वाळू घाटातून सुरू असलेल्या अवैध रेती वाहतुकीने देगलूर तालुक्यात खळबळ उडवली आहे. सामाजिक कार्यकर्ते भिमराव रामराव दिपके यांनी प्रशासनाला धारेवर धरत गंभीर आरोप करत थेट प्रश्न उपस्थित केला आहे प्रशासन झोपेत आहे की डोळेझाक करत आहे?

मिळालेल्या माहितीनुसार, सगरोळी घाटातून दिवस-रात्र २४ तास रेतीचे टिप्पर देगलूर मार्गे थेट कर्नाटक राज्यात धाव घेत आहेत. अंदाजे ७० ते ८० हून अधिक टिप्पर विविध मार्गांनी रेतीची अवैध वाहतूक करत असून एकाच पावतीवर अनेक फेऱ्या करून शासन महसुलाची उघडपणे फसवणूक केली जात आहे. काही वाहनांवर क्रमांक प्लेट नसल्याने कायद्याची सरळ पायमल्ली होत असल्याचे चित्र दिसून येत आहे.



विशेष म्हणजे, देगलूर तहसील कार्यालय आणि उपजिल्हाधिकारी कार्यालयासमोरूनच ओव्हरलोड वाहने धावत असताना प्रशासनाकडून ठोस कारवाई न झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप उसळला आहे. रस्त्यावर पडणाऱ्या रेतीमुळे अपघातांचा धोका वाढला असून पर्यावरणीय हानी गंभीर स्वरूप धारण करत आहे.

सदर प्रकार हा Mines and Minerals (Development and Regulation) ct, 1957, Environment (Protection) ct, 1986, Motor Vehicles act, १९८८ तसेच भारतीय दंड संहितेतील कलम ३७९, ४२० व १८८ यांचे स्पष्ट उल्लंघन असल्याचा आरोप करण्यात आला आहे. महाराष्ट्र शासनाच्या वाळू धोरण नियमावली २०२३ चेही उघड उल्लंघन होत असल्याचे निवेदनात नमूद आहे.

अवैध उत्खननामुळे शासन महसुलाचे कोट्यवधींचे नुकसान होत असून रस्ते सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. संबंधित वाळू घाट चालक व ओव्हरलोड वाहनधारकांवर त्वरित गुन्हे दाखल करावेत, २४ तास विशेष पथक नियुक्त करावे व संयुक्त तपासणी नाके उभारून कठोर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, प्रशासनाने तात्काळ कारवाई न केल्यास देगलूर उपजिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे. आता प्रश्न एकच रेती माफियांचा 'हैदोस' थांबणार की प्रशासनाची मौनसंमती कायम राहणार? याकडे जनतेचे लक्ष लागले आहे.

## निवळीत अखंड हरिनाम सप्ताहास आजपासून प्रारंभ

**आदमपूर** -मुखेड तालुक्यातील ग्राम निवळी येथे वंदनीय ह.भ.प. गुरूवर्यांच्या कृपाशिर्वादाने श्री.संत तुकाराम महाराज बीज महोत्सवाचे औचित्य साधत गुरूवार दि.५ मार्च पासून अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ होत आहे.हा भाव भक्तिरूपी सोहळा यशस्वी करण्यात सर्व गावकरी तनामनाने एकसंघ गुंतले आहेत. येथील अखंड हरिनाम सप्ताह निवळी गाव परिसरात दरवर्षीप्रमाणेच वैशिष्ट्यपूर्ण असते. दि.५ मार्च पासून क्रमाने गुरुवार दुपारी संत तुकाराम महाराज बीज महोत्सवानिमित्त ह.भ.प.ब्रम्हानंद महाराज जाहूनरकर त्यानंतर ह.भ.प.विलास पाटील महाराज अंबुलगेकर, ह.भ.प.संतोष महाराज उदगीरकर, ह.भ.प.गणपत देसाई महाराज हंगरगेकर,ह.भ.प. गंगाधर महाराज वसूरकर,संत एकनाथ महाराज षष्टी निमित्त सोमावार दुपारी ह.भ.प.जयवंत महाराज सुगावे गोजेगांवकर तद्नंतर ह.भ.प.संगयअप्पा स्वामी महाराज कंठाळीकर, ह.भ.प.निवृत्ती महाराज रावीकर, गाथापुजेनिमित्त ह.भ.प.अमोल महाराज कारेपूर लातूरकर,अखेर गुरूवार दि.१२ मार्च रोजी ह.भ.प.लक्ष्मण महाराज भेंडेगावकर यांच्या उपस्थितीत काल्याचे किर्तन,महाप्रसाद हा कार्यक्रम संपन्न होणार आहे.अन्नदान,महाप्रसाद अनुक्रमे माधव बारसोळे,ज्ञानेश्वर येडे,बालाजी धनपवाड, व्यंकट बिरादार,तेजेराव ढोबळे,व्यंकट काटेवाडे, बालाजी बिरादार, माधव मादलापुरे,हणमंत नेवळे, केशवराव बिरादार,मारोती नेवळे,हाणमंत दादाराव नेवळे,बालाजी पाटील,गणेश कासराळे,केशव माळेगावे,बालाजी सोमावार, गुणवंत बिल्लाळे,मनोहर टोम्पे,माधवराव पाटील,उमाकांत मंगनाळे,सुरेश मसलगेकर, मारोती काटेवाडे,महेश बिरादार होनाळी यांच्यावतीने भाविक भक्तगण आणि गावकऱ्यांना आयोजित केले आहे. सप्ताह सेवेकरी म्हणून विणेकरी प्रमुख माधवराव पाटील, गाथा पारायण प्रमुख बालाजीराव बिरादार व परिसरातील गायक,जागर प्रमुख, मृदंगवादक, गायनाचार्य, गाथाभजन प्रमुख, काकडा प्रमुख, हरिजागर, हरिपाठ प्रमुख आदिंचा सहभाग असणार आहे.अखेर गुरूवार दि.१२ मार्च रोजी महाप्रसादाचे आयोजन घेऊन सप्ताह सोहळ्याची सांगता करण्यात येईल. सप्ताहातील दैनंदिन कार्यक्रम पहाटे काकडा आरती, सकाळी गाथा पारायण, गाथा भजन, सायंकाळी हरिपाठ, हरि किर्तन रात्री हरि जागर असा नित्यक्रम सुरू राहणार आहे.गाव परिसरातील वैष्णव भक्तांनी सदरील भावभक्तीरूपी निर्गुण, निराकार सोहळ्याचा याचकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन समस्त निवळी गावकरी व भजनी मंडळींकडून करण्यात आले आहे.

## मस्जिद युनूसच्या वतीने ॲड कासिम वसीम बाबूसेठ कार्यालयात इफ्तार समारंभाचे आयोजन

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ४ मार्च-**

पवित्र रमजान महिन्याच्या निमित्ताने नांदेड येथील मस्जिद युनूसच्या व्यवस्थापनाने रेल्वे स्टेशनवरील ॲड कासिम वसीम बाबू सेठ कार्यालयात इफ्तार समारंभाचे आयोजन करून एकतेचा संदेश देण्याचे उत्तम काम केले.

उपवास सोडण्याच्या (रोज़ा इफ्तार) समारंभाचे वैशिष्ट्य म्हणजे नांदेडमधील सर्व धार्मिक समुदायांचे धार्मिक नेते आणि प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

यावेळी नांदेड जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार,मौलाना साद साहिब नदवी, मुफ्ती अयुब साहिब कासमी, मुफ्ती अब्दुल रज्जाक साहिब, भिकू संघाचे अध्यक्ष पय्याबोधी भंते जी, मेथोडिस्ट चर्च डीएस रेव्हरंड प्रशांत चांदुरीकर, रेव्हरंड मुसापाल सर, गुरुद्वारा बोर्डाचे माजी अधीक्षक रणजित सिंह चिरागिया, नानक साई फाऊंडेशन चे संस्थापक तथा ज्येष्ठ पत्रकार पंढरीनाथ बोकारे उपस्थित होते.

# नांदेड- गोवा विमानसेवा ३१ मार्चपासून

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ४ मार्च-**

धुलीवंदनाच्या पर्वावर नांदेडकरांसाठी आनंदाची बातमी समोर आली आहे. येथील श्री गुरु गोबिंदसिंघजी विमानतळ येथून बहुप्रतिक्षित नांदेडगोवा विमानसेवा येत्या ३१ मार्चपासून सुरू होत आहे. त्याचबरोबर नांदेडनागपूर विमानसेवा पुन्हा पूर्ववत होणार असून, बंगळुरूसाठी आणखी एका विमानसेवेची भर पडणार आहे. माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून ही माहिती देत या नव्या सेवांचे स्वागत केले आहे.

उपलब्ध माहितीनुसार स्टार एअर कंपनीची गोवा (मोपा) नांदेड नागपूर ही विमानसेवा मार्च अखेरीस सुरू होणार आहे. शुक्रवार वगळता आठवड्यातील सहा दिवस ही सेवा उपलब्ध राहिल. या सेवेअंतर्गत गोवा (मोपा) येथून सकाळी ९.३० वाजता उड्डाण करणारे विमान सकाळी १०.५० वाजता नांदेड येथे पोहोचेल. त्यानंतर सकाळी ११.२० वाजता नांदेडहून उड्डाण घेऊन दुपारी १२.३० वाजता ते नागपूर येथे उतरेल. परतीच्या प्रवासात दुपारी १२.४० वाजता नागपूरहून उड्डाण घेणारे विमान दुपारी १.३० वाजता नांदेड येथे दाखल होईल. पुढे दुपारी २.०० वाजता नांदेडहून गोवा (मोपा)कडे उड्डाण करून दुपारी ३.२० वाजता तेथे पोहोचेल.

याशिवाय फ्लाय-९१ ही विमान कंपनी २९ मार्चपासून नांदेडबंगळुरू विमानसेवा सुरू करणार आहे. त्यामुळे नांदेडहून बंगळुरूसाठी एकूण दोन विमानसेवा उपलब्ध होतील.

या तीनही सेवा सुरू झाल्यानंतर नांदेडहून मुंबई, पुणे, नागपूर, गाझियाबाद (हिंडन), अहमदाबाद, गोवा, बंगळुरू आणि हैद्राबाद या आठ प्रमुख शहरांसाठी थेट विमानसेवा उपलब्ध होणार आहे. नांदेडच्या विकासाच्या दृष्टीने हे एक महत्त्वाचे पाऊल ठरणार असून, उद्योग, पर्यटन, शिक्षण आणि व्यावसायिक क्षेत्राला निश्चितच याचा मोठा लाभ होईल, असे खा. अशोकराव चव्हाण यांनी नमूद केले आहे.

## नांदेडमध्ये ७ मार्च ला संयुक्त जयंती महोत्सव

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ४ मार्च-**

भारतीय पिछडा शोषित संघटन, नांदेडच्या वतीने राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या शतकोत्तर सुवर्ण महोत्सव जयंती निमित्त आणि संत सेवालाल महाराज यांच्या जयंती निमित्त विशेष अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा सोहळा शनिवार, दि. ७ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ४ वाजता शिवाजीनगर येथील हॉटेल विसावा (नाना-नानी पार्क जवळ) येथे पार पडणार आहे.

# पेट्रोल किंवा डिझेलचा कोणताही तुटवडा नाही: जिल्हाधिकारी राहुल कर्डिले

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ४ मार्च-**

सध्या मध्यपूर्व व परिसरातील काही देशांमध्ये निर्माण झालेल्या तणावपूर्ण परिस्थितीमुळे भारत देशात पेट्रोलचा तुटवडा जाणवणार आहे व पेट्रोलचे भाव मोठ्या प्रमाणात वाढणार आहेत, अशी अफवा जनतेमध्ये पसरत आहे. या अफवेमुळे नांदेड जिल्हा तसेच शहरामधील मधील विविध पेट्रोल पंपांवर नागरिकांनी अनावश्यक गर्दी केल्याचे निदर्शनास आले आहे.

जिल्हा प्रशासन स्पष्टपणे कळविते की पेट्रोल किंवा डिझेलचा कोणताही तुटवडा नाही तसेच इंधनदर वाढीचा कोणताही प्रस्ताव शासनाकडे प्राप्त नाही. ही माहिती पूर्णपणे खोटी असून नागरिकांनी अशा प्रकारच्या अफवांवर विश्वास ठेवू नये. नांदेड जिल्ह्यात इंधन साठा सुरळीत असून पुरवठा नियमित पद्धतीने सुरू आहे. त्यामुळे पेट्रोल-डिझेल भरण्यासाठी घाईगडबड करून गर्दी करण्याचे कोणतेही कारण नाही त्यामुळे जिल्ह्यातील नागरिकांनी कोणत्याही प्रकारच्या अप्रमाणित बातम्यांवर विश्वास ठेवू नये. अधिकृत माहिती फक्त शासन व जिल्हा प्रशासनाच्या माध्यमांतूनच स्वीकारावी, पेट्रोल पंपांवर शिस्त राखावी व अनावश्यक रांगा टाळाव्यात.

जिल्हा प्रशासन परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवून असून नागरिकांनी भीती न बाळगता व अफवांना बळी न पडता दैनंदिन व्यवहार सुरळीतपणे सुरू ठेवावेत. असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

## लहान मुलांच्या गळ्यातील दागिणे चोरण्याच्या प्रकारात वाढ

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि. ४ मार्च-**

शहरात लहान मुलांच्या अंगावरीन सोन्या - चांदीचे दागिने चोरणारी टोळी सक्रिय झाली असल्याने पालकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.

लोहा बस स्थानका लगत आंबेडकर नगर मोठी वसाहात आहे .अनेक अनोळखी व्यक्ती गल्लीत ये जा करतात असतात. परंतु कुणाचा तरी नातेवाईक असेल ही भावना लोकांच्या मनात असते. त्यातच मोटारसायकलवरुन चकरा मारणाऱ्यांची संख्या देखील वाढली आहे. नुकतेच आंबेडकर नगर येथील सदानंद महाबळे यांच्या नातवाच्या गळ्यातील, कानातील एक ग्राम सोन्याची काडी व पेटी, बाळु कापुरे यांच्या मुलाच्या कानातील सोन्याची काडी व पायातील पैंजण, नगरसेविका सिमा खिल्लारे यांच्या मुलीच्या हातातील चांदीचे कंगण अज्ञात व्यक्तीने काढुन घेतल्याची घटना घडली. ही घटना काही तास व दिवसां नंतर आई वडीलांच्या लक्षात आली. या संदर्भात पोलिसांत तक्रार दाखल केली नाही पण पालकांत चिंता वाढली आहे.

## हजुरी पाठी संघटनेची वयोवृद्ध पाठी सिंघना निराधार सहाय्य देण्याची मागणी

**नांदेड** -तख्त सचखंड श्री हजूर अबचलनगर साहिब येथे अनेक दशकांपासून सेवा करत असलेल्या तीन वयोवृद्ध पाठी सिंघना निराधार (आर्थिक) सहाय्यता देण्याची मागणी हजुरी पाठी संघटनेतर्फे करण्यात आली आहे. संघटनेने प्रशासक डॉ. विजय सतबीर सिंह यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, पाठी स. मनमोहनसिंह दफेदार, पाठी स. हरभजनसिंह जेठरा, पाठी स. मानसिंह मान हे तिन्ही पाठी सिंह सुमारे ७५ ते ८० वर्षे वयोगटातील असून, आयुष्यभर गुरुघरात पाठ सेवा करून आपला संसार चालवत आले आहेत. वाढते वय, अशक्तपणा आणि अत्यंत कठीण आर्थिक परिस्थितीमुळे त्यांना जगणे कठीण झाले असून, आजही ते मजबुरीने पाठ करीत असल्याचे संघटनेने नमूद केले आहे.हजुरी पाठी संघटनेने गुरुद्वारा बोर्डाकडे या पाठी सिंघना दरमहा ६ ते ७ हजार रुपये निराधार सहाय्य मंजूर करण्याची मागणी केली आहे. ही मागणी करताना निवेदनावर संघटनेचे स. दलजीतसिंघ बिशनसिंघ हजुरी पाठी (अध्यक्ष), स. प्रदीपसिंघ जितसिंघ रागी (उपाध्यक्ष), स. जगदीपसिंघ मोहनसिंघ नंबरदार (सचिव) यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## राज्यस्तरीय पुरस्कारांसाठी १५ मार्च पर्यत अर्ज करण्याचे आवाहन

**नांदेड** -सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय व वैशिष्ट्यपूर्ण कार्य करणाऱ्या व्यक्ती व स्वयंसेवी संस्थांना प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने सामाजिक न्याय विभागामार्फत विविध राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात येतात. या पुरस्कारासाठी इच्छुक सामाजिक कार्यकर्ते व सेवाभावी संस्थांनी आवश्यक कागदपत्रांसह विहित नमुन्यातील अर्ज सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, नांदेड कार्यालयाकडे १५ मार्च २०२६ पर्यंत सादर करावेत, असे आवाहन समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त शिवानंद मिनगिरे यांनी केले आहे.

## पत्रकार पी . जी गिलचे यांना मातृशोक

**उमरी** - शहरातील सेवानिवृत शिक्षक तथा पत्रकार पी. जी. गिलचे



(सर ) यांच्या मातोश्री श्रीमती सजाबाई गोपाळराव गिलचे रा . देवर्जन ता .उदगीर जी . लातूर यांचे दि ३ मार्च २०२६ रोजी धुलीवंदन च्या दिवशी वृद्धपकाळाने निधंन झाले आहे मृत्यू समयी त्यांचे वय ९० वर्षे होते. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, नातवंड असा मोठा परिवार आहे. त्यांचा अंत्यविधी दि ४ मार्च रोजी मुळगावी देवर्जन येथे सकाळी ११ :०० वाजता करण्यात आला आहे .

# आमदार पुत्र क्रांतीशरण केराम यांच्या हस्ते दाभाडी येथील सभामंडपाचे लोकार्पण

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. ४ मार्च-**

मतदारसंघातील विकासकामांचा धडाका लावत असतानाच, धार्मिक स्थळांच्या सुशोभीकरणावर भर देणारे आमदार भीमराव केराम यांच्या संकल्पनेतून मौजे दाभाडी (दरसांगी) येथील महादेव मंदिर परिसरात भव्य सभामंडप साकार झाला आहे. आमदार स्थानिक विकास निधीतील २० लक्ष रुपये खर्चून उभारलेल्या या सभामंडपाचा लोकार्पण सोहळा आज आमदारांचे ज्येष्ठ चिरंजीव तथा युवा नेते क्रांतीशरण भाऊ केराम यांच्या हस्ते अत्यंत उत्साहात संपन्न झाला.

आमदारपुत्राच्या हस्ते झालेल्या या विकासकामाच्या लोकार्पणामुळे दाभाडी परिसरात युवा शक्तीचा नवा उत्साह पाहायला मिळाला. मतदारसंघातील कामांचा वारसा समर्थपणे पुढे नेणारे क्रांतीशरण केराम यांचे गावात आगमन होताच ग्रामस्थांनी त्यांचे जंगी स्वागत केले.

दाभाडी येथील महादेव मंदिर हे परिसरातील भाविकांचे श्रद्धास्थान आहे. या ठिकाणी होणाऱ्या विविध धार्मिक विधी, उत्सव आणि सामाजिक कार्यक्रमांसाठी हक्काच्या जागेची उणीव भासत होती. ग्रामस्थांची ही अडचण ओळखून आमदार भीमराव केराम यांनी २० लक्ष रुपयांचा भरीव निधी उपलब्ध करून दिला होता. आज या देखण्या आणि सुसज्ज सभामंडपाचे लोकार्पण झाल्याने भाविकांची मोठी गैरसोय दूर झाली आहे.

**विकासाचा वारसा असाच पुढे नेणार : क्रांतीशरण केराम**

यावेळी बोलताना क्रांतीशरण केराम म्हणाले की, आमदार भीमराव केराम



यांनी नेहमीच सामान्य जनतेच्या गरजांना प्राधान्य दिले आहे. दाभाडी येथील हे मंदिर परिसराच्या श्रद्धेचे केंद्र आहे, तिथे येणाऱ्या भाविकांना सोयी-सुविधा मिळाव्यात हाच आमदारांचा उद्देश होता. विकासाची ही गंगा प्रत्येक गावापर्यंत पोहोचवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

या सोहळ्याला माजी सभापती दत्ता भाऊ आडे,माजी उप सभापती गजानन पाटील शिवसेना तालुकाप्रमुख बालाजी मुरकुटे , कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक बालाजी बामणे,आदीसह दाभाडी व परिसरातील गावांमधून ग्रामस्थ, राजकीय कार्यकर्ते, पदाधिकारी आणि शेकडो भाविक भक्त उपस्थित होते. हर हर महादेव च्या जयघोषाने संपूर्ण मंदिर परिसर दुमदुमून गेला होता. लोकार्पणानंतर मान्यवरांच्या हस्ते महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. या विकासकामाबद्दल मंदिर समिती व ग्रामस्थांच्या वतीने आमदार भीमराव केराम आणि क्रांतीशरण केराम यांचे आभार मानण्यात आले.

# किड्स किंग्डम पब्लिक स्कूल व चैतन्य टेक्नो स्कूलवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे आदेश?

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ४ मार्च-**

किड्स किंग्डम पब्लिक स्कूल या मान्यता प्राप्त शाळेने चुकीच्या पद्धतीने चैतन्य टेक्नो स्कूल या शाळेचे नाव वापरून विद्यार्थी व पालकांची दिशाभूल केल्याप्रकरणी विधान परिषदेत तारांकित प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. त्यामुळे किड्स किंग्डम पब्लिक स्कूल व चैतन्य टेक्नो स्कूल या शाळेच्या संचालकावर फौजदारी गुन्हे दाखल होण्याची शक्यता आहे.

किड्स किंग्डम या इंग्रजी माध्यमाच्या शाळेने न्यू चैतन्य टेक्नो स्कूलला आपली शाळा करार पद्धतीने चालवण्यात दिली. परंतु या शाळेने शासनाची कुठलीही परवानगी घेतली नाही. दोन्ही शाळेला एकच यु डायस क्रमांक वापरण्यात आला. तर न्यू चैतन्य टेक्नो स्कूलला शासनाची मान्यता आणि परवानगी नाही. याविषयी ॲड. प्रमोद नरवाडे यांनी विभागीय शिक्षण उपसंचालकाकडे दि. १२ डिसेंबर २६ रोजी तक्रार केली होती. तसेख काही सामाजीक संघटनांनी देखील तक्रार केल्यांनतर जिल्हा परिषदेतील शिक्षणाधिकाऱ्यांनी या शाळांना पाठीशी घालण्याचा प्रयत्न केला. दरम्यान आमदार हेमंत पाटील यांनी श्री चैतन्य टेक्नो स्कूल या नावाची बोगस शाळा सुरू असून याबाबत विधान परिषदेत तारांकित प्रश्न क्रमांक ६७९२ उपस्थित केला. या अनुषंगाने शासन मान्यता नसताना चैतन्य टेक्नो स्कूल या शाळेने शाळेच्या नावाचा फलक लावून विद्यार्थी व पालकांकडून अनाधिकृतपणे प्रवेश शुल्क वसूल केल्यामुळे चैतन्य टेक्नो स्कूल या शाळेवर कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. तसेच विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही याबाबतही निर्देश विभागीय शिक्षण उपसंचालक डॉ. दत्तात्रय मठपती यांनी दिले असल्याने या दोन्ही शाळांवर फौजदारी गुन्हे दाखल होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

## अटकळीच्या नायरा शेख या मुलीचा पहिला रोजा पूर्ण

**तभा वृतसेवा**
**आदमपूर, दि. ४ मार्च-**

मुस्लिम समाजाचा दि. १९ फेब्रुवारीपासून पवित्र रमजान महिना सुरू झाला असून या महिन्यात मुस्लिम



बांधव रोजा (उपवास) ठेवून अल्लाहची उपासना करतात. आत्मशुद्धी, संयम आणि त्याग यांचा संदेश देणाऱ्या या पवित्र महिन्याला विशेष धार्मिक महत्त्व आहे.

बिलोली तालुक्यातील अटकळी येथील रहिवाशी असलेले सध्या मुंबई येथे वास्तव्यास असून, बृहन्मुंबई महानगरपालिकेत स्टाफ नर्स या पदी कार्यरत असलेल्या शाहीन मोहम्मदरफी शेख यांची चिमुकली ७ वर्षीय नायरा मोहम्मद रफी शेख या चिमुकलीने आपल्या आयुष्यातील पहिला रोजा यशस्वीरित्या पूर्ण करून सर्वांचे लक्ष वेधले आहे. तब्बल १३ तास अन्न व पाणी न घेता तिने श्रद्धा, संयम आणि आत्मविश्वासाचे उत्तम उदाहरण घालून दिले.


गुजराती शिक्षण संस्था, नांदेड संचलित
**गुजराती हायस्कूल, नांदेड.**

गुजराती हायस्कूल, वजीराबाद, नांदेड (अल्पभाषीक शाळा) येथे शासन निर्णयाच्या अधिन राहून अनुदानीत पदावर खालील प्रमाणे जागा भरावयाची आहे. इच्छुक उमेदवारांनी आपल्या शैक्षणिक व व्यवसायीक पात्रतेच्या सत्यप्रती सह लेखी अर्ज दिनांक १२.०३.२०२६ रोजी पर्वत शाळेच्या कार्यालयीन वेळात (सुट्टीचे दिवस वगळून) आपल्या स्वखर्चाने गुजराती हायस्कूल, वजीराबाद, नांदेड येथे हस्तपोच करावे.

| अ. क्र | पदाचे तपशील | विषय | शैक्षणिक पात्रता | व्यावसायीक पात्रता | पद संख्या | टी.ई.टी/ सी.टी.ई.टी आवश्यक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सहशिक्षक | भुगोल | बी.ए. | बी.एड | ०१ | होय |

नोट
१. उमेदवारांना तोंडी मुलाकातीसाठी शाळेकडून संपर्क करण्यांत येईल, त्या अगोदार उमेदवारांनी प्रत्यक्ष किंवा इतर माध्यम द्वारे संपर्क करु नये.
२. उमेदवारांनी तोंडी मुलाकातीस येतांना सोबत आपले लेखी स्वरुपात लिहलेले अर्ज व शैक्षणिक आणि व्यवसायीक पात्रतेच्या मूळ प्रमाणपत्रसह हजर राहावे.
३. तोंडी मुलाकातीस दिलेल्या वेळ पुर्वी शाळेत हजर होणे आवश्यक आहे. वेळे नंतर आलेल्या उमेदवारास मुलाकातीसाठी विचार केला जाणार नाही.
४. उमेदवारांचे निवडीचे अधिकार हे शाळा प्रशासन कडे असेल.

**अध्यक्ष** **मुख्याध्यापक तथा पदसिध्द सचिव**

**शालेय समिती, गुजराती हायस्कूल, नांदेड**


# सिंदखेड पोलिसांनी सरपंचपुत्राशी संगणमत करून खोटे गुन्हे दाखल केल्याची जिल्हा न्यायाधीशांकडे तक्रार

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ४ मार्च-**

किनवट तालुक्यातील मौजे सारखणी ग्रामपंचायत अंतर्गत विकास निधीचा अपहराची तक्रार केल्याचा राग मनात धरून उपसरपंचपुत्राने सिंदखेड पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षकांसमोर मारहाण व लैंगिक छळ करून गंभीर खोटे गुन्हे दाखल केल्याची तक्रार जिल्हा मध्यवर्ती कारागृहातील कोठडीतील कैद्याने प्रमुख जिल्हा न्यायाधीश यांच्याकडे केली असून न्याय न मिळाल्यास जिल्हा कारागृहात आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे.

सारखणी ग्रामपंचायत अंतर्गत विकास कामांच्या निधीमध्ये अपहार झाल्याचा आरोप करीत वरिष्ठस्तरावर तक्रार करून चौकशीची मागणी गजानन रामराव पवार यांनी केली होती. याबाबत वारंवार पाठपुरावा केल्याने याचा राग मनात धरून उपसरपंच शेवंताबाई मधुकर जाधव यांचे पुत्र विशाल मधुकर जाधव यांनी तक्रारदार गजानन पवार यांना मित्रांच्या मदतीने शेतामध्ये लैंगिक छळ करून गंभीर मारहाण केल्याची तक्रार सिंदखेड पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रमेश जाधवर यांच्याकडे केली होती. परंतु याबाबत कारवाई न केल्याने पोलीस अधीक्षकांकडे जाण्याचा इशारा दिला होता.

या गोष्टीचा राग धरून सिंदखेड पोलीस ठाणे प्रभारी जाधवर यांच्यासमोर उपसरपंचपुत्र विशाल जाधव व त्याच्या मित्राने पुन्हा पवार याचा त्यांचे मालकीचे शेताजवळच्या नाल्यामध्ये जबरीने नेऊन लैंगिक छळ व जबर मारहाण केली. याची वाच्यता करू नये म्हणून ठाणे प्रभारी जाधवर यांनी कट रचून दि. ०७ जून २०२५ रोजी गंभीर गुन्हे दाखल केल्याची तक्रार गजानन पवार यांनी प्रमुख जिल्हा न्यायाधीश यांना सबळ वैद्यकीय पुराव्यासह कारागृह अधीक्षकांमार्फत केली आहे. संबंधितांवर कारवाई न झाल्यास दिनांक २५ फेब्रुवारी २०२६ पासून कारागृहातच आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# बँकांनी शेतकऱ्यांना वेळेत कर्ज द्यावे- पालकमंत्री

**परभणी ,/प्रतिनिधी-** बँकांनी शेतकऱ्यांना वेळेत कर्ज द्यावे; प्राधान्य क्षेत्रातील कर्जवाटपात दिरंगाई नको- पालकमंत्री मेघना साकोरे परभणी, दि. ०२ (जिमाका) : बँकांनी शेतकऱ्यांना वेळेत, सुलभ आणि पारदर्शकपणे कर्ज उपलब्ध करून द्यावे, असे निर्देश पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी दिले. तसेच बँकांनी प्राधान्य क्षेत्रातील कर्जवाटपाचे उद्दिष्ट वेळेत पूर्ण करावे, पात्र लाभार्थ्यांना सुलभ पद्धतीने कर्ज उपलब्ध करून द्यावे तसेच शासनाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी. प्रलंबित प्रस्तावांचा तातडीने निपटारा करून शेतकरी, उद्योजक व सर्वसामान्य नागरिकांना दिलासा द्यावा, अशा सूचनांही पालकमंत्री यांनी केल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयात आज आयोजित जिल्हास्तरीय सल्लागार समितीच्या बैठकीत पालकमंत्री यांनी जिल्ह्यातील राष्ट्रीयकृत व सहकारी बँकांच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. त्यावेळी त्या बोलत होत्या. बैठकीस जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण, पोलीस अधीक्षक रविंद्रसिंह परदेशी, मुख्य कार्यकारी अधिकारी नतीशा माथूर, निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी, अग्रणी बँक व्यवस्थापक रामचंद्र अकुलवार, विविध बँकांचे प्रतिनिधी तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. बैठकीत जिल्ह्यातील कर्ज वितरण विशेषतः पीक कर्ज, कृषी कर्ज आणि इतर प्राधान्य क्षेत्रातील कर्ज, जिल्हा वार्षिक पतपुरवठा आराखडा, स्वयंरोजगार योजनांची अंमलबजावणी, महिला बचत गटांना कर्जपुरवठा तसेच शासनाच्या विविध योजनांच्या प्रगतीबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. जिल्ह्यातील शेतकरी, लघु उद्योजक आणि सर्व वर्गांना मजबूत आर्थिक पाठबळ मिळावे यासाठी प्रशासन आणि बँकिंग क्षेत्र एकत्रितपणे कार्यरत आहे. या बैठकीच्या माध्यमातून केलेल्या सूचनांमुळे जिल्ह्यात कर्ज वितरण प्रक्रियेला नवीन गती मिळेल, शेतकऱ्यांच्या उत्पादकतेत वाढ होईल आणि जिल्ह्याच्या सर्वांगीण प्रगतीला चालना मिळेल, असे पालकमंत्री यांनी स्पष्ट केले. जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापकांनी जिल्ह्यातील बँकिंग कामकाजाचा आढावा सादर करून कर्जवाटप व उद्दिष्टपूर्तीबाबत माहिती दिली. बैठकीत विविध बँकांच्या कामगिरीचे परीक्षण करून आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या.



प्रारंभी जिल्ह्यातील महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, जिल्हा कार्यालयामार्फत अंमलबजावणी करण्यात येणाऱ्या पिएमईजीपी/ सीमएईजीपी/ विश्वकर्मा योजनेतअंतर्गत कर्ज मंजूर झालेल्या उद्योजकांना कर्ज मंजूरीपत्रे पालकमंत्री यांच्या हस्ते वितरीत करण्यात आले. तसेच परभणी जिल्ह्यातील येलदरी जलाशयामध्ये मासेमारी करणारे परवानाधारक मच्छिमार दिवंगत अशोक हरिभाऊ वाकळे यांचा मासेमारी करताना मृत्यु झाला होता. त्यांच्या वारसास प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेअंतर्गत अपघात गट विमा योजनेतुन ५ लक्ष रूपये विमा थेट डिबीटीद्वारे वितरीत करण्यात आला. याबाबतचे मंजुरीपत्र त्यांना पालकमंत्री यांच्या हस्ते देण्यात आले. उल्लेखनीय कार्य करणारे विविध बँक शाखाधिकारी यांचाही पालकमंत्री यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला आहे. यामध्ये रमनकुमार सौदागर (बँक ऑफ बडोदा), सुर्यकांत केंद्रे (बँक ऑफ इंडिया), ज्ञानेश्वर दापकर (युनियन बँक ऑफ इंडिया), श्री.वानखेडे (स्टेट बँक ऑफ इंडिया), सुर्यकांत हेडाऊ (महाराष्ट्र ग्रामिण बॅंक), रामचंद्र अकुलवार (लिड बँक अधिकारी) यांचा समावेश आहे.

----*

## संक्षिप्त वृत्त...

### आक्षेपार्ह व्हिडीओ क्लिपमुळे झरीत तणाव : सहा जणांविरुध्द गुन्हे दाखल

**परभणी,/प्रतिनिधी:-** आक्षेपार्ह व्हिडीओ क्लिप व्हॉट्सअप स्टेटसवर ठेवल्याबद्दल झरी या गावी मंगळवारी सायंकाळी दोन समाजातील युवकात मोठा वाद झाला. त्यामुळे गावात तणाव निर्माण झाला. ग्रामीण पोलिसांनी तात्काळ गावात धाव घेऊन मोठा फौजफाटा तैनात केला व सहा जणांविरुध्द गुन्हे दाखल करीत तपास सुरु केला.

गावातील एका युवकाने इन्स्टाग्राम व व्हॉट्सअप स्टेटसवर आक्षेपार्ह व्हिडीओ क्लिप व्हायरल केली. त्या गोष्टीचा अन्य समाजातील युवकांनी आक्षेप घेऊन संबंधित युवकाच्या घरी मोठा राडा केला. यावेळी दोन्ही समाजात मोठा वाद झाला व एकमेकांवर दगडफेकही करण्यात आली. पोलिसांनी यात हस्तक्षेप करीत परिस्थितीचे गांभीर्य ओळखून गावात फौजफाटा तैनात केला.

### परभणी जिल्हा मध्यवर्ती बँकेस शासकीय बँकींग व्यवहार हाताळण्याची परवानगी

**परभणी,/प्रतिनिधी :** परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेस शासकीय बँकींग व्यवहार हाताळण्याची शासनाच्या वित्त विभागासह सहकार खात्याच्या अप्पर आयुक्त तथा विशेष निबंधकांनी परवानगी बहाल केली आहे.

शासकीय निधीची सुरक्षितता विचारात घेऊन आर्थिकदृष्ट्या सक्षम व नियमानुकुल व्यावसायिकता बाळगणाऱ्या तसेच इतर काही निकष पुर्तता करीत असलेल्या जिल्हा बँकांना २०२५-२०२६ या वर्षाकरीता कर्मचाऱ्याचे वेतन आणि भत्त्याचे प्रदान करण्याकरीत आहरण व संवितरण अधिकारी यांचे बँक खाते उघडण्याकरीता आणि निवृत्तीधारकांचे वैयक्तिक बँक खाते उघडण्याकरीता तसेच सार्वजनिक उपक्रम, महामंडळ यांच्याकडील अतिरिक्त निधी गुंतवण्याकरीता शासनाच्या वित्त विभागाने मान्यता बहाल केली आहे. वित्त विभागाने या संदर्भात २० जानेवारी रोजी परिपत्रक काढून संबंधितांना निर्देश दिले आहेत. मराठवाड्यातील लातूर व परभणी या दोनच जिल्हा बँकांना या संबंधीची परवानगी या अध्यादेशाद्वारे मिळाली आहे.

दरवर्षी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या लेखापरीक्षक अहवालात बदल होण्याची शक्यता विचारात घेता सदर बँकांची यादी प्रतिवर्षी सहकारी, वस्त्रोद्योग व पणन विभागाच्या सल्ल्याने वित्त विभाग सुधारित करेल, असे नमूद करण्यात आले आहे. त्या अनुषंगानेच २०२५-२०२६ या आर्थिक वर्षाकरीता राज्यातील १७ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना शासकीय कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्त्याचे प्रदान करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी यांचे बँक खाते आणि निवृत्ती वेतनधारकांचे वैयक्तिक बँक खाते उघडण्याकरीता तसेच सार्वजनिक उपक्रम महामंडळे यांच्याकडील अतिरिक्त निधी गुंतवण्यासाठी पात्र ठरविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

### महाराष्ट्र नवनिर्माण सेनेद्वारे कुलसचिवांच्या दालनासमोर ठिय्या आंदोलन

**परभणी,/प्रतिनिधी :** सन २०१७-१८ ते २०२०-२१ पर्यंतचे झालेले लेखापरीक्षण व त्यावरील आक्षेपांबद्दल संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांविरुध्द कुठलीही कारवाई न झाल्याबद्दल महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे श्रीनिवास लाहोटी यांनी कृषि विद्यापीठ कुलसचिवांच्या दालनासमोर ठिय्या आंदोलन केले.

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठातील लेखा परीक्षण आक्षेपांचे अनुपालन या कार्यालयात सादर न केलेल्या संबंधित अधिकारी-कर्मचारी यांच्यावर कारवाईबाबत कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली सर्व नियंत्रण अधिकारी यांच्याबरोबर बैठक घेऊन पुढील कार्यवाही बाबत निर्णय घेतला जाईल, असे आश्वासन नियंत्रक आनंत कदम यांनी दिले व देयके स्विकारणे बंद करण्यात येत आहे, असेही म्हटले. त्यामुळे लाहोटी यांनी हे आंदोलन मागे घेतले.

### लाच स्विकारणाऱ्या ग्रामसेवकास दोन वर्षे सक्त मजूरीची शिक्षा : जिल्हा व सत्र न्यायालयाचा निर्णय : नमूना नंबर ८ची प्रत देण्याकरीता दीड हजारांची लाच

**परभणी,/प्रतिनिधी :** घराच्या नमूना नंबर ८ची प्रत देण्याकरीता दीड हजार रुपये स्विकारणाऱ्या ग्रामसेवकास जिल्हा व सत्र न्यायाधीश एन.आर.नाईकवाडे यांनी सोमवारी (दि.०२) लाच लुचपत प्रतिबंधक कायदा कलम ७ नुसार दोन वर्षे सक्त मजूरी, पाच हजार रुपये दंड दंड न भरल्यास दोन महिने सक्त मजूरी कारावास व कलम १३ (१) (ड) नुसार दोन वर्षे सक्त मजूरी, पाच हजार रुपये दंड व दंड न भरल्यास दोन महिने सक्त मजूरी कारावास अशी शिक्षा ठोठावली.

जिंतूर तालुक्यातील मौजे वरुड नृं. येथील ग्रामसेवक संतोष दशरथ पांडे याने तक्रारकर्त्यास नमूना नंबर ८ ची प्रत द्यावयाकरीता दीड हजार रुपयांची लाच मागितली. तसेच तत्कालीन पोलीस निरीक्षक दीपक दंतुलवार यांनी दोन शासकीय पंच बोलावून व पंचासमक्ष पडताळणी केली असता संबंधित ग्रामसेवकाने दीड हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली व ते संभाषण डीव्हीआरमध्ये ध्वनीमुद्रीत झाले. त्यानंतर सापळा रचून केलेल्या कारवाईत संबंधित ग्रामसेवकाने ती रक्कम पंचासमक्ष स्विकारली. या प्रकरणात जिंतूर पोलिस ठाण्यात संबंधित ग्रामसेवकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपीचा नमूना आवाज, इतर महत्वाचे पुरावे जमा करीत तपासणीक अंमलदार पोलिस निरीक्षक दीपक दंतुलवार यांनी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केली. सरकार पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता ॲड. ए.एन. गिराम यांनी पाच साक्षीदार तपासले. आरोपीने लाचेची मागणी केली व ती स्विकारली. ही बाब संशयापलीकडे जावून सिध्द केली. त्यामुळे न्यायालयाने आरोपीस वरीलप्रमाणे शिक्षा ठोठावली.

मुख्य सरकारी अभियोक्ता ॲड. ज्ञानोबा दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक सरकारी अभियोक्ता ॲड. आनंद गिराम यांनी सरकार पक्षातर्फे बाजू मांडली. लाच लुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलिस अधिक्षक संदीप पालवे, अप्पर पोलिस अधिक्षक अशोक कदम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपअधिक्षक महेश पाटणकर, कोर्टपैरवी अधिकारी अल्ताफ मुलानी, पोलिस उपनिरीक्षक सुरेश चव्हाण, संतोष बेंद्रे, आकाश रेड्डी आदींनी या प्रकरणात काम पाहिले

### सिरसमच्या ग्रामस्थांनी सोडला प्लास्टिकमुक्तीचा संकल्प

स्वनिधीतून स्टिलची ताटे व ग्लास खरेदी : प्लास्टिक मुक्तीसाठी जनजागृती

**परभणी,/प्रतिनिधी :** गंगाखेड तालुक्यातील सिरसम येथील ग्रामस्थांनी गावाच्या हितासाठी व पर्यावरण संवर्धनाकरीता प्लास्टिक मुक्तीचा स्तुत्य आणि प्रेरणादायी संकल्प केला आहे. त्या दृष्टीने या ग्रामस्थांनी स्वनिधीतून स्टीलची ताटे व ग्लास खरेदी करीत गावासाठी उपलब्ध करुन दिली आहेत.

आजच्या काळात पर्यावरण संरक्षण ही अत्यंत महत्वाची गरज आहे. या सामाजिक जाणीवेतून गावच्या काही व्यक्तींनी पुढाकार घेऊन प्लास्टिक मुक्तीचा संकल्प केला. श्रीहरी मुंढे, अनंता मुरकुटे, राम मुरकुटे, मंगेश मुंढे, सुधाकर केंद्रे, भरत कासले, आदीनी केले आहे.



## प्रवासा दरम्यान कार्ड आता अनिवार्य--आगार व्यवस्थापक आनंद चव्हाण

जिंतूरच्या बस स्थानकात स्मार्ट कार्डचे उद्घाटन

**जिंतूर,/प्रतिनिधी :** प्रवाशांच्या सोयीसाठी व डिजिटल व्यवहारांना चालना देण्यासाठी जिंतूर बसस्थानकात स्मार्ट कार्डचे उद्घाटन आगार व्यवस्थापक आनंद चव्हाण, प्रवासी महासंघाचे सचिन रायपत्रीवार व प्रमुख पाहुणे दिव्यांग तालुकाध्यक्ष मुंजाभाऊ थिटे यांच्या हस्ते करण्यात आले.

या स्मार्ट कार्ड जेष्ठ नागरिक, महिला, अमृत जेष्ठ नागरिक, दृष्टीहीन, दिव्यांग, विद्यार्थी यांना हे कार्ड अनिवार्य करण्यात येईल, वेगवान सुरक्षित, स्मार्ट कार्ड पेमेंट द्वारे प्रवास सुलभ, सुरक्षित व पारदर्शक होईल, याचा सर्व प्रवाशांनी नोंद घ्यावी. आज उद्घाटन प्रसंगी सहाय्यक वाहतूक अधीक्षक रामेश्वर सोनवणे, प्रल्हाद मुंडे, वरिष्ठ लिपिक गजानन घुगे, वरिष्ठ लिपिक ज्ञानदेव सखाराम गुहाडे, एजंट गजानन घनवटे, वाहतूक नियंत्रक हे सर्व कर्मचारी हजर होते.

## रामराव वडकुते यांचे भाजपाद्वारे राजकीय पुनर्वसन, ओबीसी समाजास त्याद्वारे मिळाला मोठा दिलासा



**परभणी/प्रतिनिधी -** माजी विधानपरिषद सदस्य रामराव वडकुते यांना भारतीय जनता पार्टीच्या श्रेष्टींनी बुधवारी (दि.०४) राज्यसभेकरीता उमेदवारी जाहिर करीत त्यांचे राजकीय पुनर्वसन तर केलेच परंतु, वडकुते यांच्यासह ओबीसी समाजास विशेषतः धनगर समाजास मोठा सुखद धक्का दिला.

कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा माजी मंत्री सुरेश वरपुडकर यांचे कट्टर समर्थक म्हणून ओळखले जाणारे वडकुते यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या माध्यमातून राजकीय क्षेत्रात प्रवेश केला. त्यावेळी ते ज्येष्ठ नेते शरद पवार व तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे कट्टर समर्थक म्हणून ते राष्ट्रवादीच्या वर्तूळात वावरत होते. त्यावेळी धनगर समाजाचे नेते म्हणून वडकुते यांना राष्ट्रवादीने अहिल्यादेवी होळकर शेळी-मेंढी विकास महामंडळ अध्यक्ष म्हणून नियुक्त केले. तेव्हापासून ते संपूर्ण महाराष्ट्रात महामंडळाच्या माध्यमातून समाजात व राजकीय क्षेत्रात कमालीचे सक्रिय राहिले. २००४ च्या विधानसभा निवडणूकीत वडकुते यांना राष्ट्रवादीने कळमनुरी या मतदारसंघातून उमेदवारी बहाल केली. त्या निवडणूकीत वडकुते यांनी लक्षणीय मते मिळवली. परंतु ते पराभूत झाले. त्यानंतरसुध्दा राष्ट्रवादीने त्यांचे विधानपरिषदेवर संधी देऊन राजकीय पुनर्वसन केले. मात्र २०१९ साली वडकुते यांनी राष्ट्रवादीस सोडचिठ्ठी दिली अन् भाजपात प्रवेश केला. परंतु, कळमनुरी मतदारसंघात भाजपाचे वडकुते यांना उमेदवारी दिलीच नाही. त्यांचे पुनर्वसनही केले नाही. परंतु, पक्षीय पातळीवर हिंगोली लोकसभेचे प्रभारी म्हणून त्यापुढे हिंगोलीचे जिल्हाध्यक्ष म्हणून पक्षाने वडकुते यांना संघटनात्मक कामात गुंतवले. पक्षीय पातळीवरसुध्दा वडकुते यांनी सातत्याने दौरे, विविध उपक्रम राबवून श्रेष्ठींचे लक्ष वेधून घेतले. परंतु, त्यांचे राजकीय पुनर्वसन झालेच नाही. त्यामुळे ते अलिकडे राजकीयदृष्ट्या बॅकफूटवर गेले की काय अशी शंका उद्भवली तेव्हाच पक्षश्रेष्ठींनी राज्यसभेच्या सदस्यत्वाच्या रिक्त जागेकरीता वडकुते यांच्या उमेदवारीबाबत गांभीर्याने विचार विनिमय करीत शिक्कामोर्तब केले. अन् त्याद्वारे, वडकुते यांचे राजकीय पुनर्वसन, ओबीसी समाजास विशेषतः धनगर समाजास सुखद धक्का देऊन न्याय दिला आहे.

वडकुते यांच्या या उमेदवारीने परभणी व हिंगोली या जिल्ह्यास त्यांच्या रुपाने खासदार उपलब्ध झाला आहे.

### पक्षाचे आभार तरी कसे मानू...

**देशाच्या सर्वोच्च सभागृहात सदस्य म्हणून पाठविण्याचा भारतीय जनता पार्टीच्या श्रेष्ठींचा निर्णय माझ्याकरीता मोठा सुखद धक्का आहे. अशी संधी मिळेल या गोष्टीचा मी कधीही विचारसुध्दा केला नव्हता. मला न मागता, न कळवता पक्षश्रेष्ठींनी माझी निवड केली, हे माझे, सर्वसामान्य कार्यकर्त्यांचे मोठे भाग्य आहे. जेव्हा श्रेष्ठींद्वारे त्या संबंधीची माहिती मला कळविण्यात आली त्यावेळी मला रडू कोसळलं. श्रेष्ठींचे, पक्षाचे आभार तरी कसे मानू, त्यासाठी शब्दच नाहीत. या संधीचा, या पदाचा आपण निश्चित उपयोग करु, समाजासाठी अहोरात्र काम करु, त्यात आपण मूळीच कमी पडणार नाही. पक्षाने, श्रेष्ठींनी दाखवलेला विश्वास सार्थ ठरवू, अशी प्रतिक्रिया भारतीय जनता पार्टीचे राज्य सभेचे उमेदवार रामराव वडकुते यांनी बोलतांना व्यक्त केली.**

## मध्यपूर्व देशात अडकलेल्या परभणीकरांसाठी प्रशासनाचा पाठपुरावा; घाबरू नये, सुरक्षित परतीसाठी प्राधान्य- जिल्हाधिकारी चव्हाण

**परभणी,/प्रतिनिधी :-** मध्यपूर्व देशात अडकलेल्या परभणीकरांसाठी प्रशासनाचा पाठपुरावा; घाबरू नये, सुरक्षित परतीसाठी प्राधान्य- जिल्हाधिकारी परभणी, दि. २ (जिमाका) -- मध्यपूर्वे तील युद्धजन्य परिस्थितीमुळे काही देशांतील हवाई क्षेत्र तात्पुरते बंद करण्यात आले आहे. परिणामी, परभणी जिल्ह्यातील काही नागरिक संबंधित देशांमध्ये अडकले असल्याची माहिती जिल्हा प्रशासनास प्राप्त झाली आहे. प्राथमिक माहितीनुसार, परभणी जिल्ह्यातील आज रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत एकूण १० नागरिक सध्या संयुक्त अरब अमिराती, कतार आणि सौदी अरेबिया बेहरीन इत्यादी देशांमध्ये विमानसेवा बंद असल्यामुळे परत येऊ शकलेले नाहीत. ज्या मध्ये पाथरी तालुक्यातील एकूण ०६ आणि जिंतूर तालुक्यातील ०४ नागरिकांचा समावेश आहे. जिल्हा प्रशासनामार्फत संबंधित नागरिकांच्या कुटुंबीयांशी संपर्क साधण्यात आला असून, राज्य नियंत्रण कक्षामार्फत देण्यात आलेल्या विहित नमुन्यात वर नमूद नागरिकांची माहिती शासनास सादर करण्यात आली आहे.

राज्य नियंत्रण कक्षामार्फत परराष्ट्र मंत्रालय व संबंधित भारतीय दूतावासांशी सातत्याने समन्वय ठेवण्यात येत असून वेळोवेळी प्राप्त होणा-या निर्देशाप्रमाणे जिल्हा प्रशासनाकडून कार्यवाही करण्यात येणार आहे. अशावेळी जिल्ह्यातील नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये. जिल्हा प्रशासन परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेस सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे. तरी नागरिकांनी घाबरून जाऊ नये व स्थानिक प्रशासन तसेच भारतीय दूतावासांच्या सूचनांचे पालन करावे, तसेच ज्या नागरिकांचे नातेवाईक मध्यपूर्वेतील संबंधित देशांमध्ये अडकले आहेत त्यांच्या नातेवाईकांनी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन नियंत्रण कक्ष जिल्हाधिकारी कार्यालय संपर्क क्रमांक ०२४५२-२२६ ४०० तसेच संपर्क अधिकारी पवन खांडके, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, संपर्क ९९७५०१३७२६, ७०२०८२५६६८, या क्रमांकावर संपर्क साधून आपल्या नातेवाईकांविषयी माहिती द्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, (जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण) संजयसिंह चव्हाण यांनी केले आहे.

### आर.पी. हॉस्पिटलमध्ये अत्याधुनिक त्वचारोग उपचार विभागाची सुरुवात

**परभणी,/प्रतिनिधीः** आर.पी. हॉस्पिटल अँड रिसर्च इन्स्टिट्यूट येथे अत्याधुनिक सौंदर्यशास्त्र, केसशास्त्र व लेसर विभाग सुरू झाला आहे. या विभागामुळे परभणी शहरासह लगतच्या ग्रामीण भागातील हजारो रुग्णांना अती उच्च दर्जाचे त्वचा, केस आणि सौंदर्य उपचार आता स्थानिक पातळीवरच अत्यल्प दरात उपलब्ध होत आहेत. या विभागात प्रसिद्ध त्वचारोग तज्ज्ञ डॉक्टरांची टीम कार्यरत आहे. यात प्रमुख म्हणून डॉ. मनीष कदम आणि डॉ.दिनेश भूतडा व डॉ.रेवती राज हे कार्यरत आहेत.या विभागात केमीकल पीलिंग व मायक्रोडर्म अब्रेशनः- त्वचेच्या मृत कोशिका काढून टाकणे. मुरुमांचे डाग, काळे डाग, सुरकुत्या काढणे.पुव्हा थेरपी व क्रियो थेरपी,सोरायसिस, विटिलिगो (पांढरे डाग) यांसारख्या रोगांसाठी प्रभावी.क्रायो थेरपी : वेदनाशून्य त्वचेवरील मस काढणे,डायोड लेसर व योग लेसर,चेहरा टॅटू(गोंदण)काढणे, गरोदर स्त्रियामधील पोटावरील व चेहऱ्यावरील असमान रंग मिटविणे,कॅव्हिटेशन थेरपी ऑपरेशन न करता शरीरातील चरबी अल्ट्राव्हायोलेट कंपनाने कमी करणे,मेझो थेरपी केस गळती थांबवने, केस आणि त्वचेला पोषण देणे, हेअर स्कॅनिंग आणि हेयर लेसर :- अत्याधुनिक स्कॅनद्वारे केस गळतीची समस्या ओळखणे आणि उपाय योजना करणे. हेअर लेसर थेरपीद्वारे केस वाढवणे, केसगळती कमी करणे,हेअर ट्रान्सप्लांट :-टक्कल पडलेल्या पुरुष आणि स्त्रीयाचे केशरोपण करणे व कायमस्वरूपी उपाय, स्किन व्हाइटनिंग थेरपी:- त्वचा गोरी आणि चमकदार करणे होय.

## भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती कमिटीच्या अध्यक्षपदी विजय हनवते तर उपाध्यक्षपदी सिद्धार्थ थिट्टे यांची झाली निवड

### महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर जंयतीनिमित्त पालम येथे कार्यकारिणीची बैठक संपन्न

शांतीलाल शर्मा

**पालम ,/प्रतिनिधी:** भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती कमिटीच्या अध्यक्षपदी विजय हनवते तर उपाध्यक्षपदी सिद्धार्थ थिट्टे यांची निवड करण्यात आली आहे.

येथील बौद्ध विहार येथे प्रतिवर्षाप्रमाणे भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती २०२६ ची निवड करण्यात आली . बौद्ध विहार आंबेडकर नगर पालम येथे सर्व समाज बांधवांची मीटिंग आयोजित करण्यात आली होती त्यात विश्वरत्न भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या सार्वजनिक जयंती उत्सव कमिटी ची बैठक शेषराव थिटे यांच्या अध्यक्षते खाली संपन्न झाली. त्यात सार्वजनिक जयंती कमिटीची पुढील प्रमाणे सर्वानुमते निवड करण्यात आली अध्यक्ष विजय शिवाजीराव हनवते, उपाध्यक्ष सिद्धार्थ लक्ष्मणराव थिट्टे,सचिव माधव



निवृत्ती हत्तिअंबीरे,सहसचिव देवानंद मस्के, मुकुंद साबने, कमलाकर वायवळ, कोषाध्यक्ष बाबासाहेब शेषराव एंगडे, सह कोषाध्यक्ष राहुल गायकवाड, कार्याध्यक्ष राजू वाव्हळे, संघटक रावसाहेब वाव्हळे, सहसंघटक गोपाळ गाडे, जयपाल गाडे,स्वागत समिती जालिंद्रनाथ हत्तिअंबीरे नगरसेवक संजय थिट्टे नगरसेवक गौतम हत्तीअंबीरे नगरसेवक,सखाराम हत्तिअंबीरे, माधव हानवते, निवृत्ती हत्तिअंबीरे आर पि आय जिल्हा अध्यक्ष,महेंद्र कुमार रोहिणीकर, वैजनाथ हत्तिअंबीरे, सदस्य संदिप गवारे, ऍड.जयप्रकाश हनवते, आनंद मस्के,अविनाश हनवते धनंजय हत्तीअंबीरे,अनिकेत हत्तीअंबीरे अजय गाडे, संदीप हत्तीअंबीरे, सुनील हनवते, विशाल वाघमारे, सटवाजी थिटे,सचिन थिटे,कपिल हत्तीअंबीरे, दत्ता गायकवाड,आनंद मस्के,यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. या बैठकीस शहरातील समाज बांधव उपस्थित होते. सर्व पदाधिकाऱ्यांचे समाज बांधवांनी अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.